सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २८ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५२ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापुरात ३ बांगलादेशी कामगारांना अटक; दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई

## चिंचोळी एमआयडीसीत छापा; तिघांनाही पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २७ डिसेंबर-**


मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांगलादेशातून आलेल्या आणि अवैधरित्या भारतात राहणाऱ्या घुसखोराविरुद्ध कडक कारवाई सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर चिंचोली औद्योगिक वसाहत (ता. मोहोळ) मध्ये वेगवेगळ्या कंपनीत काम करणाऱ्या तीन बांगलादेशी नागरिकांना दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकून अटक केली. त्यांना १ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आल्याची माहिती मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली.

सोलापूर येथील दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ कदम व त्यांचे सहकाऱ्यांना चिंचोली औद्योगिक वसाहती येथे काही बांग्लादेशीय कामगार अवैधरित्या राहत असल्याची माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे कदम हे आपल्या सहकाऱ्यांसह तेथे येऊन थांबले होते. त्यावेळी मोहोळ पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक अंजना फाळके व त्यांच्या सहकाऱ्यांनी चिंचोली काटी व सावळेश्वर येथील पोलीस पाटलांना पाचारण केले व शोध मोहीम राबवली. त्यावेळी त्यांनी त्यांच्या राहत्या खोल्यांची तपासणी केली असता, त्या ठिकाणी चंचल विष्णू देव उर्फ विश्वनाथ रॉय उर्फ पहन (वय २९, रा. बेनीपूर, पो. कटला, जि. बिनासपूर, बांगलादेश) हा आढळून आला. पथकाने त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने माझ्याकडे पासपोर्ट नसून सोलापूर येथील एका एजंटाकडून आधार कार्ड बनवून घेतल्याचे सांगितले. त्याने दिलेल्या माहितीनुसार, रजा हुजूरअल्ली हुसेन (वय ३८, रा. कटला) व त्याचा तिसरा साथीदार मीनल शनीचेरा (वय ३०, रा. फुलयोनी, हमरस डंगापाडा, ता. कटला, जि. बिनासपूर) हे आढळून आले. त्या तिघा विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यातील गोपनीय विभागाचे पोलीस हेडकॉन्स्टेबल गोपाळ बजरंग साखरे यांनी फिर्याद दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.




**ना पासपोर्ट, ना परवाना**
तिघांकडून पंचा समक्ष साडेआठ हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल जप्त करण्यात आले. या घटनेचा पंचनामा ई-साक्ष ॲप्लिकेशन मोबाईलद्वारे करण्यात आला. या तिघाकडे भारतामध्ये येण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे नाहीत, पासपोर्ट नाही, तसेच सीमेवरील मुलकी अधिकाऱ्याची परवानगीही नाही असे चौकशीत आढळून आले.

**विनम्र अभिवादन**



श्री संताजी महाराज जगनाडे यांची आज पुण्यतिथी



तरुण भारतचे संस्थापक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांचा आज जन्मदिन

# डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर आज अन्त्यसंस्कार

## राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानांनी घेतले अन्त्यदर्शन

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

माजी पंतप्रधान आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी शासकीय इतमामात राजधानी दिल्लीत अंत्यसंस्कार केला जाणार आहे. मनमोहनसिंग यांचे गुरुवारी रात्री एम्समध्ये निधन झाले होते. बेशुध्दावस्थेत त्यांना रात्री ८ च्या सुमारास एम्समध्ये आणण्यात आले; मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नाला दाद न देता रात्री ९.५१ला त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

आज सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक मान्यवरांनी डॉ. मनमोहनसिंग यांच्या निवासस्थानी जात त्यांचे अन्त्यदर्शन घेतले. यानंतर राष्ट्रपती मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी सपत्नीक मनमोहनसिंग यांच्या पत्नी गुरशरण कौर आणि अन्य कुटुंबीयांची भेट घेतली.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांनी मनमोहनसिंग यांच्या निवासस्थानी जात त्यांचे अंत्यदर्शन घेतले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, विविध पक्षांच्या नेत्यांनी डॉ. मनमोहनसिंह यांचे अंत्यदर्शन घेतले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. मनमोहनसिंग यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या पार्थिवाचे अन्त्यदर्शन घेतले

**काँग्रेस मुख्यालयात आज पार्थिव ठेवणार**

डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी निगमबोध घाटावर शक्तिस्थल या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या समाधीस्थळाजवळ अन्त्यसंस्कार केले जाणार आहे. मनमोहनसिंग यांची एक मुलगी अमेरिकेत आहे, ती उद्या सकाळी दिल्लीत पोहोचत आहे. ती आल्यानंतर अन्त्यसंस्कार होणार आहेत. शनिवारी सकाळी डॉ. मनमोहनसिंग यांचे पार्थिव २४ अकबर या काँग्रेस मुख्यालयात सकाळी ८ वाजता अन्त्यदर्शनासाठी आणले जाणार आहे. येथूनच त्यांची अन्त्ययात्रा ९.३० वाजता निघणार आहे. (तभा वृत्तसेवा)

# बार्शीत भिशीच्या वादातून पत्नीची हत्या

## मुलावरही जीवघेणा हल्ला; खुनानंतर आरोपीचे पलायन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील नागोबाचीवाडी येथे भिशीच्या (बीसी) वादातून पतीने पत्नीचा गळा आवळून चाकू व दगडाने हल्ला करुन निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यावेळी पतीने मोठ्या मुलावरही चाकूने वार करुन त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे.

या प्रकरणी मुलगा समर्थ अनंत साळुंखे (वय १९) याने दिलेल्या फिर्यादीवरुन वडील अनंत रामचंद्र साळुंखे (रा. जावळे प्लॉट, बार्शी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेत मनिषा अनंत साळुंखे (वय ४४) हिचा मृत्यू झाला असून मोठा मुलगा तेजस अनंत साळुंखे (वय २१) गंभीर जखमी आहे. समर्थ साळुंखे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे कुटुंब चारजणांचे असून वडील अनंत शिकवणीचे काम करत होते आणि आई मनिषा शिवणकाम करत होती. कुटुंबाकडे नागोबाचीवाडी शिवारात २४ गुंठे शेती असून आईने काही ठिकाणी भिशी लावली होती. मात्र, भिशीतील काही लोक पैसे घेऊन पळून गेल्याने कर्जाचा बोजा वाढला. यामुळे अनंत साळुंखे सतत पत्नीला दोष देत होते. आर्थिक तणावामुळे घरात वाद होत होते. घटनेच्या आदल्यादिवशी (२६ डिसेंबर) भिशीचे पैसे मागायला काही लोक घरी आले होते. त्यामुळे अनंत यांनी मनिषाला शिवीगाळ करुन वाद घातला. आज २७ डिसेंबर रोजी सकाळी ६.१५ वाजता समर्थ झोपेतून उठल्यानंतर घरी मावशी कौशल्या राऊत यांच्यासोबत आई-वडील आणि भाऊ नसल्याचे दिसले. त्यानंतर ६.५० वाजता कौशल्या राऊत यांनी फोन करुन अनंत यांनी शेतात मनिषाची हत्या केल्याचे सांगितले. समर्थ नागोबाचीवाडीच्या शेतात पोहोचला असता, आई मनिषा जमिनीवर रक्ताने माखलेल्या अवस्थेत पडलेली होती. तिच्या जवळ दगड व चाकू आढळले. तेथील लोकांनी मनिषाला तातडीने ग्रामीण रुग्णालय बार्शी येथे दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच ती मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. गंभीर जखमी तेजसने समर्थला सांगितले की, वडिलांनी आईला गळ्याभोवती स्टोल ओढून चाकूने वार केले. आईला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना वडिलांनी त्याच्यावरही चाकूने वार केले. त्यानंतर तो घटनास्थळावरुन पळून गेला. पोलिसांचा पुढील तपास सुरु असून समर्थच्या फिर्यादीवरुन अनंत साळुंखे यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून बार्शी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. घटनास्थळी तालुका पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांनी भेट दिली.




## महत्त्वाचे

### सत्राअखेर बाजार तेजीत बंद

**मुंबई** : शुक्रवारी देशांतर्गत शेअर बाजारात निफ्टी सीरिजची सुरुवात झाली आहे. बाजार दिवसभर सकारात्मक राहिला आणि बंदच्या वेळीही वाढीसह बंद झाला. निफ्टीत ६३ अंकांची वाढ झाली, तर निर्देशांक २२६ अंकांनी वाढून ७८,६९९ वर बंद झाला. बाजारात विशेषत: ऑटो आणि फार्मा शेअर्समध्ये खरेदी झाली. तेल आणि नैसर्गिक वायूसह धातू निर्देशांकात घसरण झाली. बाजारातील तेजीमुळे बाजार भांडवल वाढून ४४२.३९ लाख कोटी रुपये झाले. म्हणजेच त्यात ३८ हजार कोटी रुपयांची वाढ झाली.



### भाजपाचा उद्यापासून दिल्ली निवडणुकीचा प्रचार प्रारंभ

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी २९ डिसेंबर रोजी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत. या आठवड्यात पंतप्रधान दोन रॅलीत सहभागी होणार आहेत. दुसरी रॅली ३ जानेवारीला होणार आहे. पंतप्रधान मोदी २९ डिसेंबर रोजी रिठाळा येथे नवीन मेट्रो लाईनची पायाभरणी करतील. सोबतच ते देशातील पहिल्या सेमी-हाय-स्पीड ट्रेन कॉरिडॉरच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटनही करणार आहेत. या प्रकल्पाला दिल्ली-मेरठ रॅपिड रेल प्रकल्प असेही म्हणतात. यानंतर मोदी रोहिणीच्या जपानी पार्कमध्ये सभेला संबोधित करतील. यासाठी पक्षाच्या दिल्ली युनिटने विभागीय अध्यक्षांना किमान दोन बसेस लोकांनी भरून आणण्यास सांगितले आहे. त्याच वेळी ३ जानेवारी रोजी कार्यक्रमात पंतप्रधान ईशान्य दिल्लीतील अनेक प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत.

# २६/११ हल्ल्यातील सूत्रधार हाफिज मक्कीचा हृदयविकाराने मृत्यू

**लाहोर, २७ डिसेंबर**

दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा उपप्रमुख अब्दुल रहमान मक्की याचा पाकिस्तानच्या लाहोरमध्ये शुक्रवारी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असलेला मक्की हा हाफिज सईदचा नातेवाईक आहे.



संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने मक्कीला जागतिक दहशतवादी घोषित केले होते, ज्या अंतर्गत त्याची संपत्ती जप्त करण्यात आली होती. याशिवाय मक्कीवर हवाई प्रवास आणि शस्त्रांस्त्रांवर निर्बंध लावण्यात आले होते. तो भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी होता. अब्दुल रहमान मक्की हा लष्कर-ए-तोयबाच्या कारवायांसाठी निधी जमा करायचा.

तो दहशतवादी हाफिज सईदचा मेहुणा आणि प्रतिबंधित जमात-उद-दावाचा उपप्रमुख होता. जमात-उद-दावाच्या मते, अब्दुल रहमान मक्की गेल्या काही दिवसांपासून आजारी होता आणि त्याच्यावर लाहोरमधील एका खाजगी रुग्णालयात उच्च मधुमेहावर उपचार सुरू होते. मक्कीला आज सकाळी हृदयविकाराचा झटका आला आणि रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला. मक्कीवर १६ जानेवारीला आयएसआयएल आणि अलकायदाशी संबंधित तसेच लष्कर-ए-तोयबाच्या पाठिंब्याने दहशतवाद्यांना पैसे पुरवणे, कट रचणे, त्यात सहभाग घेणे इत्यादी आरोप ठेवण्यात आले होते. हाफिज सईदचा मेहुणा मक्की याला पाकिस्तानच्या दहशतवादविरोधी न्यायालयाने २०२० मध्ये टेरर फंडिंग प्रकरणात ६ महिन्यांची शिक्षा ठोठावली होती. टेरर फंडिंगमध्ये शिक्षा सुनावल्यानंतर मक्कीने आपल्या हालचाली कमी केल्या होत्या. मक्की हा कट्टरपंथी इस्लामवादी पाकिस्तानी विचारसरणीचा समर्थक होता.

# सीए अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर

## दोन्ही गटांत २१ हजारांवर विद्यार्थी उत्तीर्ण

**नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडियाने (आयसीएआय) सीए अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. ६६,९८७ विद्यार्थ्यांनी सीए अंतिम परीक्षा दिली होती, त्यापैकी ११,२५३ विद्यार्थी गट-१ ची परीक्षा उत्तीर्ण झाले, तर ४९,४५९ विद्यार्थ्यांपैकी १०,५६६ विद्यार्थी गट-२ च्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

गट-१ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी १६.८, तर गट-२ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी २१.३६ होती. यात दोन्ही गटांतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या १३.४४ टक्के होती.

हैदराबादच्या हेरंब माहेश्वरी आणि ऋषभ ओसवाल यांना ५०८ म्हणजे ८४.६७ टक्के गुण मिळाले आहेत आणि दोघांनाही ऑल इंडिया रँक वन मिळाला आहे. अहमदाबादच्या रिया कुंजनकुमार शाहने ५०१ गुण किंवा ८३.५० टक्के मिळवून दुसरा क्रमांक पटकावला. कोलकात्याची किंजल अजमेराने ४९३ म्हणजे ८२.१७ टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला.

सीएची अंतिम परीक्षा नोव्हेंबरमध्ये झाली. गट १ ची परीक्षा ३, ५ आणि ७ नोव्हेंबर रोजी, तर गट २ची परीक्षा ९, ११ आणि १३ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली.

# टिपेश्वरच्या वाघाची आता सोलापुरात डरकाळी!

**पांढरकवडा, २७ डिसेंबर**

वाघाचे साम्राज्य तो स्वत: निर्माण करतो. तो जिथे जातो, तिथे आपला अधिवास निर्माण करतो. वाघाला ना राज्याचे बंधन असते ना देशाचे. असाच एक टिपेश्वर अभयारण्यातील तारुण्याच्या उंबरठ्यावरील वाघ आता लांबदूर अशा सोलापूरच्या वनविभागात सध्या डरकाळी फोडत आहे.

सोलापूरच्या बार्शी तालुक्यात या वाघाने डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीस मोठी दहशत निर्माण केल्याने वनविभागाने अनेक ठिकाणी कॅमेरे लावत शोध घेतला असता, हा वाघ या कॅमेऱ्यात कैद झाला. तेथील येडशी रामलिंग घाट अभयारण्यात सध्या त्याने बस्तान मांडले आहे.

सोलापूर वनविभागाने घेतलेले छायाचित्र पडताळणीसाठी डेहराडूनच्या भारतीय वन्यजीव संस्थेकडे पाठविले. या संस्थेने शेकडो वाघांची चित्रे तपासून हा वाघ पांढरकवडा परिसरातील टिपेश्वर अभयारण्यातील असल्याचे सूचित केले.

# कापूस बियाणे पाकिटासोबत माहितीपत्रक जोडावे : गडकरी

**यवतमाळ, २७ डिसेंबर**

कापूस बियाण्यांसोबत कापूस उत्पादनाबाबतचे मूलभूत माहितीपत्रक जोडण्याची नियमांमध्ये तरतूद करण्यात यावी तसेच या पाकिटावर कापसाची उत्पादकता, किलो प्रतिहेक्टर व खताची मात्रा आणि वेळापत्रक नमूद करावे, अशी मागणी करणारे पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना पाठविले आहे.



शेतकरी संघटनेचे माहिती व तंत्रज्ञान आघाडी प्रमुख मिलिंद दामले यांनी हा विषय सविस्तरपणे समजावून सांगितल्यानंतर, त्यातील गांभीर्य लक्षात घेऊन गडकरींनी हा विषय केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे लावून धरला आहे.

कापसाचे जागतिक क्षेत्र ३ कोटी १९ लाख ८२ हजार हेक्टर आहे, तर भारत आणि महाराष्ट्राचे क्षेत्र अनुक्रमे १ कोटी ३१ लाख ६१ हजार आणि ४२ लाख २९ हजार हेक्टर आहे. जागतिक कापूस क्षेत्राच्या तुलनेत भारताचे कापूस क्षेत्र ४० टक्के आहे. भारताच्या कापूस क्षेत्रात महाराष्ट्राचे क्षेत्र ३३ टक्के आहे, अशी माहिती त्यांनी दिली. बी. टी. कापसात कीड नियंत्रणासाठी कार्यक्षमता कालावधी नमूद करायला हवा. शेतकऱ्यांना कापूस बियाणे निवडीबाबत पाकिटावरील लेबल मार्गदर्शन करीत नाही. शेतकरी कृषी विक्रेत्याचा सल्ला व जाहिराती वाचून बियाणे निवडतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. माहिती नसल्यामुळेच शेतकरी जास्तीचे पैसे देऊन चुकीचे बियाणे निवडतात. शेतजमिनीच्या गुणधर्मासोबत बियाण्यांचे गुणधर्म सुसंगत नसल्याने नापिकी होते. कापूस कोरडवाहू की सिंचित ही माहिती आवश्यक आहे. कोरडवाहू वाणाला सिंचन केल्यास कापसाचे पाते, फूल व बोंड गळतात, हेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. विदर्भात मध्यम ते खोल काळ्या जमिनीत कोरडवाहू कापसाचा १८० ते २१० दिवसांचा आणि हलक्या जमिनीत १२० ते १५० दिवसांचा वाण आवश्यक आहे.

# २०२४ आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष!

## उष्मा ४१ दिवसांनी वाढला ▸ ३,७०० हून अधिक लोकांचा मृत्यू

**नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

२०२४ मध्ये हवामान बदलामुळे जगभरातील उन्हाळ्याच्या दिवसांच्या संख्येत ४१ दिवसांची वाढ झाली. याबाबतचा नवीन संशोधन अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. वर्ल्ड वेदर ॲट्रिब्युशनचे प्रमुख डॉ. फ्रेडरिक ओट्टो म्हणतात, २०२४ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष राहिले. या काळात ३,७०० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला.



जगभरातील लाखो लोकांना उष्णता आणि संबंधित आजारांमुळे विस्थापित व्हावे लागले. वातावरणातील बदलामुळे पूर, वादळ आणि दुष्काळामुळेही लोकांना समस्यांना सामोरे जावे लागले. जोपर्यंत जग जीवाश्म इंधन जाळत राहील, तोपर्यंत हवामान बदलाची समस्या वाढत जाईल. दरवर्षी तापमानात २ अंश सेल्सिअसने वाढ होत राहिल्यास २०४० पर्यंत परिस्थिती गंभीर होऊ शकते, असेही संशोधनात सांगण्यात आले.

**जनजागृती आवश्यक** : क्लायमेट सायन्सच्या उपाध्यक्ष क्रिस्टीना डहल यांच्या मते, जगातील कमी लोकसंख्या असलेल्या आणि कमी विकसित देशांमध्ये अशा घटनांचा प्रभाव जास्त असतो. हवामान बदलाची समस्या टाळण्यासाठी लोकांनी जागरूक होण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने असा इशारा दिला की, जर कोणतीही कारवाई केली नाही, तर हवामान बदलाच्या घटनांमध्ये आणखी वाढ होऊ शकते, कारण, या वर्षी जीवाश्म इंधन जाळल्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा जास्त कार्बन डायोक्साईड वातावरणात पाठविला गेला आहे, ज्यामुळे मृत्यू होत आहेत.

**नैसर्गिक आपत्तीमुळे हजारो लोक मरण पावले**

आफ्रिकन देश सुदान, नायजेरिया आणि कॅमेरूनमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे दोन हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. तीव्र उष्णतेने उत्तर कॅलिफोर्निया आणि डेथ व्हॅलीमध्येही कहर केला. दक्षिण आणि दक्षिण-पूर्व आशियाई देशांमध्ये तीव्र उष्णतेमुळे शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### विज्ञान प्रदर्शनात निर्मलाताई ठोकळ महाविद्यालयाचे यश

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका शिक्षण विभाग आणि माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात निर्मलाताई ठोकळ महाविद्यालयाने यश संपादन केले आहे. स्पर्धेत ९० शाळांनी सहभाग नोंदवून आपले प्रकल्प सादर केले होते त्या प्रकल्पापैकी इलेक्ट्रिसिटी जनरेशन फ्रॉम मॅग्नेटिक फिल्ड हे प्रकल्प उत्कृष्टपणे चिरंजीव वैभव समाधान धुमाळ याने सादर केले होते त्या प्रकल्पाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रा रोहित मंजन होटकर .यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ,संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डी.डी. गाजरे व पालक यांनी अभिनंदन केले.

### खूनप्रकरणातील आरोपीस उच्च न्यायालयातून जामीन

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

दशरथ नारायणकर याचा प्रियकराच्या मदतीने खून केल्याप्रकरणी बाबासाहेब जालिंदर बाळशंकर यांस मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जमादार यांनी जामीन मंजूर केला. यात हकीकत अशी की, मयत दशरथ याची पत्नी अरुणा हिचे बाबासाहेब बाळशंकर यांच्यासोबत प्रेमसंबंध होते. २१ सप्टेंबर २०२२ रोजी अरुणा व तिची मुलगी रात्री साडेआकराच्या सुमारास झोपी गेले होते, त्यावेळी अरुणा हिस मोठा आवाज आला असता, ती पाहण्यासाठी गेली असता तिचा पती दशरथ हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला, तिने आरडा ओरडा केला असता, तो मारणारा इसम तेथून पळून गेला. याबाबतची फिर्याद मयताची पत्नी अरुणा हिने एम आय डी सी पोलीस ठाण्यात दिली होती. तपासाअंती आरोपी बाबासाहेब व मयताची पत्नी अरुणा यांच्यात संबंध असल्याचे दिसून आले. त्यावरून पोलिसांनी मयताच्या पत्नीस देखील आरोपी केले होते. १७ डिसेंबर २०२२ रोजी पोलिसांनी तपास करून दोघांविरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. त्यावर आरोपी बाबासाहेब याने आपणास जामीन मिळावा म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर आरोपी बाबासाहेब याने मुंबई उच्च न्यायालयात जामीन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद मान्य करून न्यायमूर्तींनी एक लाख रुपयाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे पी.पी.भोसले यांनी तर आरोपीतर्फे ॲड.रितेश थोबडे यांनी काम पाहिले.

### सोलापुरात ई-बाईक शोरूमचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

ओला ई-बाईकचं महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे एका चार्जींगमध्ये १९५ कि.मी.चं मायलेज असून बॅटरीवर ८ वर्षांची हमी देण्यात आली असल्याची माहिती ओला कंपनीचे क्लस्टर मॅनेजर अविनाश कोडपाक यांनी दिली.सोलापुरातील भवानी पेठ,मड्डी वस्ती परिसरातील सुप्रसिद्ध देवस्थान दत्त मंदिरचे पुजारी आनंद हिरेमठ यांच्या हस्ते ओला' ई-बाईक शोरूमचे बुधवारी सकाळी उद्घाटन करण्यात आले.भारतातील सर्वात मोठी प्युअर प्ले ईलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) कंपनी असलेल्या ओला इलेक्ट्रिकने संपूर्ण भारतात ४,००० स्टोअरच्या माध्यमातून आपल्या विस्ताराची घोषणा केली.त्यामुळे तिच्या सध्याच्या नेटवर्कमध्ये चार पटींनी वाढ होणार आहे.ओला इलेक्ट्रिकचे भाविश अगरवाल म्हणाले,आजचा दिवस भारतातील ईव्हीच्या प्रवासातील एक मैलाचा दगड आहे,कारण आम्ही आमचे नेटवर्क प्रत्येक शहर,गाव आणि तालुक्यापर्यंत विस्तारले आहे.

## विडी कामगार महिलांना हक्काच्या पैशासाठी पाहावी लागतेय वाट

- कामगार संघटनांचे हाताची घडी, तोंडावर बोट..!
- अधिकारी, कर्मचारी आपल्याच विश्वात मश्गुल..!



**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि. २७ डिसेंबर-**

वयोमानपरत्वे, आर्थिक अडचण, लग्नकार्य किंवा अन्य काही कारणामुळे राजीनामा देणाऱ्या विडी कामगार महिलांना नियमानुसार मिळणाऱ्या हककाच्या पैशासाठी वाट पाहावी लागत आहे. त्यामुळे विडी कामगार महिलांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

विडो कामगार महिलांचे प्रत्यक्ष वय आणि कारखान्यामध्ये नोंद केलेले वय यात तपावत आढळून येते. वयामध्ये तपावत, चुकीची जन्मतारिख, नादुरुस्त आधारकार्ड, बँक पासबुक असे विविध कारणे दाखवत वारंवार हेलपाटे मारावयास लावले जाते.

विडी उद्योगात काम करणाऱ्या महिला ह्या निरक्षर, अल्पशिक्षित आहेत. त्यांची मातृभाषा तेलुगु असल्याने त्यांना मराठी नीट बोलता येत नाही. त्यामुळे विडी कारखान्यातील मॅनेंजर, चेकर्स, शासकीय अधिकारी आपलंच म्हणणं खरं करतात, असे सांगण्यात येते.

एखादी विडी कामगार महिला याबाबत विचारले असता उलट तिच्यावर खेकसतात. प्रसंगी शाब्दिक मारा करत तिचे चारचौघात अपमान करतात. परंतु संसाराचा भार पेलण्यासाठी काम व पैशाची गरज असल्याने अशा गोष्टी त्या सहन करत असतात. आंदोलने, मोर्चे, निवडणुका अशावेळी गर्दी करण्यासाठी अधिकारवाणीने सांगणाऱ्या कामगार संघटना याप्रश्नात मात्र हाताची घडी, तोंडावर बोट ठेवत असल्याने त्यांचा लढा हा कामगारहितासाठी की अन्य कशासाठी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. हककाचे पैसे मिळविण्यासाठी भविष्य निधी कार्यालय, इतर कार्यालयकडे चकरा मारताना शारिरिक, मानसिक, आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. परंतु तेथील कर्मचारी तक्रारीकडे लक्ष न दता आपल्याच विश्वात मश्गुल असतात, असे सांगण्यात येते.

# अबब..चौपाडात तब्बल ७ टन प्लास्टिक जप्त

- अतिरिक्त आयुक्त पवारांची सिंघम स्टाईलने कारवाई
- शुक्रवारी प्लास्टिक विरोधी रेकॉर्ड ब्रेक कारवाई
- १७ दुकानांवरील कारवाईत ९० हजाराचा दंड वसूल
- प्लास्टिक विक्रेत्यांमध्ये उडाली खळबळ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

महापालिका घनकचरा विभागाच्या वतीने प्लास्टिक विरोधी बेधडक मोहीम सुरू आहे. आज महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी थेट बाजारपेठेत जाऊन सिंघम स्टाईल धडाकेबाज कारवाई केली. चौपाड येथील एका प्लास्टिक गोडाऊनवर धाड टाकून तब्बल सात टन प्लास्टिक जप्त केले. दरम्यान, आज शुक्रवारी महापालिकेच्या पथकाने शहरात रेकॉर्ड ब्रेक कारवाई केली. एकूण १७ दुकानांवर कारवाई करत ९० हजार रुपये दंड वसूल केला आहे. यामुळे प्लास्टिक विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली नियोजनपूर्वक प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. आज शुक्रवारी महापालिकेच्या पथकाने रेकॉर्ड ब्रेक अशी प्लास्टिक विरोधी कारवाई केली. सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरातील व्यापारी व नागरिक यांना वेळोवेळी जाहीर आवाहन व प्रसिद्धीकरण देऊनही शहरात मोठ्या प्रमाणावर बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकची विक्री व वापर होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी थेट बाजारपेठेत जाऊन पथकासह बंदी असलेल्या प्लास्टिकच्या गोडाऊन वर कारवाई केली. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सिंघम स्टाईल बेधडक ही कारवाई केली. चौपाड परिसरात असलेल्या जुन्या विठ्ठल मंदिर जवळील एका अपार्टमेंटमधील अरिहंत प्लास्टिकच्या गोडाऊनवर ही धाड टाकण्यात आली. दुपारी ४.२० च्या सुमारास अतिरिक्त आयुक्त पवार यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या पथकाने ही कारवाई केली. या गोडाऊनमध्ये बंदी असलेले प्लास्टिकचे अनेक पोते आढळून आले. या ठिकाणी प्लास्टिकच्या कॅरीबॅग, ग्लास, चमचे, प्लेट्स यासह बंदी असलेले इतर प्लास्टिक निदर्शनास आले. एकूण सात टन प्लास्टिक या गोडाऊन मधून जप्त करण्यात आले. शहा यांच्या अरिहंत प्लास्टिक गोडाऊनला दहा हजार रुपये दंड आकारण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या प्लास्टिकची किंमत सुमारे पाच लाख इतकी आहे. अचानक टाकण्यात आलेल्या या धाडीमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

संपूर्ण शहरात घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक यांचेकडून ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. मोहिमेत अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या समवेत मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, सुर्यकांत लोखंडे, बाबासाहेब इंगळे,आरोग्य निरीक्षक राजशेखर वनारोटे, विठोबा शिंदीबंदे, सुनील राठोड, शेषराव शीरसट आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कर्मचारी सहभागी झाले होते.

**१४८ दुकानांची तपासणी; १७ दुकानांवर दंडात्मक कारवाई**

महापालिकेच्या पथकाकडून शहरात शुक्रवारी गुरुनानक चौक, नवी पेठ, जुना विडी घरकुल, सुनील नगर एमआयडीसी, बनशंकरी चौक, नीलम नगर रोड, भारती विद्यापीठ रोड ते दावत चौक, कोंतम चौक ते बाळीवेस , चौपाड विठ्ठल मंदिर जवळ आदी परिसरातील आस्थापना तपासण्यात आल्या. या मोहिमेत एकूण १४८ दुकाने तपासण्यात आली. त्यापैकी १७ दुकानांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत एकूण ९० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. सुमारे ७ हजार २९ किलो बंदी असलेले प्लास्टिक जप्त करण्यात आले.

**अन्यथा दंडात्मक अन् फौजदारी कारवाई : रवी पवार**

शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिकचा उत्पादन, वापर, विक्री, हाताळणी, वाहतूक व साठवणूक करू नये व वापरताना आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाईल, असा इशारा अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी दिला आहे.

## सोलापुरात राष्ट्रीय स्तरावर मल्टि-मेगा इव्हेंट

**३ ते ५ मार्च दरम्यान कार्यक्रमाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सिंहगड संस्थेच्या पुढाकाराने सोलापुरात प्रथमच विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी ३ ते ५ मार्च असे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावर मल्टिमेगा कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. या अनुषंगाने पहिली बैठक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठमध्ये बैठक पार पडली.

हा कार्यक्रम स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि भारत सरकारच्या कृषी मंत्रालयातंर्गत डाळिंब राष्ट्रीय संशोधन केंद्र (छठउझ) यांच्या सहकार्यातून होत आहे. कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत विद्यापीठात कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या तीन राज्यातील नागरिकांना या कार्यक्रमाचा फायदा होणार आहे.

यावेळेस सिंहगड संस्थेच्या सेंटर फॉर रिसर्च ड डेव्हलपमेंट (सीआरटीडी) चे संशोधन संचालक, माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजी पवार, सिंहगड इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, राष्ट्रीय अनार संशोधन केंद्र चे संचालक डॉ. राजीव मराठे, डॉ. नम्रता गिरी, सोलापूर विद्यापीठामार्फत डॉ. बी. जे लोखंडे , डॉ. व्ही.बी. पाटील यांची उपस्थिती होती. यावेळेस सकारात्मक चर्चा झाली. डॉ. शिवाजी पवार यांनी पीपीटीद्वारे तीन दिवसातील विविध कार्यक्रमाविषयी माहिती दिली. नवीकरणीय ऊर्जा आणि कृषी-जैविक संसाधनांच्या विशेष संदर्भात तंत्रज्ञानाच्या वापरासाठी साहित्य अभियांत्रिकीवर राष्ट्रीय परिषद, नवीकरणीय ऊर्जा आणि कृषी-जैविक संसाधन तंत्रज्ञानाचे औद्योगिक प्रदर्शन आणि व्यापार शो. (प्रदर्शन, प्रात्यक्षिक आणि विक्री), शेतकऱ्यांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम, जिल्हा रेशीम विभाग, सोलापूर तर्फे तुतीसह ग्रामीण समुदायांचे सक्षमीकरण या प्रकल्पाचा शुभारंभ, विद्यार्थ्यांचे विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रदर्शन, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च (क्विझ स्पर्धा), शेतकऱ्यांसाठी मूल्यवर्धित उत्पादनावर कार्यशाळा, विकसित भारत-२०४७ साठी शास्त्रज्ञांशी संवाद आदी कार्यक्रम होणार आहेत. या बैठकीत कार्यक्रम प्रभावी होण्यासाठी समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. प्रदर्शन समिती, डॉ. पी.पी. तपकीरे, डॉ.व्ही.एस. बिरादार यांची निवड केली आहे. कृषी जागृती समितीत डॉ. राजीव मराठे, डॉ. नम्रता गिरी, डॉ. निलेश गायकवाड, परिषद जागरूकता आणि पीएच.डी विद्यार्थ्यांचा सहभाग समितीत डॉ. बी. जे. लोखंडे यांची निवड केली आहे. शाळा आणि महाविद्यालयात परिषद जागृती समितीत डॉ. के. एस. पाटील, उद्योग समिती मध्ये परिषद जागरूकतामध्ये डॉ. आर.टी. व्यवहारे, प्रतिभा शोध समितीत डॉ. एस. एच. क्षीरसागर, शास्त्रज्ञ भेट समितीत डॉ. व्ही. व्ही. खरात, परिषद कार्यक्रम समितीत डॉ. एस. एस. शिरगण, शासक सशक्तीकरण समितीत डॉ. जी. एस. कांबळे, स्मरणिका समितीत डॉ. आय एम चंदरकी, उष्मायन केंद्र समितीत प्रा. व्ही. बी. पाटील तर प्रसिद्धी आणि माध्यम समितीत प्रा. एच.टी. गुरमे आणि रामकृष्ण लांबतुरे यांची निवड करण्यात आली आहे.

## शहरात वेगवेगळ्या घटनांमध्ये महिलेसह चौघांच्या गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सोलापूर शहरात एकाच दिवशी वेगवेगळ्या घटनांमध्ये एका महिलेसह चौघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्या.

अंबादास शेखर यलदंडी (वय २८, रा. विनायक नगर, सोलापूर) याने २७ डिसेंबर रोजी दुपारी दोनच्या पूर्वी राहत्या घरी अज्ञात कारणावरून दोरीच्या सहाय्याने पत्र्याच्या अँगलला गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे यलदंडी यास एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार एस ए मुजावर यांनी बेशुध्दावस्थेत खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी यलदंडी यास मृत घोषित केले. राहुल बाबूराव संगेपाग (वय ३५, रा. वॉटरफ्रंट अपार्टमेंट, पत्रकार भवन चौक, सोलापूर) यांनी २७ डिसेंबर रोजी सकाळी १० च्या पूर्वी राहत्या घराताल पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार एम एच वाघमारे यांनी राहुल संगेपाग यांस बेशुध्दावस्थेत खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी राहुल संगेपाग यांस मृत घोषित केले. युवराज शाम जिंदम (वय २६, रा. जोडभावी पेठ, एस के बारजवळ, सोलापूर) याने २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेसहाच्या पूर्वी राहत्या घरातील सिलींग फॅनला दोरीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरून गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे नातेवाईकांनी युवराज यास बेशुध्दावस्थेत खाली उतरवून उपचारासाठी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार आर डी दुधाळे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.



त्यावेळी डॉ. राजदिपसिंह भिसे यांनी युवराज यास मृत घोषित केले. अंबिका रमेश कोलापल्ली (वय २८, रा. विडी घरकुल, कुंभारी) या महिलेने २७ डिसेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास राहत्या घरी छताच्या फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यावेळी वळसंग पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार व्हि एस मोरे यांनी अंबिका यांना बेशुध्दावस्थेत खाली उतरवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी अंबिकास मृत घोषित केले. या सर्व घटनांची नोंद सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## महापालिकेतील १९ चावीवाले, शिपाई यांना सेवेत कायम करा

**कामगार संघटना कृती समितीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

महापालिका परिवहन रोजंदारी कारकून सेवकाप्रमाणे परिवहनकडीलच १९ चावीवाले, शिपाई यांना सेवेत कायम करावे अशी मागणी सोलापूर महानगरपालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने निवेदनाद्वारे उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे केली आहे.



कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्तांच्या कार्यालयात हे निवेदन देण्यात आले. महापालिकेने सन १९९५ नंतरच्या रोजंदारी सेवकांना कायम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. उपसचिव यांचे पत्र महापालिकेस प्राप्त झाले आहे. त्या पत्रातील १ ते ४ प्रश्न महापालिकेस खुलासा विचारले आहे. त्यापैकी प्रश्न २ चे उत्तर किंवा खुलासा सो.म.न.पा. प्रशासनाने नगरविकास विभाग, मुंबई यांची दिशाभूल करणारा आणि वस्तुस्थिती लपविणारा आहे, असा आरोप निवेदनात केला आहे. सोलापूर महानगरपालिकेतील दि.६ एप्रिल १९९५ पूर्वीच्या विविध संवर्गीतील रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्याचा ५७२ चा दुसऱ्या आणि ८६४ च्या तिसऱ्या टप्प्यात रोजंदारी कारकून एकूण २६ उमेदवार परिवहनकडेच कार्यरत असताना त्यांना सोलापूर महानगरपालिकेत सन २००३ आणि सन २००८ मध्ये सेवेत कायम केले ही वस्तुस्थिती आहे. मग दिनांक १ जुलै १९८७ ते दि.८ जून १९९३ पासून (दि.६ एप्रिल १९९५ पूर्वीचे) परिवहन कडे कार्यरत असताना त्याना दि.४ जून २०१० पासून सार्वजनिक आरोग्य अभियंता यांचेकडे चावीवाला म्हणून ठेवण्यात आले. आजही १९ रोजंदारी चावीवाले, शिपाई सलग काम करीत आहेत. त्यांना सन २००८ मध्येच तिसऱ्या टप्प्यात कायम करणे गरजेचे असताना दि. ४ जून२०१० परिवहन कडून सो.म.न.पा. मध्ये वर्ग केल्याची तारीख ग्राह्य धरून दि.६ एप्रिल १९९५ नंतरच्या प्रतिक्षा यादीत घेवून त्यांचेवर घोर अन्याय केलेला आहे. रोजंदारी कायम करणेच्या दुसऱ्या, तिसऱ्या टप्प्यात परिवहन कडीलच २६ रोजंदारी कारकुनांना कोणत्या निष्कर्षावर सेवेत कायम केले? तेव्हा सन २००८ पासून चावीवाल्यांना सुद्धा सेवेत कायम करून त्यांची सेवा सलग करण्याचे आदेश व्हावेत याबाबतीत सोलापूर महानगरपालिका कामगार संघटना कृती समिती सोबत बैठक घेण्यात यावी, अशी मागणी अध्यक्ष अशोक जानराव यांनी केली आहे. यावेळी शशी शिरसट, संगा आहेरकर, लक्ष्मण हलसगी, अलकुंटे आदी उपस्थित होते.

## संशोधन महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कल्पनांचा आविष्कार : कुलगुरु महानवर

**‘आविष्कार २०२४’ विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सवास सुरुवात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

दैनंदिन मुलभूत गरजा आणि वारंवार येणाऱ्या समस्यांवर शाश्वत उपाय शोधणे म्हणजेच वैज्ञानिक संशोधन म्हणता येईल. विद्यापीठ आणि महाविद्यालयस्तरावर आयोजित अशा संशोधन महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या नवनव्या कल्पनांचा आविष्कार होत असतो. सर्वसमावेशक समस्यां निवारणाची कल्पकता पुढे आणणे हेच या संशोधन महोत्सवाचा उद्देश असल्याची भूमिका पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर प्रकाश महानवर यांनी मांडली.



भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे सभागृह दोन मिनिटे मौन ठेऊन दुखवट्यात विद्यापीठाच्यावतीने वालचंदमध्ये आयोजित ‘आविष्कार २०२४’ विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सवास सुरुवात करण्यात आले. वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त श्री वैभव गांधी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी विभागप्रमुख प्रो. प्रवीण सप्तर्षी, माजी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्यासह अविष्कार २०२४ समन्वयक डॉ. सतीश काशीद, डॉ. रश्मी दीक्षित आदी उपस्थित होते.

या महोत्सवात पदवी, पदव्युत्तर आणि पीच.डी. स्तरावरील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांचे विविध स्तरांवरील संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले असून, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधनाची झलक पाहण्याची संधी २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत सर्वांसाठी निःशुल्क खुले असणार आहे. प्रकल्पांचे सादरीकरण, चर्चासत्रे आणि प्रदर्शन या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाला नवी दिशा प्राप्त करण्यासाठी विद्यार्थी वर्ग आणि वैज्ञानिक संशोधकप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले.


## पुरुषोत्तम बन्ने खूनप्रकरण; विजय आडकेचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

शहरातील बाळे परिसरातील शेतीच्या वादातून पुरुषोत्तम बन्ने यांच्या खूनप्रकरणातील आरोपी विजयकुमार आडके याचा जामीन अर्ज मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश एम एस आझमी यांनी फेटाळला.

विजयकुमार उर्फ बाळू शांतप्पा आडके (वय ३२, रा. पाटील गल्ली, देगाव, ता. उत्तर सोलापूर) असे जामीन अर्ज फेटाळलेल्याचे नाव आहे. पुरुषोत्तम उर्फ आप्पा दिगंबर बन्ने (वय ४५, रा. उत्तर कसबा, पत्रा तालीम जवळ, सोलापूर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत जखमी देविदास दिगंबर बन्ने (वय ४२, रा. उत्तर कसबा, पत्रा तालीम जवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन शांतप्पा आडके, सागर आडके, बाळू आडके (सर्व रा. देगाव, ता. उत्तर सोलापूर) आणि त्यांच्या ७ ते ८ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाळे येथील शेती गट नं. ४१/३ मध्ये शुक्रवारी शासकीय मोजणी करीत असताना शांतप्पा आडके, सागर आडके, बाळू आडके व त्यांच्या इतर साथीदारांनी ही शेती आमची आहे, मोजणी करायची नाही, नाही तर एकेकाला सोडणार नाही, या हरामखोरांना संपवू असे म्हणून हातातील लोखंडी पाईपने पुरुषोत्तम बन्ने यांना डोक्यात, दोनाही हातापायावर, कमरेवर व शरीराच्या इतर भागांवर जबर मारहाण करून त्यांचा खून केला. तर देविदास बन्ने यांसदेखील लोखंडी पाईपने खांद्यावर, पायावर जबर मारहाण करण्यात येऊन जखमी करण्यात आले. याप्रकरणी देविदास बन्ने यांच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात सर्व आरोपींना पोलिसांनी अटक करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी विजयकुमार आडके याने जामीनासाठी अर्ज दाखल केला होता.



याची सुनावणी मुख्य न्यायाधीश आझमी यांच्यासमोर झाली. यावेळी सरकारी पक्षाच्यावतीने वैदयकिय अधिकारी यांचा अहवाल, आरोपीकडून जप्त केलेले हत्यारे, नेत्र साक्षीदारांचे जबाब, फौजदारी प्रक्रिया संहितेचा १६४ प्रमाणे साक्षीदारांचे जबाब, निवेदन पंचनामे इतका भक्कम पुरावा सरकारकडे उपलब्ध असल्याचे सांगितले आणि तसेच आरोपी व मयत यांच्यातील पुर्व वैमनस्य व यातील आरोपींच्या नावे सोलापूर शहरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये नोंद असलेले गून्हे हे ही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला आहे, अशा परिस्थितीत अर्जदाराची जामिनावर सुटका झाली तर तो दूर पळून फरार होईल. आरोपी हे अट्टल गुन्हेगार असल्याने ते फिर्यादी साक्षीदारांवर दबाव आणतील, खटल्याच्या वेळी ते न्यायालयात हजर राहणार नाही, आरोपीवर यापुर्वी एक व त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकारचे गुन्हे आरोपीकडून पुन्हा पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही असा युक्तीवाद सरकार पक्षाच्यावतीने करण्यात आला. तो मान्य करीत न्यायालयाने आडके याचा जामीन अर्ज फेटाळला. याप्रकरणी सरकारच्यावतीने जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी तर आरोपींच्यावतीने ॲड. संतोष न्हावकर, ॲड. शहानवाज शेख, ॲड. राहूल रूपनर, ॲड. शैलेश पोटफोडे काम पाहात आहेत.

CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २८ डिसेंबर २०२४ ।

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

# हजारो जवाबों से अच्छी है मेरी खामोशी...





**'हजारों जवाबों से अच्छी है मेरी खामोशी...'** २७ ऑगस्ट २०१२ रोजी संसदेच्या संकुलात ही कविता वाचणारे मनमोहन कायमचे नि:शब्द झाले. माजी पंतप्रधान पद्मविभूषण डॉ. मनमोहनसिंग यांनी २६ डिसेंबर रोजी दिल्लीतील एम्समध्ये अखेरचा श्वास घेतला. नेहमी आकाशी निळ्या रंगाची पगडी घालणारे मनमोहनसिंग यांनी २२ मे २००४ रोजी भारताचे १४ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यांना 'ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' असे संबोधण्यात आले, पण मनमोहनसिंग यांनी केवळ पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला नाही, तर पुढच्या वेळीही सरकारमध्ये परतले. प्रगल्भ अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंग राजकारणी बनले, तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक न पाहिलेले पैलू समोर आले. संसदेचे अधिवेशन सुरू असताना मनमोहनसिंग सरकारवर कोळसा खाण वाटपात भ्रष्टाचाराचे आरोप झाले. तेव्हा मनमोहनसिंग म्हणाले की, कोळसा खाण वाटपाबाबत कॅगच्या अहवालात करण्यात आलेले अनियमिततेचे आरोप वस्तुस्थितीवर आधारित नाहीत आणि पूर्णपणे निराधार आहेत. लोकसभेत निवेदन दिल्यानंतर त्यांनी संसद भवनाबाहेर माध्यमांनाही निवेदन दिले. त्यांच्या 'मौना'वर टोमणा मारणाऱ्यांना प्रत्युत्तर देताना त्यांनी 'हजारों जवाबों से अच्छी है मेरी खामोशी, न जाने कितने सवालों की आबरू रखी...' हा शेर म्हणून दाखवला.

## मनमोहनसिंग म्हणाले, मी 'ॲक्सिडेंटल फायनान्स मिनिस्टरही'!

२०१९ मध्ये माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांचे 'चेंजिंग इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी मनमोहनसिंग म्हणाले होते, मला देशात 'ॲक्सिडेंटल पीएम' म्हटले गेले. मला तर वाटते की, मी 'ॲक्सिडेंटल अर्थमंत्री'ही होतो. त्यांचा एक व्हिडीओ व्हायरल होतो, ज्यात मनमोहनसिंग यांनी, ते अर्थमंत्री कसे झाले, याबाबत सांगितले होते. मनमोहनसिंग म्हणाले, पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार होते. मी माझ्या कार्यालयात बसलो होतो. त्यांनी मला फोन केला, मला विचारले की, तुम्ही कुठे आहात? मी त्यांना सांगितले, मी माझ्या कार्यालयात बसलो आहे. त्यावेळी त्यांचे उत्तर आले की, तुम्हाला मंत्रिपदाची शपथ घ्यायची आहे. मी मंत्री होणार आहे, हे मला त्यावेळी खरे वाटले नव्हते. आता त्यांचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.



## जागतिक माध्यमांची प्रतिक्रिया

मनमोहनसिंग यांच्या निधनानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांसह जगभरातून त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मनमोहनसिंग यांच्या निधनाची जगभरातील प्रसार माध्यमांनी दखल घेतली असून, अनुत्सुक पंतप्रधान आणि भारतातील आर्थिक सुधारणांचे शिल्पकार म्हणून त्यांचे वर्णन केले आहे.

### 'मृदुभाषी' आणि 'प्रतिभावान'

अमेरिकेतील 'न्यू यॉर्क टाईम्स' या वृत्तपत्राने डॉ. मनमोहनसिंग यांचे 'मृदुभाषी' आणि 'प्रतिभावान' असे वर्णन केले आहे. न्यू यॉर्क टाईम्सने वृत्तात म्हटले आहे की, माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्यामुळे भारत चीनशी स्पर्धा करण्यास सक्षम आर्थिक शक्तिस्थान म्हणून उदयास आला. अमेरिकेची वृत्तसंस्था असलेल्या 'असोसिएटेड प्रेस'ने डॉ. मनमोहनसिंग यांनी अर्थमंत्री असताना १९९१ मध्ये केलेल्या आर्थिक सुधारणांमुळे भारतावरील संभाव्य आर्थिक संकट कसे दूर झाले, यावर प्रकाश टाकला.

'वॉशिंग्टन पोस्ट'ने डॉ. मनमोहनसिंग यांच्यामुळे गरिबीने ग्रासलेल्या देशाचे उगवत्या शक्तीत कसे रूपांतर झाले, याबाबत लिहिले आहे. वॉशिंग्टन पोस्टने म्हटले आहे की, अनेक भारतीय नेते भारी-भारी कपडे आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये वारंवार जेवणासाठी कुप्रसिद्ध असताना, साध्या कपड्यांसह आणि जाड काळ्या शूजसह ते काटकसरीचे जीवन जगले.

### आर्थिक सुधारणांचे शिल्पकार

बीबीसीने मनमोहनसिंग यांचे आर्थिक सुधारणांचे शिल्पकार म्हणून वर्णन केले आहे. डॉ. मनमोहनसिंग यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ती महत्त्वाकांक्षी आणि अभूतपूर्व आर्थिक सुधारणांसाठी महत्त्वाची गोष्ट होती. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कर कमी केले, रुपयाचे अवमूल्यन केले, सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण केले आणि परकीय गुंतवणूक वाढीला प्रोत्साहन दिले, असेही वृत्तात म्हटले आहे.

### अनुत्सुक पंतप्रधान

लंडनमधून प्रकाशित होणाऱ्या 'द गार्डियन' वृत्तपत्राने माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांचे अनुत्सुक पंतप्रधान म्हणून वर्णन केले आहे. मनमोहनसिंग यांच्या निधनाच्या वृत्तात द गार्डियनने म्हटले आहे की, लाजाळूपणा आणि कायम पडद्यामागे राहण्याला प्राधान्य दिल्यामुळे ते भारताचे अनुत्सुक पंतप्रधान म्हणून ओळखले जातात.







## भारताच्या प्रगतीला दिशा देण्यात मनमोहनसिंग यांची महत्त्वाची भूमिका

◆ **नवी दिल्ली, २७ डिसेंबर**

भारताच्या प्रगतीला दिशा देण्यात माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांनी देशात आर्थिक सुधारणांचा पाया घातला. अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. परदेशी कंपन्यांसाठी दरवाजे उघडले. त्यांची आर्थिक धोरणे इतकी आश्चर्यकारक होती की, १९९१ च्या क्रांतिकारी अर्थसंकल्पांनंतर दोन वर्षांतच देशाचा परकीय चलन साठा १ अब्ज डॉलर्स वरून १० अरब डॉलर्स झाला. १९९८ मध्ये ते २९० अब्ज बिलियनवर पोहोचले होते.

मनमोहनसिंग २००४ मध्ये देशाचे पंतप्रधान झाले. सिंग सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी दिली. यामुळे मोठ्या संख्येने लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारली. जागतिक बँकेनेही या योजनेचे कौतुक केले. या योजनेमुळे देशातील १५ टक्के लोकसंख्येला सामाजिक सुरक्षा मिळत आहे. सिंग सरकारने ६ ते १४ वयोगटापर्यंत मुलांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला. ४ ऑगस्ट २००९ रोजी संसदेने याबाबतच्या विधेयकावर शिक्कामोर्तब केले. यानंतर माहितीचा अधिकार, आधार योजना, राष्ट्रीय खाद्य सुरक्षा व अमेरिकेशी अण्वस्त्र करार ही पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या कार्यकाळातील आणखी एक मोठी उपलब्धी आहे. भारत अण्वस्त्रांच्या बाबतीत बलाढ्य राष्ट्र म्हणून उदयास आला. यामुळे अमेरिकेसोबतच्या संबंधांना नवे वळण मिळाले. (वृत्तसंस्था)







## कुठे होतात माजी पंतप्रधानांवर अंत्यसंस्कार?

**देशाच्या** माजी पंतप्रधानांचे अन्त्यसंस्कार दिल्लीतील विशेष स्मृतीस्थळांवर केले जातात. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी या माजी पंतप्रधानांवर राजघाट संकुलात अन्त्यसंस्कार करण्यात आले होते. अनेक माजी पंतप्रधानांसाठी स्वतंत्र समाधी स्थळेही बांधली आहेत. असे असले तरी, अन्त्यसंस्कार करण्याची पद्धत मृत व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या धार्मिक मान्यतेनुसार आहे. सामान्यतः माजी पंतप्रधानांचे अन्त्यसंस्कार दिल्लीत होतात, परंतु त्यांचे अन्त्यसंस्कार त्यांच्या गृहराज्यात देखील होऊ शकतात. त्यांच्या अन्त्यसंस्काराला राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, कॅबिनेट मंत्री आणि देशातील इतर मान्यवर उपस्थित असतात.

### माजी पंतप्रधानांच्या अन्त्यसंस्काराचे नियम

**भारतात माजी पंतप्रधानांच्या अन्त्यसंस्काराच्या वेळी विशेष प्रोटोकॉल पाळला जातो. देशासाठी दिलेल्या योगदानाचा आणि पदाचा सन्मान करणे हा त्यामागचा उद्देश आहे. अन्त्यसंस्कार करण्यापूर्वी माजी पंतप्रधानांचे पार्थिव राष्ट्राध्वजात म्हणजेच तिरंग्यात गुंडाळले जाते. याशिवाय, अन्त्यसंस्कार करताना २१ तोफांची सलामी दिली जाते. याशिवाय लष्करी बॅण्ड आणि सशस्त्र दलाचे जवान अन्त्यसंस्कारात सहभागी होतात.**

## स्वत:ला चाबकाने फटके मारत अण्णामलाईंचा आत्मक्लेश

### ४८ दिवस उपवास करणार

◆ **चेन्नई, २७ डिसेंबर**

तामिळनाडूतील वाईटाचा नायनाट होण्यासाठी मी स्वत:ला सहा वेळा फटके मारणार असल्याचे भाजपा नेते अण्णामलाई यांनी जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी कोईम्बतूर येथील त्यांच्या निवासस्थानाबाहेर स्वत:ला चाबकाने फटके मारल्याचा व्हिडीओ व्हायल झाला आहे.

तामिळनाडू भाजपाध्यक्ष अण्णामलाई यांनी गुरुवारी पत्रपरिषद घेतली होती. यावेळी त्यांनी सत्ताधारी द्रमुक सरकारचा तीव्र शब्दांत निषेध केला होता. ते म्हणाले होते की, तामिळनाडूमध्ये जोपर्यंत द्रमुकचा पाडाव होणार नाही, तोपर्यंत चप्पल घालणार नाही. स्वत:ला सहा वेळा फटके मारणार तसेच राज्यातील भगवान मुरुगन यांच्या सर्व सहा पवित्र निवासस्थानी ४८ दिवस उपवास करणार.

कोइम्बतूर येथे त्यांच्या गावी माध्यमांशी संवाद साधताना अण्णामलाईं यांनी द्रमुक सरकारवर जोरदार टीका केली. राज्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेसाठी द्रमुक सरकारवर आरोप करताना संतप्त झालेल्या अण्णामलाईं यांनी आपले बूट काढले आणि जोपर्यंत राज्यातील द्रमुक सरकार उलथून टाकले जात नाही, तोपर्यंत आपण अनवाणी फिरणार असल्याचे जाहीर केले होते.

तामिळनाडूमधून द्रमुकला सत्तेतून बेदखल करीत नाही, तोपर्यंत मी अनावणी फिरणार आहे. मी राज्यातील



जनतेला आवाहन करतो की, त्यांनी राज्याचा कारभार पहावा. मी निवडणूक जिंकण्यासाठी पैसे वाटणार नाही. आम्ही पैसे न वाटता निवडणूक लढवणार आहोत, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### देशाने प्रशासक, अर्थतज्ञ गमावला: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ञ गमावला आहे, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, पंतप्रधान अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या राजकारणात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्राशी संबंधित विपूल लेखन सुद्धा त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य कायम देशवासियांच्या स्मरणात राहील.

### भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या पाया रचला : उपमुख्यमंत्री अजित पवार

भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या वाटेवर नेण्याचा क्रांतिकारी निर्णय घेणारे आणि तो निर्णय कमालीचा यशस्वी करुन दाखवणारे देशाचे माजी पंतप्रधान, जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ डॉ. मनमोहनसिंह यांचं निधन ही देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्राची मोठी हानी आहे. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याच्या कार्याचा पाया त्यांनी रचला. गेल्या अनेक दशकात आलेल्या प्रत्येक जागतिक मंदीसमोर भारताची अर्थव्यवस्था पाय घट्ट रोवून भक्कमपणे उभी राहिली, याचं बहुतांश श्रेय डॉ. मनमोहनसिंह यांनी देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्याकाळात घेतलेल्या दूरदष्टीपूर्ण निर्णयांना आहे,

### दूरदृष्टी असलेले राजकीय नेतृत्व हरपले : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

- डॉ मनमोहन सिंग यांनी आधी वित्तमंत्री आणि नंतर पंतप्रधान असतांना देशाच्या आर्थिक विकासाला वेग देणारी दमदार पाऊले उचलली आणि अर्थव्यवस्थेचे दरवाजे खुले करून एक नवी आर्थिक क्रांती आणली

साध्या सरळ आणि शांत स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या मनमोहन सिंग यांनी एक नामवंत अर्थतज्ञ म्हणून ख्याती मिळवली होती. त्यांच्या निधनाने एक धोरणी आणि हुशार असा ज्येष्ठ अर्थतज्ञ आणि दूरदृष्टी असलेले राजकीय नेतृत्व हरपले आहे.

### जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी संसदपटू गमावला - राज्यपाल राधाकृष्णन

डॉ. मनमोहन सिंग हे जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी आणि संसदपटू होते. अर्थमंत्री या नात्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढले आणि जागतिकीकरण व उदारीकरणाच्या मार्गावर नेले. विनम्रता, सौजन्य आणि विद्वत्तेसाठी ओळखले जात. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांमधून त्यांनी संसदेतील चर्चांचा स्तर उंचावला.

### देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचं काम केले : शरद पवार

डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी ऐकून अतीव दु:ख झाले. आपल्या देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला आहे. त्यांच्या रूपाने एक ईश्वरीय आत्मा स्वर्गाच्या प्रवासाला निघून गेला ही अतिशय वेदनादायक बातमी आहे. डॉ. मनमोहन सिंह विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुधारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्त्रोत राहिल.

### महान अर्थशास्त्री, संवेदनशील राजकारणी काळाच्या पडद्याआड : नाना पटोले

देशाच्या मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया घालणारे, थोर अर्थशास्त्री आणि विद्वान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे एक प्रामाणिक, संवेदनशील राजकारणी आणि यशस्वी पंतप्रधान काळाच्या पडद्याआड गेले आहेत, आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय आणि राजकीय राजकीय कारकिर्दीत भारताच्या मजबूत अर्थव्यवस्थेचा त्यांनी पाया घातला. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशात आर्थिक उदारीकरणाच्या मार्गाने अर्थव्यवस्थेला चालना दिली. २००४ साली देशाचे पंतप्रधन म्हणून त्यांची निवड करण्यात आली. सोनिया गांधी यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत त्यांनी देशाला जागतिक पटलावर एक आर्थिक सत्ता म्हणून भारताला मान्यता मिळवून दिली. पंतप्रधान पदाच्या काळात माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा, शिक्षण हक्क कायदा, मनरेगा असे कायदे करून त्यांनी सर्वसामान्यांच्या अधिका-यांना कायद्याचे रूप देत संविधानाने दिलेले अधिकार शेवटच्या रांगेतील लोकांना मिळतील याची काळजी घेतली. दहा वर्षांचा पंतप्रधान पदाचा कार्यकाळ देशाच्या इतिहासातील प्रगतीचा सुवर्णकाळ म्हणून लक्षात राहील.

## अग्रलेख...

# अर्थशास्त्री हरपला...

२०२४ च्या सरत्या वर्षाने जाताजाता देशाला एक मोठा हादरा दिला. ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी पंतप्रधान तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ञ डॉ. मनमोहनसिंग यांनी राजधानी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) वयाच्या ९२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. डॉ. मनमोहनसिंग यांचे निधन अनपेक्षित नसले तरी धक्कादायक निश्चितच म्हणावे लागेल. त्यांच्या निधनाने देशातील आर्थिक सुधारणेचा, तसेच आर्थिक उदारीकरणाचा जनक काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यामुळे त्यांच्या निधनाने सामान्य माणूस हळहळला, त्याला वेदना झाल्या. डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाने देशाची अपरिमित अशी हानी झाली, कधीच भरुन न निघणारे नुकसान झाले. डॉ. मनमोहनसिंग यांनी सलग दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवले. २००४ ते २०१४ या काळात संपुआ सरकारचे नेतृत्व त्यांनी केले. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदला गेला. २०१४ नंतर भाजपाचे नरेंद्र मोदी यांनी हा विक्रम मोडला हा भाग वेगळा. नेहरूंनंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपद त्यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांनी सांभाळले होते, पण सलग दहा वर्षांचा विक्रम त्यांनाही करता आला नाही. प्रकृती अस्वास्थ्यामुळे गेल्या काही वर्षांपासून डॉ. मनमोहनसिंग राजकारणातून दूर झाले झाले होते. सार्वजनिक कार्यक्रमातील त्यांचा सहभागही कमी झाला होता. पण मोतीलाल नेहरू मार्गावरील निवासस्थानी त्यांचे वास्तव्य ही आश्वासक बाब होती. घरात एखादा वृद्ध माणूस असल्यावर तो कोणतेही काम करत नसला तरी घरातील सगळ्यांना त्याचा मानसिक आधार असतो, तसा डॉ. मनमोहनसिंग यांचा आधार काँग्रेसला होता. डॉ. मनमोहनसिंग १९९१ मध्ये राजकारणात आले, तेव्हापासून म्हणजे जवळपास ३३ वर्षे ते राजकारणात होते, पण राजकारणात असले तरी ते राजकारणी नव्हते, हे मान्य करावेच लागेल. त्यांचा पिंड हा राजकारण्याचा नव्हता. सर्वसामान्य राजकारण्याची जी प्रतिमा आपल्या देशात आहे, त्याच्या उलट प्रतिमा डॉ. मनमोहनसिंग यांची आहे. सभ्य, सज्जन, सोज्वळ, सात्विक, संयमी, सुशिक्षित, सुसंस्कृत, सन्हदयी आणि संवेदनशील असे स च्या बाराखडीतील सर्व सदगुणांचा पुतळा असे त्यांचे वर्णन केले तर अतिशयोक्तपूर्ण होणार आहे. डॉ. मनमोहनसिंग फारसे बोलणारे नव्हते, त्यांच्याजवळ वक्तृत्वाची आणि प्रभावी संभाषणाची कला नव्हती. त्यामुळे विरोधक मौनीबाबा म्हणून त्यांची टिंगलही करत होते. डॉ. मनमोहनसिंग काँग्रेसचे नेते होते, पण काँग्रेसने त्यांना नेहरू गांधी घराण्यासाठी राखीव असलेले पंतप्रधानपद दिले हे मान्य करावे लागेल, पण त्याचवेळी गांधी घराण्याने त्यांच्यावर अन्यायही केला. डॉ. मनमोहनसिंग यांची व्यक्ती म्हणून तसेच पंतप्रधानपद म्हणून प्रतिष्ठा राखली नाही, जपली नाही, हे नाकारता येणार नाही. देशाचे पंतप्रधानपद डॉ. मनमोहनसिंग यांच्याकडे अपघाताने आले, पण या पदाला त्यांनी न्याय दिला. त्यांचे माध्यम सल्लागार संजय बारू यांनी 'द ॲक्सिडेंडल प्राईममिनिस्टर' असे पुस्तक लिहित त्यावर अप्रत्यक्षपणे शिक्कामोर्तब केले होते. पंतप्रधान म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात जे धाडसी निर्णय घेतले, देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढत प्रगतीच्या आणि विकासाच्या नव्या वाटेवर नेऊन उभे केले, हे नाकारता येणार नाही. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधानपदावर असताना त्यांच्या सरकारचा रिमोट कंट्रोल घटनाबाह्य सत्ताकेंद्र अशी प्रतिमा निर्माण झालेल्या श्रीमती सोनिया गांधींकडे होता. पंतप्रधान कार्यालयात आपल्या पसंतीचे अधिकारी नियुक्त करण्याचा त्यांचा अधिकारही सोनिया गांधींनी हिरावून घेतला होता. पण अशाही प्रतिकूल परिस्थितीत डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने जे काही महत्वपूर्ण निर्णय घेतले, त्याबद्दल त्यांचे संपूर्ण देशाने आभार मानले पाहिजे. खऱ्या हिऱ्याची पारख जोहरीला असते, त्याप्रमाणे अर्थतज्ञ आणि नोकरशहा असलेल्या डॉ. मनमोहनसिंग यांचा १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांनी आपल्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून समावेश केला. नरसिंहराव यांनी मनमोहनसिंग यांच्याकडे अर्थमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली नसती तर देशाच्या अर्थव्यवस्थेचे काय झाले असते, याची कल्पनाही करता येत नाही. नरसिंहराव यांनी मनमोहनसिंग यांना अर्थमंत्री करताना आर्थिक आघाडीवर धाडसी निर्णय घेण्याची मोकळीक आणि स्वातंत्र्य दिले होते. अर्थमंत्री म्हणून तुम्ही जे निर्णय घ्याल, ते यशस्वी झाले तर त्याचे श्रेय आपल्या दोघांना मिळेल, मात्र ते फसले तर त्यासाठी जबाबदार फक्त तुम्हीच राहाल, असे नरसिंहराव यांनी तेव्हा म्हटले होते. मात्र तरीसुद्धा त्यांनी देशाच्या आर्थिक हितासाठी काही धाडसी निर्णय घेतले. दुसरा एखादा अर्थमंत्री असता तर त्याने देश गेला खड्ड्यात म्हणत कातडीबचाव निर्णय घेतले असते. डॉ. मनमोहनसिंग यांनी आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील सांभाळलेल्या जबाबदाऱ्या पाहिल्या म्हणजे त्यांचे मोठेपण समजून येते. अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांनी आपला पहिला अर्थसंकल्प संसदेत मांडला. त्यावर विरोधी पक्षनेते असलेल्या भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांनी टीका केली. त्यामुळे संवेदनशील मनाचे डॉ. मनमोहनसिंग दुखावले गेले, त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला होता. ही बाब पंतप्रधान असलेल्या नरसिंहराव यांना समजताच त्यांनी वाजपेयींना दूरध्वनी करुन याची माहिती दिली. वाजपेयी यांनीही मनाचा मोठेपणा दाखवत डॉ. मनमोहनसिंग यांची भेट घेतली. मी अर्थसंकल्पावर केलेली टिका ही विरोधी पक्षनेता म्हणून राजकीय स्वरुपाची आहे, असे त्यांना सांगितले, आणि तेव्हा कुठे त्यांनी राजीनाम्याचा निर्णय फिरवला. पंतप्रधानपदावर असतानाही डॉ. मनमोहनसिंग यांच्या मनात एकदोनदा राजीनामा देण्याचा विचार आला होतो. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना बाहेर देशात गेले होते, त्यावेळी त्यांच्या सरकारचा एक अध्यादेश तेव्हा नुकतेच खासदार झालेल्या राहुल गांधी यांनी अतिशहाणपणा दाखवत जाहीरपणे फाडून टाकला होता. असे करत एकप्रकारे त्यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचा अपमान केला होता. आज माझे मार्गदर्शक हरपले असे म्हणणारे हेच ते राहुल गांधी आहेत. पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांचा पहिला कार्यकाळ तुलनेत अतिशय चांगला गेला. या काळात त्यांनी सरकारला पाठिंबा असलेल्या डाव्या पक्षांच्या विरोधाला डावलत भारत अमेरिका अणुकरार घडवून आणला. असे करताना त्यांनी आपले पंतप्रधानपदही पणाला लावले होते. डाव्यांनी पाठिंबा काढल्यानंतर समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यावर आपले सरकार वाचवले होते. पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारवर मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. डॉ. मनमोहनसिंग यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसला तरी मंत्रिमंडळातील भ्रष्ट सहकाऱ्यांना पाठिशी घातल्याचा, त्यांच्यावर कारवाई न केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. त्यांच्या मंत्रिमंडळात असणारे अनेक उद्दाम मंत्री घटनाबाह्य सत्ताकेंद्राच्या पाठिंब्यामुळे पंतप्रधान असलेल्या मनमोहनसिंगांनाही जुमानत नव्हते. मात्र असे असतानाही पंतप्रधानपदाच्या काळात त्यांनी जे काही मोजके निर्णय घेतले, ते अतिशय महत्वाचे आणि देशावर दूरगामी परिणाम करणारे ठरले. वर्षात १०० दिवस रोजगाराची हमी देणारा मनरेगा कायदा, शिक्षणाचा हक्क अधिकार कायदा, शेतकऱ्यांना ६० हजार कोटींच्या कर्जमाफीची योजना असे अनेक निर्णय सांगता येतील. पण पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन कधी झालेच नाही, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि कार्यक्षमतेचा योग्य सन्मान कधी झालाच नाही. पद्म पुरस्कार मालिकेतील कोणत्याही पुरस्काराने त्यांना कधी सन्मानित करण्यात आले नाही. पंतप्रधान म्हणून माझ्या कामगिरीचे मूल्यमापन इतिहासालाच करावे लागेल, असे विधान त्यांना करावे लागले. भारतमातेच्या या सुपुत्राला तरुण भारत परिवाराची विनम्र श्रध्दांजली आणि भावपूर्ण अभिवादन.

## यंगिस्तान

# हा तर साहित्याचा अपमान!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**



छद्म पुरोगामी विश्वात सावरकरांविषयी प्रचंड दरारा आहे. खरे सावरकर जर लोकांना कळले तर या स्वयंघोषित पुरोगाम्यांचे दुकान बंद होईल, ही भीती त्यांना वाटत असते. म्हणूनच सावरकरांना नाकारणे किंवा चुकीच्या पद्धतीने किंवा खोटा इतिहास लोकांसमोर ठेवून बुद्धिभेद करणे व सावरकरांचे नाव साहित्य संमेलनातून गाळणे असे प्रकार ते करत असतात. स्वातंत्र्यवीर सावरकर हे देशभक्त होते, क्रांतिकारकांचे मुकुटमणी होते, त्याचप्रमाणे ते उत्तम कलाकार होते, साहित्यिक होते. त्यांचे निबंध केवळ माहितीपर नव्हते तर निबंधातही लालित्य होतं. शंकर वैद्य म्हणायचे की सावरकर हे उत्तम प्रेमकवी आहेत.

*जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ।*
*शिवास्पदे शुभदे स्वतंत्रते भगवती ।*
*त्वामहं यशोयुतां वंदे ।*
किंवा
*अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला ।*
*मारिल रिपु जगति असा कवण जन्माला ।*
किंवा
*हे हिंदुशक्ति-संभूत-दीप्ततम-तेजा ।*
*हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा ।*
*हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतिच्या साजा ।*
*हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा ।*

तरी सुद्धा ते उत्तम प्रेमकवी होते, असं एका मोठ्या साहित्यिकाचं म्हणणं आहे. सावरकरांनी उत्तम प्रेमकविता लिहिली आहे.

*सकाळीच तू तोडित असता जाईजुईच्या फुलां*
*माडीवरूनी सुंदर कन्ये, पाहियलीं मीं तुला*
*उंचविता कर छातीवरि ये चोळी तटतटूनी*
*कुरळ केश रुळताती गोरट्या मानेवरि सुटूनी*

आणि असे असतानाही सावरकरांना साहित्य संमेलनातून मुद्दामून डावललं जातं, त्यांचा अपमान केला जातो. सावरकरांनी साहित्याच्या विविध प्रांगणात मनसोक्त विहार केलेला आहे. ते नाटककार होते, कवी होते, निबंधकार होते, ऐतिहासिक लेखक होते, ललित साहित्यालाही त्यांनी परीस स्पर्श केला होता. इतकंच काय तर माहितीपर लिखाणातही लालित्य आणण्याचा चमत्कार त्यांनी केला. अंदमानातील यातनांचे, दुःखाचे व अत्याचाराचे वर्णन करणारा 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ वाचताना आपल्याला कंटाळा येत नाही. सावरकरांच्या भाषेवर दुर्बोध असा शिक्का लावण्याचा प्रयत्न झाला असला तरी ग्रंथ वाचताना 'पुढे काय होणार?' ही उत्सुकता आपल्याला असते. हे एका महान साहित्यिकाचं लक्षण आहे. मात्र त्यांच्या देशभक्तीचा पगडा इतका आहे की त्यांची साहित्यसंपदा त्यामागे लपून जाते. नव्हे नव्हे, खरे तर ही साहित्यसंपदा लपवून ठेवण्याचे किंवा ती चुकीच्या पद्धतीने लोकांसमोर मांडण्याचे महापाप छद्म पुरोगामी मंडळींनी 'आपले परम दायित्व' या भावनेने केले आहे.

२१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीत होणार आहे. या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी पुण्यातील 'सरहद' या संस्थेकडे आहे. १९ डिसेंबर रोजी आयोजनाविषयी एक पत्रकार परिषद घेण्यात आली होती. त्यावेळी संमेलनाच्या पत्रिकेवर स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र नव्हते. आयोजकांना याबाबत प्रश्न विचारता संजय नहार म्हणाले, महाराष्ट्रात दोन वैचारिक गट होते - जहाल आणि मवाळ. त्यामुळे पत्रिकेमध्ये मवाळ गटाचे गोपाळकृष्ण गोखले आणि जहाल गटाचे लोकमान्य टिळक यांची छायाचित्रे घेण्यात आली. म्हणूनच जहाल गटाचे सावरकर यांचे छायाचित्र घेतले नाही. असे विचित्र स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. मग प्रतिभाताई पाटील यांचे छायाचित्र का लावले? आणि मुळात हे दोन जहाल गट काँग्रेसमध्ये होते. सावरकर हे काँग्रेसचे नेते नव्हते. त्यामुळे असे स्पष्टीकरण देऊन आयोजकांनी वैचारिक बैठकीलाच तिलांजली वाहिली आहे. विशेष म्हणजे यावेळी शरद पवार हे स्वागताध्यक्ष आहेत. याआधीही साहित्य संमेलनात सावरकरांचा अपमान झालेला आहे. २०२० ला उस्मानाबाद येथे झालेल्या साहित्य संमेलनाआधी काँग्रेसच्या सेवा दलाने भोपाळमध्ये प्रशिक्षण शिबिरात सावरकरांबद्दल आक्षेपार्ह लिखाण असलेली पुस्तिका वाटली होती. म्हणून देशप्रेमी मंडळींनी याविरोधात संमेलनामध्ये ठराव करावा अशी मागणी केली होती. मात्र असा ठराव घेतल्यास आम्ही साहित्य संमेलनाचा निषेध करू अशी धमकी काँग्रेसने दिली. २०२१ मध्ये नाशिक येथील संमेनलातही सभामंडपाला सावरकरांचे नाव देण्यास नकार दिला होता. नाशिक हे सावरकरांचे जन्मस्थान. मात्र त्यावेळी छगन भुजबळ हे स्वागताध्यक्ष होते आणि शरद पवार या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्वा. सावरकरांनी साहित्य जगतात मोलाची कामगिरी केली आहे. मराठी भाषेला नवे शब्द देऊन व जुने शब्द पुनरुज्जीवीत करून मराठी भाषा आणि साहित्य त्यांनी समृद्ध केले आहे. स्वदेशीचा फटका हे पहिले साहित्य सावरकरांनी वयाच्या ११ व्या वर्षी रचले. शेवटच्या श्वासापर्यंत सावरकर साहित्य निर्मिती करत होते. महाकाव्य लिहिण्याचा निश्चयही त्यांनी बालपणीच केला होता. सावरकर हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. जुन्या प्रथांवर टीका करताना त्यात द्वेषाची भावना नव्हती, तर नव्या युगाचे स्वागत करण्याचे गीत त्यांनी रचले. त्याचबरोबर जे जे पुरोगामी ते ते श्रेष्ठ, असं मानण्याचा करंटेपणा त्यांनी केला नाही. सावरकर म्हणतात, कोणतीही गोष्ट केवळ नवी आहे म्हणूनच ग्राह्य जात्याच ठरत नाही. कोणतेही साहित्य नुसते पुरोगामी आहे म्हणूनच काही सत्य व तथ्य ठरेलंच असे गृहीत धरता येत नाही. म्हणूनच सावरकर साहित्यिकांसाठी पूजनीय व अनुकरणीय आहेत. सावरकरांचे साहित्य मनोरंजक होते, त्याचबरोबर ते राष्ट्राचे हित साधणारे होते. सावरकर लिहितात, साहित्य हे राष्ट्राच्या बुद्धीचे, सामर्थ्याचे, शौर्याचे प्रतीक आहे. सावरकर हे साहित्याचे महर्षी होते. भारतात त्यांच्याशिवाय साहित्य हा शब्द उच्चारणेही पाप ठरू शकते. पण छद्म पुरोगाम्यांची अडचण अशी आहे की सावरकर हे खऱ्या अर्थाने पुरोगामी असून हिंदुत्ववादी होते. हिंदुत्ववादी माणूस पुरोगामी असू शकतो, अशी कल्पनाही छद्म पुरोगाम्यांना करता येत नाही. सावरकरांसारख्या महान साहित्यिकाला डावलून पुढे जाणे, त्यांचे नाव मुद्दामून वगळून साहित्य संमेलन आयोजित करणे हा सावरकरांचाच नव्हे तर साहित्याचाही अपमान आहे!

writerjayeshmestry@gmail.com


## वेध

**विजय कुळकर्णी**

# आता उद्धव ठाकरे वाजणारे फोन उचलू लागले!

होय, आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे फोन उचलायला लागले, ही मोठी बातमी झाली आहे. कारण, गेल्या पाच वर्षांत उद्धव ठाकरे फोन उचलत नाहीत, अशी त्यांची ख्याती झाली होती. कारण, पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरेंनी एका पत्रकार परिषदेत मोठ्या अभिमानाने सांगितले होते की, होय, देवेंद्र फडणवीसांचा फोन मला वारंवार येत होते. पण, मी ते उचललेच नाहीत. आठवते ना. त्यानंतर त्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडी करून राज्यात सत्ता स्थापन करून ते मुख्यमंत्री झाले होते.

हे वाचकांना नक्कीच आठवत असेल. देवेंद्र फडणवीसांकडे त्यावेळी १०५ आमदार असूनही त्यांना विरोधी पक्षाच्या बाकांवर बसविले होते. हे आज आठवण्याचे कारण म्हणजे, नुकतेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपले. या अधिवेशनात एक दिवस उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांना भेटण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात गेल्याची बातमी दूरचित्रवाणीवर पाहिली व वर्तमानपत्रातून देखील वाचली. उद्धव ठाकरे यांनी एका चॅनेलवरून प्रसारित झालेल्या त्यांच्या एका पत्रकार परिषदेत सांगितले की, भुजबळांचा मला फोन आला होता. सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ कमालीचे नाराज आहेत, हे सर्वांना माहीत आहे. ते जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त करीत असतात. त्यांनी उद्धव ठाकरेंना फोन करणे यात काही फार मोठे नाही. कारण, कोणत्याही पक्षातील नाराज असलेले नेते हे उद्धव ठाकरेंना



फोन करीत असतात आणि नाराजांना गोळा करण्याचे काम सध्या उद्धव ठाकरे करीत आहेत. यात महत्त्वाची गोष्ट एकच आहे ती म्हणजे आजकाल उद्धव ठाकरे फोन उचलालयला लागले आहेत. कारण, ते मुख्यमंत्री असताना काँग्रेसचे दोन मोठे नेते बाळासाहेब थोरात व त्यावेळी काँग्रेसमध्ये असलेले अशोक चव्हाण यांनी जाहीरपणे सायंकाळी ७-८ वाजेनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आमचे फोन घेत नसल्याची तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेऊन संजय राऊत यांनी कुरकुरणारी खाट या मथळ्याखाली सामनामध्ये अग्रलेख लिहिला होता. अशा वेळी उद्धव ठाकरे पत्रकार परिषदेत मला भुजबळांचा फोन आला होता, असे सांगतात. विशेष म्हणजे त्यांनी तो फोन उचलला, ही बाब महत्त्वाची ठरते. हल्ली मला नाराजांचे फोन येत असल्याचेही त्यांनी या पत्रकार परिषदेत म्हटले होते. अर्थातच नाराज असलेलेच उद्धवजींना फोन करतील ना. जे आपल्या पक्षात खुश आहेत ते कशाला त्यांना फोन करतील. पण, त्यावेळी सत्ताधारी महाविकास आघाडीत असलेले काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण व बाळासाहेब थोरात यांची तक्रार काय होती, उद्धव ठाकरे आमचा फोन उचलत नाहीत. म्हणजेच ते सत्तेत असूनही नाराजच होते. पण, आता या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, भुजबळांचा फोन आला होता. म्हणजे त्यांनी तो उचलला. म्हणजेच आता उद्धव ठाकरे फोन उचलायला लागले ही महत्त्वाची बातमी होते. भुजबळ आणि उद्धव ठाकरे यांच्यात काय संवाद झाला ही बाब तेवढी महत्त्वाची नाही. लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी महाराष्ट्रात येऊन वीर सावरकरांना अपमानास्पद बोलत होते. तेव्हा, वीर सावरकरांचा अपमान आम्ही सहन करणार नाही, असे उद्धव ठाकरेंनी काँग्रेस किंवा राहुल गांधींना कधी खडसावले नाही. आता मात्र ते सावरकरांबद्दल बोलू नका, असे म्हणतात. पण, अपमानास्पद बोलू नका, असे ते बोलत नाहीत. पण, आज उद्धव ठाकरे पुन्हा हिंदुत्वाकडे वळताना आपण आज देखील हिंदुत्वविरोधी कसे आहोत ते दाखविताना भाजपाने नेहरूंविषयी रडगाडे बंद करावे, असे म्हणतात. तर, राहुल गांधी सावरकरांविषयी मधुर गाणी म्हणतात की काय? असो, माणूस आता चुकांची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करीत आहे, हेही नसे थोडके. जो माणूस फोनच उचलत नव्हता तो आज फोन उचलायला लागला हा त्यांच्यात झालेला बदल दखलपात्र असा आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# मद्यधुंद विश्वप्रवक्ते!

**नागेश दाचेवार**

दारू डोक्याच्या नसांना धुंद करते, ज्यामुळे मेंदुचा ताबा सुटत जातो. आणि एकदा मेंदू नियंत्रणाबाहेर गेल्यास मानव जो अंतरंगात असतो तो हळूहळू प्रकट होण्यास सुरुवात होते. जर त्याने मागील काळात अपमान, अत्याचार, मानहानी सहन केली असेल तर तो आक्रस्ताळा होतो. जर त्याचा प्रेमभंग झाला असेल तर शायर होईल वा दुःखी होईल. जर तो आतून आनंदी असेल तर त्या वेळेस तो दानशूर होईल, तुमच्यासाठी काहीही करण्यास तयार होईल. जर त्याने तोटा सहन केला असेल तर मग तो चिंतेत दिसेल. कधी कधी स्मृतिभ्रंश देखील होतो. नेमक्या अशाच काहीशा अवस्थेतून आपले विश्वप्रवक्ते जात असल्याचे दिसते. मविआच्या काळात किराणा दुकानात दारू विक्रीचा निर्णय आपल्याच आग्रहाने घेतल्याचा स्मृतिभ्रंश विश्वप्रवक्ते साहेबांना झालाय्... तर, दारू कंपनीत मुलीला भागीदार बनवून नफा कमावण्यात तोटा सहन झाल्याच्या दुःखद परिस्थितीतून ते अद्याप सावरलेले नाहीत. ते सध्या स्मतिभ्रंश आणि तोटा सहन न झाल्याच्या, अशा दोन मद्यधुंद व्यक्तींच्या परिस्थितीतून जात आहेत. त्यामुळेच अजित पवार लाडक्या बहिणींच्या भावांना आणि नवऱ्यांना हे सरकार दारुडे बनवणार असा आरोप ते करु लागले असावेत.

ऐन कोरोना काळात महाविकास आघाडी, अर्थात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी कोरोना संकटावर मात करण्यासाठी लोकोपयोगी निर्णय घेण्याऐवजी, उपायायोजना करण्याऐवजी, त्याकाळात घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याच्या दारू धोरणात बदल करण्यास मंजुरी दिली. राज्यात लागू होण्यास तयार असलेल्या या धोरणात काय होतं, तर किराणा दुकान, मॉलमध्ये वाईन विक्रीची परवानगी. तीदेखील साधीसुधी नव्हे, तर, दुकानदाराने शोकेस बनवून विक्री करावी असा फुकटचा सल्ला देखील शासकीय आदेशातून दिला होता. शिवाय मद्यावरील आयात शुल्क कमी करून, दर ३०० टक्क्यांवरून १५० टक्के करून दारू विक्रीला प्रोत्साहन देणारा निर्णय देखील मविआ सरकारने घेतला होता. आणि राज्यात हा निर्णय लागू करण्याची एवढी घाई झाली होती की, मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्याघेतल्या अध्यादेश काढून अंमलबजाणीसाठी हे मोकळे देखील झाले होते. तेव्हा विरोधात असलेल्या भाजपाने आणि राज्यातील महिलांनी प्रंचड विरोध केल्यानंतर, राज्यातून होणाऱ्या विरोधामुळे हादरलेलं मविआ सरकार अंमलबजाणी करण्याची हिम्मत करू शकले नव्हते. मात्र, कोविड काळात कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्याऐवजी ही नसती उठाठेव मविआ सरकारने का केली असावी? हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. तर, बघा, अशोक गर्ग नावाचे व्यवसायिक २०१० पासून, मॅग्पी डीएफएस प्रायव्हेट लिमिटेड नावाची वाईन वितरण करणारी कंपनी चालवतात. या कंपनीचे नाव आधी ''मादक'' असे होते. या कंपनीत विश्वप्रवक्त्यांच्या दोन मुली विदिता, पूर्वशी आणि त्यांचे पार्टनर सुजित पाटकर हे सगळे १६ एप्रिल २०२१ ला पार्टनर झाले. बस्स, एवढंच पुरेसं आहे, कोरोना काळात मागणी करूनही मंदिरं बंद ठेवून, सगळ्यात पहिले दारू दुकानं उघडायला मंजुरी देणाऱ्या उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीचा हा खटाटोप कशासाठी होता, हे कळायला...!

बरं आज भावांना आणि नवऱ्यांना दारुडे बनण्याची चिंता असलेल्या विश्वप्रवक्त्याने त्यावेळी या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कसा फायदा होणार, तसेच वाईनच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या शेती उत्पादनाला विक्रिसाठी व्यासपीठ मिळण्यास कशी मदत होणार, द्राक्षे, मोसंबी, संत्रा, ऊस तसेच वाईननिर्मितीसाठी लागणाऱ्या पिकाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना या निर्णयाचा कसा फायदा होईल, त्याचबरोबर किराणा दुकानदारांच्या व्यावसायात कशी वाढ होईल, याचे फायदे सांगत किराणा दुकान, मॉलमध्ये दारू विक्रीच्या निर्णयाचे जोदार समर्थन केले होते बरं का...! त्याचवेळी २०१४ मध्ये युती सरकार आल्यानंतर सुधीर मुनगंटीवारांनी चंद्रपूर जिल्ह्यात दारू बंदी केली होती. ती बंदीदेखील ठाकरेंच्या मविआ सरकारने उठविली होती. ही बंदी उठवताना इथल्या बहिणींचे भाऊ आणि नवरे बरं विस्मृतीत गेले होते.

पण आता सरकारी तिजोरीवरचा ताण कमी करण्यासाठी सरकारने नव्याने मद्यविक्रीचे परवाने दिले तर राज्याचे उत्पन्न वाढेल असा केवळ सल्ला अधिकाऱ्यांनी सरकारला दिला आणि आपला दारू धंदा जमीदोस्त झाल्याच्या दुःखातून न सावरलेल्या विश्वप्रवक्त्यांची चांगलीच जळाली. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्यांनी आकांडतांडव सुरू केले. प्रत्यक्षात हा सल्ला देण्यामागची कारणं काय आहेत? महाराष्ट्रात विदेशी दारू विक्रीचे १७०० परवाने आहेत. महाराष्ट्रात देशी दारू विक्रीचे ३५०० परवाने आहेत. सगळे परवाने १९७२ पूर्वी देण्यात आले आहेत. १९७२ नंतर विदेशी मद्यविक्रीचे परवाने दिलेले नाहीत. जुन्या परवान्यांच्या हस्तांतरासाठी सरकारला एक कोटी रुपये मिळतात. प्रत्यक्षात हस्तांतरण होताना ३०-४० कोटींहून अधिकचे व्यवहार होतात. बीअर शॉपीमध्ये दारू विक्रीला परवानगी दिलेली नाही. अवैध दारू विक्रीमधून लाखो रुपयांचे व्यवहार होतात. या व्यवहारातून सरकारला काहीही महसूल मिळत नाही. म्हणजे राज्यात दारू विक्री मोठ्या प्रमाणावर होते. पण त्या तुलनेत सरकारला महसूल अत्यंत कमी मिळतो. त्यामुळे बीअर शॉपीमधून दारू विक्रीला परवानगी देणे, विदेशी दारू विक्रीचे परवाने वाढवणे या माध्यमातून सरकारला आणखी महसूल मिळू शकतो असे अधिकाऱ्यांचे मत आहे. सध्यातरी सरकारने यावर कुठलाही निर्णय घेतलेला नाही. तरी, दुकानांचे परवाने दिले जाणे आणि दारू दुकानांतच विक्रीचा हा प्रस्ताव आहे. जो किराणा दुकानात दारु विक्री करण्याच्या निर्लज्ज विचारापेक्षा नक्कीच उजवा आहे, असे म्हणता येईल.

आता गंम्मत बघा, अद्याप कुठलाही निर्णय झालेला नसताना, आरोप करायला कोण सरसावलं आहे तर दारू व्यापाऱ्याशी भागीदारी करून, मद्यधोरणात सुधारणा करून व्यापाऱ्याला सरकारकडून लाभ मिळवून देत, स्वतः दलाली खाण्याचा प्रयत्न करणारे. सरकारात असताना उद्धव ठाकरेंनी किराणा दुकानात दारू विक्रीचा निर्णय घेतला, आयात शुल्क कमी करून दारू स्वस्त विकायला निघाले तेव्हा, बहिणींच्या भावांची, नवऱ्यांची, लहान मुला-बाळांची चिंता न वाटणाऱ्या ठाकरे ॲण्ड कंपनी आणि विश्वप्रवक्त्यांच्याबद्दल वाईट आणि चिंता दोन्ही वाटते. कारण गेली पाच वर्षे ते केंद्रात आणि राज्यात सत्ता येण्याच्या निराशेच्या गर्तेतून अद्याप बाहेर पडू न शकल्यामुळे, पुन्हा पाच वर्षे केवळ सकाळी बडबड करता करता मानसिक संतुलन ढळून विश्वप्रवक्ते मद्यधुंद अवस्थेत आढळल्यास आश्चर्य वाटू नये.

९२७०३३३८८६

## आधार कार्डचे प्रणेते डॉ. मनमोहन सिंग

आज देशात आणि विदेशात सर्वदूर आपल्या आधार कार्डचा डंका वाजत आहे त्या आधार कार्डची खरी सुरुवात यूपीए सरकार काळात झाली. त्यावेळी देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग होते. इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन मोहनराव निलेकणी यांनी आधार कार्ड प्रोजेक्टची अध्यक्षता केली होती. भारतात बहुउद्देशीय राष्ट्रीय ओळखपत्र किंवा युनिक आयडेंटिटी कार्ड प्रकल्प राबवण्यासाठीची जबाबदारी त्यावेळचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्यांच्याकडे दिली होती. या उपक्रमाचा उद्देश भारतातील सर्व रहिवाशांसाठी एक अद्वितीय ओळख क्रमांक प्रदान करणे आहे आणि कल्याणकारी सेवांच्या कार्यक्षम वितरणासाठी त्याला जोड म्हणून आधार नंबर वापरला जाईल. यामधील ओळख पद्धत ही बायोमेट्रिक आहे. भारतातील लोकसंख्येचा हा सरकारी डेटा बेस तयार करण्याच्या संपूर्ण मोहिमेला जागतिक बँकेचे तेव्हाचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ पॉल रोमर यांनी आधारला पृथ्वीवरील सर्वांत मोठा सामाजिक प्रकल्प द्वारा असे संबोधण्यात आले होते.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळातील सर्वांत उल्लेखनीय कार्य म्हणून आधार कार्डचा उल्लेख नेहमी होत राहणार. आधार कार्डमुळे देशवासीयांच्या आठवणीत ते चिरकाल राहतील.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

## वाचक पत्रे

## महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत हरपले

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व गमावले. भारताची अर्थव्यवस्था आज जगात सर्वांत वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे याचे सर्व श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांनाच जाते. डॉ मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्री असताना जे क्रांतिकारक निर्णय घेतले होते त्याचीच फळे आज आपण चाखत आहोत. अर्थमंत्री असताना त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण अवलंबले. त्यांच्या याच धोरणामुळे भारतात परदेशी गुंतवणूक वाढली आणि देशाची रसातळाला गेलेली अर्थव्यवस्था सुदृढ झाली. त्यांनी राबवलेली ही धोरणे पुढे जगाने स्वीकारली म्हणूनच



त्यांना आर्थिक उदारीकरणाचे जनक असे म्हटले जाते. पंतप्रधान म्हणूनही त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली. पंतप्रधान असताना त्यांनी देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून अन्न सुरक्षा योजना आणली. त्यांनी आणलेल्या मनरेगा या योजनेमुळे तरुणांना रोजगार मिळाला. पंतप्रधानपदी असताना त्यांनी परराष्ट्राशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्याच कारकीर्दीत भारताचे अमेरिकेसोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांच्या कामाप्रति असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जन सामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे ते कायम स्मरणात राहतील. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले ते देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या निधनाने देशाची खूप मोठी हानी झाली आहे. डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## नववर्षाचा जल्लोष

२५ डिसेंबरपासून सगळीकडे मौजमस्ती करण्याची प्रथा पडत चालली आहे. बहुतांश शाळा, महाविद्यालये यांना हिवाळी सुट्या याच काळात असतात. त्यामुळे सगळ्यांमध्ये उत्साह संचारतो. नोकरदार वर्गाला सुट्या संपवायच्या असतात. त्यामुळे पर्यटनाला उधाण येते. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ डिसेंबरच्या रात्री तर नाच, गाणे, जल्लोष यांना उधाण येते. दिव्यांची रोषणाई करण्यात येते. लोक आनंदाने बेधुंद होतात. आपले नववर्ष गुढीपाडव्याला साजरे होते हे मान्य आहेच. पण व्यावहारिकदृष्ट्या एक जानेवारीपासून नववर्षाची सुरुवात होते. त्यामुळे प्रमाणात एकत्रित येऊन आनंद साजरा करणे वावगे नाही.

पण त्यात वाहवून जाऊ नये. इंग्रजी नववर्ष रात्री बारा वाजता साजरे करतात. त्यामुळे दुसऱ्या दिवशी उठायला उशीर, जल्लोषाची नशा या धुंदीतून बाहेर आल्यावर पहिल्याच दिवशीचं वेळापत्रक ढासळतं. मग आरोग्यासाठी, ध्येयपूर्तीसाठी केलेल्या संकल्पाचे काय? पहिल्याच दिवशी आपल्या संकल्पाला सुरुंग लागतो. सकाळी बुद्धी सतेज आणि मन उत्साही असते. भविष्यकाळात अपेक्षित असलेली सत्यम्, शिवम्, सुंदरम्ची आराधना करता येते. सूर्याच्या तेजश्री आपले नाते जोडले जाते. नव्या वर्षात पहिल्या दिवसाची सुरुवात प्रसन्न व्हावी, उत्साहवर्धक व्हावी असे आपल्याला वाटते ना. त्याच आत्मचैतन्याची जागृती घेऊन नववर्ष आले आहे. चला चिंतन, मननाला आकार देऊ. नवीन सत्संकल्पांच्या पूर्तीचा ध्यास घेऊन नववर्षाचे प्रसन्न सकाळी स्वागत करण्यास सज्ज होऊया.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# थर्टी फस्टसाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त

**हा नियम मोडल्यास १० हजार दंड अन् जेलवारीच**

**७२ ठिकाणी फिक्स पॉईंट; १३ ठिकाणी नाकाबंदी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

नववर्षाच्या स्वागताला कोणताही गालबोट लागू नये म्हणून शहरातील सर्व पोलिस बंदोबस्तासाठी रस्त्यावर उतरणार आहेत. मद्यपान करून वेगाने वाहने चालविणारी मंडळी यंदा पोलिसांच्या टारगेटवर राहणार आहेत. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येकजण प्लॅनिंग करत असतो. ३१ डिसेंबरच्या रात्री घड्याळाचा काटा १२ वर गेला की तरुण-तरुणी आणि इतर सर्वच वयोगटातील लोक संगिताच्या तालावर थिरकायला लागतात. हॉटेल्स आणि क्लबकडून खास पाट्यांचं आयोजन केलं जातं. अशा काळात अनेकांना वेळेचं भानही राहत नाही. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने यंदा मद्यालये उशिरापर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, यातूनही कुणी नियम मोडल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच शहर पोलिसांच्यावतीनेही शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी २४ ते ३१ डिसेंबरपर्यंत नियमांत शिथिलता देण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाच्या वतीने वाहनचालकांची तपासणी केली जाणार असून विनापरवाना मद्य घेतलेल्या आणि वाहन हाकणाऱ्या चालकांविरोधात कारवाई होणार आहे. त्यासाठी पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे थर्टी फस्टला नियम मोडल्यास हॅप्पी न्यू इयर तुरुंगात साजरा करावा लागू शकतो.

थर्टी फर्स्टच्या उत्साहावर विरजण पडू नये म्हणून राज्य सरकारने महानगरांत पहाटे ५ वाजेपर्यंत मद्यविक्रीस परवानगी दिली आहे तर इतर ठिकाणी मध्यरात्री १ वाजेपर्यंत मद्यविक्री करता येईल. त्यामुळे ३१ डिसेंबरला रात्री उशिरापर्यंत देशी, विदेशी मद्य व बियर बार सुरू राहणार आहेत. नवीन वर्षाचे स्वागत करताना नागरिकांनी आनंद साजरा करत सावधनता बाळगणे गरजेचे आहे.

मद्यालये रात्री उशिरापर्यंत सुरू असली तरी दारू पिऊन गाडी चालवणे महागात पडणार आहे. तसे आढळल्यास चालकावर गुन्हा दाखल होतो. मद्यपी चालकाचा खटला खटला पाठविला जातो. तिथे १० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. मद्यपी चालकाला किमान ६ महिन्यापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. तसेच परवाना देखील ३ ते ६ महिन्यांसाठी निलंबित होतो. मद्य परवाना असल्याशिवाय कुणालाही मद्य देऊ नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. नियम डावलून लहान मुलांना मद्य विक्री केल्यास विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. मद्य पाट्यांमध्ये देखील लहान मुलांचा सहभाग नको.

## पोलिसांचा तगडा बंदोबस्त...

शहरात विविध भागात एकूण ७३५ पोलिस अंमलदारांचा बंदोबस्त ३१ डिसेंबरच्या रात्री रस्त्यांवर राहणार आहे. पोलिस दलाकडून थर्टी फर्स्ट च्या पार्श्वभूमीवर तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये तीन उपायुक्त, ४ सहायक आयुक्त, १७ पोलिस निरीक्षक, ४१ पोलिस उपनिरीक्षक, ७३५ कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारीही सहभागी असणार आहेत, शहरात ७२ ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत. शहरात १३ ठिकाणी नाकाबंदी पॉईंट लावण्यात आलेले आहेत. ६ स्ट्रायकिंग फोर्स, ४ आरसीपी पथके, गुन्हे शाखेची ६ पथके, मुलींच्या संरक्षणासाठीची दामिनी पथके, पोलिस ठाण्यांची पीसीआर मोबाईल, बीट मार्शल यांची गस्त असणार आहे.

## निधन वृत्त...

### जयवंत कट्टे



**मंगळवेढा, दि. २७ डिसेंबर-**

जयवंत शंकर कट्टे (वय ८८ रा. मंगळवेढा) यांचे शुक्रवार दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता वृधापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे, परतुंडे असा मोठा परिवार आहे, सजग परिवाराचे अध्यक्ष संजय कट्टे, पुष्पक क्लॉथ सेंटरचे मालक सतीश कट्टे, बालाजी मित्र परिवाराचे अध्यक्ष सुरेश कट्टे यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर कचरेवाडी येथील शेतात दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विमल गिराम



**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

होमकर नगर भवानी पेठ येथील रहिवासी विमल देविदास गिराम (वय ८५) यांचे दि. २७ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. हॉलीबॉलचे माजी राष्ट्रीय खेळाडू व मध्ये रेल्वेचे टीसी अनिल गिराम यांच्या त्या आई होत.

### बापूराव वाघ



**पिलीव, दि. २७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील ज्येष्ठ नागरिक बापूराव कृष्णा वाघ (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **MONIKA NITESHKUMAR SANLKLECHA** has been changed to New Name **MONICA NITESHKUMAR SANKLECHA** residing at Flat No.902, 9th Floor, The Landmark, Civil Lines, Solapur-413003 (Maharashtra). Kindly Note The Same

## शाळेचा दाखला हरविलेबाबत

मी **प्रांजली मिलींद वाघमारे** मु.पो. पिलीव ता. माळशिरस, जि. सोलापूर. मी दि. २४/१२/२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास माळशिरस - पिलीव दरम्यान प्रवास करीत असताना माझा बारावीचा शाळा सोडल्याचा दाखला पडुन गहाळ झाला आहे. (हरविला आहे) सरदचा दाखला कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क - डॉ. मिलींद वाघमारे**
**मो.नं. 9325336583**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्व्यये दि. ०२/०९/२०२४ रोजी मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१

**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. / कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०७/२०२४ अखेर | मागणी नोटीस दिनांक / प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | कर्ज खाते क्र. ००२००३२०७००००३७१<br>कर्जदार :<br>**मार्चला टेक्सटाईल्स**<br>प्रोप्रा. अंबादास नागप्पा माचर्ला रा : ३४/ए/४९ न्यु पाच्छा पेठ, पंचमुखी हनुमान मंदिर जवळ, सोलापूर ४१३००६. | एकूण रक्कम रुपये ३८,१८,९१०.०० (रु. अडोतीस लाख अठरा हजार नऊशे दहा रुपये) + दि. ०१/०९/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च | ०२/०९/२०२४<br>२७/१२/२०२४ | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यू पाच्छा पेठ येथील टीपी-१ मधील सिटी सर्व्हे नंबर १०३८८, फा प्लॉट नं. ३४/अ/४९ हि मिळकत याचे क्षेत्र ६१५.८४ चौ.मी. इतकी असून मिळकतीचे चतुर्सिमा येणेप्रमाणेः<br>**पूर्वेस** - प्लॉट नं. ३४अ/५०<br>**पश्चिमेस** - फा प्लॉट नं. ३४ अ /४०<br>**उत्तरेस** - फा प्लॉट नं. ३४/अ/४२/१ व ३४अ/४२/२<br>**दक्षिणेस** - रस्ता |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : २७/१२/२०२४**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)**
**ई-मेल : smcphewtr@gmail.com**

जा.क्र./साआअ/जल/६२९ दि. २७/१२/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण - पहिली मुदतवाढ**

सोलापूर महानगरपालिकेकडील मुख्य कार्यालयाकडील सोलापूर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी ११० मि.मी. व्यासाची विंधन विहिर घेणे व त्यावर इंडिया मार्क II चा हातपंप बसविणे कामाचा (वार्षिक मक्ता) ई-निविदाबाबत

**1) TENFER ID : 2024-SMC-1125229_1**

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २८/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**उपअभियंता (जलवितरण)**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर हद्दीतील जागा याचा तपशील ग. नं. ५३८/३/१३ प्लॉट याचे क्षेत्रफळ ४.५८.९८ आर चौ.मी. आकार रु. १३८६.०० आहे असा संपूर्ण खुला प्लॉट आहे. यासी चतु:सिमा- पूर्वेस- ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. १२, पश्चिमेस- ५३८/१, उत्तरेस- ३० मीटर रस्ता यूाचे पाणी व वागणूक पूर्व-उत्तरचे रस्त्याने जाते व आहे.

सदर मिळकत ही श्रीकृष्ण रंगनाथ कुलकर्णी व प्रदीप सुभाष घोणे यांचे मालकी कबजे वहिवाटीची अशी बिनशेती प्लॉट मिळकत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खूषखरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्वीकारलेली आहे. तसेच बाजूही ठरलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असलेचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद प्लॉट मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हक्क वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्क, अधिकार असतील तर संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरमकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदी योग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.
तारीख २७/१२/२०२४

सही/-
**श्री. महेश विलास जाधव, ॲडव्होकेट,**
स्वामी समर्थ कॉम्प्लेक्स, कोर्टासमोर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर. मो.नं. ९८६०९१२३१८
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

## व्यवहार रद्द झालेबाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट नं. ५३०/२ पैकी लक्ष्मी नगर मधील प्लॉट नं.१० याचे क्षेत्र ३१५ चौ. मीटर अथवा ३३९० चौ. फुट इतकी आहे.

यासी चतु:सीमा :- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस : स.नं.२६१/१, दक्षिणेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ९ ही मिळकत प्लॉट जागा १. श्री. मनोहर मार्कंडेय जडल, २. सौ. गितांजली मनोहर जडल, दोघे रा.३४/२/८५, न्यु पाच्छापेठ, सोलापूर यांचे मालकीची असून ती आमचे अशिल श्री. नितीन मल्लिनाथ अंटद यांनी खरेदीने घेण्याचे हेतूने खरेदीपूर्व जाहीर नोटीस दि. ०५/१२/२०२४ रोजी सोलापूर तरुण भारत या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली होती, मात्र सदरचा खरेदी देणे घेणेचा व्यवहार व इसारा पावती उभयपक्षाचे सर्वसंमतीने रद्द करण्यात आले असून दि. ०५/१२/२०२४ रोजीचे खरेदीपूर्व जाहीर नोटीसीस अनुसरून सदरचा व्यवहार रद्द झालेबाबतचे हे जाहीर नोटीस देण्यात येत आहे. दि. २७/१२/२०२४

**सही/-**
**अशिल : नितीन मल्लिनाथ अंटद यांचे तर्फे**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

## जाहीर समन्स

**मे. सहाय्यक निंबधक, सहकारी संस्था अक्कलकोट, यांचे समोर यांचे कार्यालय :-**
**श्री स्वामी समर्थ सहकारी लि (अवसायनात), ए वन चौक, सटेशन रोड आक्कलकोट**

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
विरूध्द
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अं. क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २,७१,३९२/- | १ | **श्री. सुतारी गोनेश्वर सुरेश** मु.पो. गोगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| २ | ९१,५८९/- | १ | **श्री. शटगार बसवराज सातप्पा** मु.पो. सलगर ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ३ | २,८९,३९५/- | १<br>३ | **श्री. सचिन बसवराज व्हनशेट्टी** मु.पो. किणीवाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर<br>**श्री. जकापुरे सचिन चंद्रकांत** मु.पो बुधवार पेठ ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ४ | २,६८,००१/- | १<br>३ | **श्री. राहुल शंकर राठोड** मु.पो. समर्थ नगर शिवपुरी गा ता. अक्कलकोट, जि. सोलापूर<br>**सौ. सुनिता कनिराम पवार** मु.पो. १८अ/२ नेहरू नगर विजापूर रोड, सोलापूर |
| ५ | १,४८,७१६/- | १ | **श्री. दाऊद लाडलेमशाक अत्तार** मु.पो. खासबाग गल्ली ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ६ | ३,३९,५२५.५०/- | १ | **श्री. अरूण हणमंत कोळी** मु.पो. शिरवळ जं कणबस, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| ७ | ५,९०,०७८/- | १ | **श्री. गुरव बसवराज शरणप्पा** मु.पो. श्रीराम नगर जेऊर रोड, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ८ | २,६७,३३९/- | २ | **श्री. माढेकर रवीराज वैजीनाथ** मु.पो. १०८ भूषण नगर वांगी रोड सोलापूर ता. उत्तर सोलापुर जि सोलापुर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, **उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक- १०/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २७/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुदेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ : अक्कलकोट**
**दिनांक : २८/१२/२०२४**

शिक्का

**सही/-**
**श्री. आर.आर. ठोंबरे**
**सहाय्यक निंबधक**
**सहकारी संस्था, अक्कलकोट**

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. ८३०७ दि. २६/१२/२०२४

रेणुका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ-२ब, पुष्पक हॉटेलजवळ,
पाईप लाईन रोड, सावेडी, अ.नगर,
अहमदनगर - ४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,
अहमदनगर ----- अर्जदार

**विरुद्ध**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ४२०४/२०२४ | कर्जदार | **श्रीमती भोसले वर्षा किशोर,** रा. सावंत प्लॉट, परंडा रोड, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. पवार पोपट रामदास,** रा. उपळाई रस्ता, वायकुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. पवार अनिल बाळू,** रा. सावंत प्लॉट, परंडा रोड, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर |
| ४२०५/२०२४ | कर्जदार | **श्री. अजय दत्तात्रय ताकतोडे,** रा. पंकज नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. प्रवीण नामदेव जाधव,** रा.मु. पंकज नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. विशाल भीमाशंकर घोंगडे,** रा. पंकज नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०६/०१/२०२५ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
(गोल शिक्का) **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व बार्शी तालुका येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

**१)** डि.सोलापूर सब डि. व ता. बार्शी मौजे बळेवाडी ग्रा.प. हद्दीतील जागा ही विदयमान मालक दत्तात्रय नरहरी मोरे यांची स्वःसंपादित खरेदी मालकीची प्रत्यक्ष वहिवाटीची असून हक्क पत्रकी नावे दाखल असलेली जागा तीचा तपशील :-

**अ)** ग्रा.पं. मिळकत नंबर ३११ याचे संपूर्ण क्षेत्रफळ १००० चौ. फूट आहे. याचे मोजमाप पूर्व-पश्चिम बाजू फूट ३३.३ व दक्षिण-उत्तर बाजू फूट ३० आहे. यासी चतुःसिमा पुर्वेसः पुजा रेडके यांची जमीन, दक्षिणेसः गुंड यांची जमीन, पश्चिमेस दत्तात्रय मोरे यांची जागा व उत्तरेस- १२.०० फूट रुंदीचा रस्ता आहे.

**ब)** ग्रा.पं. मिळकत नंबर ३१२ याचे संपूर्ण क्षेत्रफळ १००० चौ. फूट आहे. याचे मोजमाप पूर्व-पश्चिम बाजू फूट ३३.३ व दक्षिण-उत्तर बाजू फूट ३० आहे. यासी चतुःसिमा पुर्वसः दत्तात्रय मोरे यांची जमीन, दक्षिणेसः गुंड यांची जमीन, २० फूट रुंदीचा रस्ता आहे येणेप्रमाणे पश्चिमेस : मि.न. ३१३ व उत्तरस- उत्तरेस- १२.०० फूट रुंदीचा रस्ता चतुःसिमापूर्वक खुली जागा आतील सर्व तदगंभूत वस्तुसह जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कांसह जमीन,

वर कलम १ अ व ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही दत्तात्रय नरहरी मोरे रा. शेंडगे प्लॉट, बार्शी यांचे खरेदी मालकीची असून ती त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे. सदर मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईट्सला त्यांचे नावाची नोंद झालेली आहे. सदरची मिळकत ही दत्तात्रय नरहरी मोरे यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिल सौ. मनिषा हरीदास लोंढे रा. धानोरे, ता. माढा, जि. सोलापूर यांना विक्री करण्याचे ठरविलेले आहे व आमचे अशिलाने सदरची मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्रीसंबंधी व्यवहारही उभयंतामध्ये ठरलेला आहे. आमचे अशिलाने सदर व्यवहारापोटी दत्तात्रय नरहरी मोरे यांना इसारा दाखल रक्कम देऊन रितसर इसार पावती केलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची स्वतंत्र मालकी व कब्जे वहीवाटीची, असल्याची खात्री मिळकत मालकानी आमच्या अशिलास दिलेली आहे.

**२)** सबब वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास सदर मिळकती बाबत पूर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागद पत्रासह हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बिन बोजाची स्वकष्टार्जित आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार/ हरकत आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. ता. २७/१२/२०२४.

**सही/-**
**ॲड. अमोल एन. अलाट**
**एम.ए., एलएल.बी.**
**अति व सत्र न्यायालय. बार्शी, बार्शी, जि. सोलापूर.**
**मो.नं. ९७६७८३३९३९**

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

सोलापूर येथील तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः- डि व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील दहिटणे येथील मिळकत यांसी ग्रामपंचायत अनुक्रमांक २५, मिळकत नं.२२, यासी महानगरपालिका मिळकत क्र.५२०२०२, असा असून याचे एकूण क्षेत्र २५०० चौ. फुट किंवा २३२.३४ चौ.मी. इतके असून त्यापैकी १०५० चौ. फुट इतकी जागा खुली व मोकळी आहे. यासी चतुः सिमा पूर्वेस खुली जागा, पश्चिमेस सदर मिळकत क्र. ५२०२०२ पैकीची जागा, दक्षिणेस पिरप्पा कोळी व लक्ष्मीबाई कोळी यांची जागा, - उत्तरेस- दहिटणे-बक्षीहिप्परगा सिमेंट रस्ता. येणेप्रमाणे चतुःसिमेतील वर्णनाची खुली प्लॉट जागा.

वर नमुद मिळकत बाबुराव पांडूरंग लोमटे यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची असून रेकॉर्डस ऑफ राईट्सला त्यांचे नावाची नोदं आहे. बाबुराव पांडूरंग लोमटे हे दि.२५/०२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे पश्चात १) सुसाबाई बाबुराव लोमटे २) मालन प्रभाकर पवार ३) शालिनी विष्णू यादव ४) विजयकुमार बाबूराव लोमटे ५) सोनाली नामदेव हावळे ६) विवेक गणेश यादव हेच कायदेशीर वारस आहेत. वरनमुद मिळकतीच्या मालकांनी वरील मिळकत आमचे अशिलास कब्जेपावतीने विक्री केलेली आहे. वर नमुद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलास खात्री दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल वर नमुद मिळतीबाबत खरेदीखताचा व्यवहार करणार आहेत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास अथवा हरकत अथवा खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, टाच, जप्ती इ. असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत हरकती लेखी स्वरुपात कागदपत्रांनिशी खालील नमुद पत्यावर कळवाव्यात. हरकती मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशिल वर नमुद मिळकतीबाबतचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती आमच्या अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ताः २७/१२/२०२४.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. विष्णु बब्रुवान भोसले**
**ऑफि.नं.३, १३१, स्केअरवन कॉम्पलेक्स,**
**सिव्हल कोर्टासमोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर**
**मो.नं. ९१७२५५४४५५**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन आंबेडकर चौक,**
**रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**उप संचालक, नगर रचना कार्यालय,**
**प्रशासकिय इमारत, दुसरा मजला,**
**ई-मेलः adtpsolapur1@gmail.com**

जा.क्र./ससंनर/नर/२४/११५१ दि. २७/१२/२०२४

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये सोलापूर शहराच्या प्रारुप विकास योजनेचे प्रसिध्दीकरण**

ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेने (यापुढे उक्त नियोजन प्राधिकरण असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे उक्त क्षेत्र असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे निर्देशिलेली), चे कलम २३ (१) सह कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना सोलापूर (यापुढे उक्त प्रारुप विकास योजना असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. १०६, दि. ०३/११/२०२२ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, पुणे विभाग, पुरवणी भाग १ मध्ये दि. १२ ते १८ जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीस अनुसरुन सोलापूर महानगरपालिकेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा सोलापूर यांची नगर रचना अधिकारी म्हणून आदेश क्र.७७४, दि.-०६/०२/२०२३ अन्वये नेमणूक केली आहे.

तद्नंतर उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीतील तांत्रीक बाबींनुसार सोलापूर महानगरपालिकेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी उप संचालक, नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांची नगर रचना अधिकारी म्हणून आदेश क्र. १५०९, दि.- २३/०२/२०२४ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमिन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यासाठी ठराव क्र.१११, दि. २६/१२/२०२४ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये नागरीकांकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.
२) उप संचालक, नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३) सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा, सोलापूर.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरीकांच्या काही सूचना / हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**ठिकाण :- सोलापूर**
**दिनांक :- २७/१२/२०२४**

**सही/-**
**शितल तेली-उगले**
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन आंबेडकर चौक,**
**रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**उप संचालक, नगर रचना कार्यालय,**
**प्रशासकिय इमारत, दुसरा मजला,**
**ई-मेलः adtpsolapur1@gmail.com**

जा.क्र./ससंनर/नर/२४/११५१ दि. २७/१२/२०२४

**NOTICE**

**Publication of Draft Development Plan of Solapur Under Section 26(1) of Maharashtra Regional & Town Planning Act. 1966**

Whereas the Solapur Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority.") vide Resolution No.106 dated-03/11/2022 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Solapur (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area") as per the provision of section 23(1) read with section 38 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act") and notice to the effect is published in Maharashtra Government Gazette Pune Division, Supplement Part 1 on 12 to 18 January 2023.

And whereas, as per the provision in section 24 of the said Act, the Municipal Corporation vide Order No.774, Dt.06/02/2023 has appointed Assistant Director, Town Planning, Solapur Branch Solapur as "Town Planning officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

Thereafter, as per the provision in section 24 of the said Act, on technical terms the Municipal Corporation vide Order No.1509, Dt.-23/02/2024 has appointed Deputy Director, Town Planning, Solapur Municipal Corporation as "Town Planning officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Deputy Director, Town Planning, Solapur Municipal Corporation after having prepared Existing Land Use Map as per section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of said area and has handed it over to the said Planning Authority on 23/12/2024 for publication under section 26(1) of said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No.111, dated 26/12/2024 to publish the said Draft Development Plan under section 26(1) of the said Act, for inviting suggestions / objections from the public;

Therefore, Solapur Municipal Corporation hereby publishes the said Draft Development Plan along with the Report Under section 26(1) of said Act for inviting suggestions / objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Commissioner, Solapur Municipal Corporation, Solapur.
2. Deputy Director, Town Planning, Solapur Municipal Corporation, Solapur.
3. Assistant Director, Town Planning, Solapur Branch, Solapur.

The suggestions / objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Commissioner, Solapur Municipal Corporation, within the period of 30 days from the date of publication of the Notice in Maharashtra Government Gazette. Suggestions / objections received by the Municipal Corporation within the period of the 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Solapur Municipal Corporation.

**Place- Solapur**
**Date: 27-12-2024**

**Sd/-**
**Sheetal Basavaraj Teli-Ugale**
**Commissioner**
**Solapur Municipal Corporation, Solapur**

## महत्त्वाचे

### आम्ही अजूनही सामन्यात परत येऊ शकतो : सुंदर

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात आम्ही अजूनही पुनरागमन करू शकतो व अखेरपर्यंत लढत राहू शकतो, असा विश्वास भारताचा अष्टपैलू खेळाडू



वॉशिंग्टन सुंदर याने व्यक्त केला. एमसीजीमध्ये भारताची बिकट स्थिती असूनही त्याला वळणाची खात्री आहे. भारत पहिल्या डावात अजून ३१० धावांनी पिछाडीवर असून त्यांच्याकडे पाच गडी शिल्लक आहे. आज जेमतेम कसोटी सामन्याचा दुसरा दिवस आहे. भरातीय संघाला सामन्यात मुसंडी मारण्यसाठी अजून भरपूर वेळ शिल्लक आहे. आम्ही उद्या सकाळी लढत राहू व सामन्यात परत येऊ, असे सुंदर पत्रकार परिषदेत म्हणाला. भारतीय खेळाडूंमध्ये ऊर्जा खूप चांगली आहे, आम्ही सर्व सकारात्मक आहोत. आमच्यासाठी खरोखर कठोर संघर्ष करण्याचा आणि संघासाठी आवश्यक गोष्टी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही तो म्हणाला. रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदरच्या नेतृत्वाखालील गोलंदाजांनी प्रभावी लढा दिला, पण ऑस्ट्रेलियन फलंदाजीची चिवट झुंज मोडण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. ■

### डेव्हिस चषक टेनिससाठी युकी भाम्बरी अनुपलब्ध

**नवी दिल्ली** : आगामी १ व २ फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीतील डीएलटीए कॉम्प्लेक्स येथे होणाऱ्या टोगो विरुद्ध भारताच्या डेव्हिस चषक जागतिक गट



प्लेऑफ टेनिस लढतीसाठी भारतीय स्टार टेनिसपटू युकी भाम्बरी अनुपलब्ध आहे, तर सुमित नागलसुद्धा या स्पर्धेला मुकण्याची शक्यता आहे. भाम्बरी स्पर्धेसाठी अनुपलब्ध असल्याबद्दल अ.भा. टेनिस संघटनेचे (एआयटीए) मानद सचिव अनिल धुपर यांनी खेद व्यक्त केला आहे. सुमितने अद्याप प्रतिक्रिया दिली नाही. संघाची निवड उद्या होणार आहे, त्यामुळे सुमितला प्रतिसाद देण्यासाठी अजून वेळ आहे. सप्टेंबरमध्ये स्टॉकहोममध्ये स्वीडनविरुद्धच्या जागतिक गट एक लढतीसाठी नागल व भाम्बरी हे दोघेही अनुपलब्ध झाले होते, त्यावेळी रोहित राजपालच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघाचा ४-० असा पराभव झाला होता. टोगो विरुद्धचा सामना ऑस्ट्रेलियन ओपनच्या समीप होणार आहे. टोगो हा एक लहान पश्चिम आफ्रिकन देश असून त्यांच्या संघात २९ वर्षीय थॉमस सेटोडजी असून तो एटीपी क्रमवारीत १२५९ व्या क्रमांकावर आहे.

### जम्मू-काश्मीरला नमवून केरळ उपांत्य फेरीत

**हैदराबाद** : नसीब रहमानने नोंदवलेल्या एकमेव महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर केरळने जम्मू काश्मीरवर १-० ने विजय नोंदवून प्रतिष्ठेच्या संतोष करंडक ७८ व्या राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. शुक्रवारी डेक्कन एरिना येथे खेळल्या गेलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात रहमानने जम्मू-काश्मीरविरुद्ध ७३ व्या मिनिटाला गोल केला. नसीब रहमानचा हा स्पर्धेतील सातवा गोल असून स्पर्धेत सर्वाधिक गोल नोंदविणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. ३१ व्यांदा संतोष करंडकाच्या उपांत्य फेरीत पोहोचलेल्या केरळचा सामना २९ डिसेंबरला मणिपूरशी होणार आहे. या मोसमातील संतोष करंडकात केरळ एक मजबूत व बलाढ्य संघ असून हा संघ स्पर्धेतील एक अपराजित हेवीवेट संघ म्हणून पोहोचला आहे. जोरदार आक्रमणासह केरळा संघाने स्पर्धेत एकूण २९ गोल केले असून त्यांचा बचाव देखील मजबूत आहे. त्यांनी आतापर्यंत केवळ चार गोल स्वीकारले आहेत.

### सिमोना हॅलेप दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियन ओपनला मुकणार

**रोम** : गुडघे व खांद्याच्या दुखण्यामुळे माजी प्रथम विश्वमानांकित व दोन वेळची ग्रॅण्ड स्लॅम विजेती सिमोना हॅलेपने पुढील वर्षी ऑस्ट्रेलियन ओपन आणि ऑकलंडमधील सराव टेनिस स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. स्वतः हॅलेपने समाजमाध्यमात पोस्ट टाकून ही माहिती दिली. ऑस्ट्रेलियन ओपन २०१८ ची उपविजेती रोमची सिमोना हॅलेप हिला आगामी ऑस्ट्रेलियन ओपनच्या पात्रता फेरीसाठी वाईल्डकार्ड मिळाले होते. ती गत आठवड्यात अबु धाबी येथे झालेल्या प्रदर्शनी टेनिस स्पर्धेत खेळली होती. अबु धाबीमध्ये खेळल्यानंतर दुर्दैवाने पुन्हा एकदा माझ्या गुडघ्यात आणि खांद्यात वेदना होऊ लागल्या आहे. माझ्या संघाशी दीर्घकाळ चर्चा केल्यानंतर मी ऑस्ट्रेलियन ओपनममध्ये न खेळण्याचा निर्णय घेतला. तसेच माझा हंगाम विलंबाने सुरु करणे योग्य आहे, असे ३३ वर्षीय हॅलेपने इंस्टाग्रामवर लिहिले. ऑस्ट्रेलियातील स्पर्धेच्या आयोजकांचे वाईल्ड कार्डसाठी आभार मानू इच्छिते. ■

# ऑस्ट्रेलियाची सामन्यावर मजबूत पकड

## स्मिथच्या १४० धावा, भारताची घसरगुंडी ● ऑस्ट्रेलिया सर्वबाद ४७४, भारत ५ बाद १६४

◆ **मेलबर्न, २७ डिसेंबर**

मेलबर्न क्रिगकेट मैदानावर सुरू असलेल्या भारताविरुद्धच्या बॉक्सिंग-डे चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी स्टीव्ह स्मिथने केलेल्या १४० धावांच्या दमदार खेळीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने १२२.४ षटकांत सर्वबाद ४७४ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना मात्र भारताचा डाव गडगडला. भारताने दिवस अखेरपर्यंतच्या खेळात ४६ षटकांत १६४ धावांत निम्मा संघ गमावला. या बरोबरच ऑस्ट्रेलियाने सामन्यावरील आपली पकड मजबूत केली. भारत अजून ३१० धावांनी पिछाडीवर आहे. भारताला फॉलोऑन टाळण्यासाठी चिवट फलंदाजी करावी लागणार आहे. भारताकडून सलामीवीर यशस्वी जयस्वालने तेवढी ८२ धावांची खेळी केली.

बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत सध्या भारत व ऑस्ट्रेलिया १-१ ने बरोबरीवर आहे.

ऑस्ट्रेलियाने ६ बाद ३११ धावांवरून दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरूवात केली. कालचे नाबादवीर स्मिथने शतकी खेळी केली, परंतु कर्णधार पॅट कमिन्सचे अर्धशतक केवळ एका धावेने हुकले. या दोघांनी सातव्या गड्यासाठी ११२ धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला चारशे धावांचा उंबरठा ओलांडून दिला.

पॅट कमिन्सने ६३ चेंडूंत ७ चौकारांसह ४९ धावांची खेळी केली. स्टीव्ह स्मिथने १९७ चेंडूंचा सामना करत १४० धावांचे योगदान दिले, यात त्याने १३ चौकार व ३ षट्कार खेचलेत. स्टीव्ह स्मिथचे हे कारकिर्दीतील ३४ वे, या मालिकेतील भाराताविरुद्धचे दुसरे व एकूण ११ वे व मेलबर्नच्या मैदानावरील ५ वे शतक ठरले.

स्मिथने ३४ वे कसोटी शतक करत सर्वाधिक कसोटी शतकांच्या बाबतीत युनूस खान, ब्रायन लारा, सुनील गावसकर आणि महेला जयवर्धने यांसारख्या दिग्गजांची बरोबरी केली आहे.



शतक झळकावल्यानंतर बॅट उंचावत अभिवादन करताना स्टीव्ह स्मिथ



यशस्वी जयस्वालची अर्धशतकी खेळी

भारताकडून बुमराहने ४ बळी, रवींद्र जडेजाने ३ बळी, आकाश दीपने २ बळी, तर वॉशिंग्टन सुंदरने १ बळी टिपला.

ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावांना प्रत्युत्तर देताना भारताच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वालचा जोडीदार म्हणून आलेला कर्णधार रोहित शर्मा याला दुसऱ्याच षटकांत पॅट कमिन्सने आपल्या दुसऱ्याच वेगवान चेंडूवर मिड-ऑनवर स्कॉट बोलॅण्डकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. केएल राहुलने २४ धावांची भर घातली असताना कमिन्सने त्याचा त्रिफळा उडवला. यशस्वी जयस्वालला विराट कोहलीची चांगली साथ मिळाली व त्यांनी संघाला दीडशे धावांचा टप्पा गाठून दिला. मात्र याचवेळी एक चोरटी धाव काढण्याच्या नादात जयस्वाल धावबाद झाला. यशस्वी जयस्वालने ११८ चेंडूंत ११ चौकार व एका षट्कारसह ८२ धावांची खेळी केली. कोहली व जयस्वालने तिसऱ्या गड्यासाठी १०२ धावांची भागीदारी केल्यानंतर भारताची घसरगुंडी उडाली. स्कॉट बोलॅण्डने विराट कोहली (३६) व आकाश दीपला (०) तंबूचा रस्ता दाखवला. खेळ थांबला तेव्हा भारताच्या ५ बाद १६४ धावा अशी स्थिती होती.

भारत आणखी ३१० धावांनी पिछाडीवर असून भारताचा फॉलो-ऑन टाळण्यासाठी चिवट फलंदाजी करावी लागणार आहे. ३१० धावांची तूट भरून काढण्याची जबाबदारी ऋषभ पंत (नाबाद ६) व रवींद्र जडेजा (नाबाद ४) यांच्यावर असेल.

◀(वृत्तसंस्था)

### मनमोहनसिंग यांच्या स्मरणार्थ भारतीय खेळाडूंनी हाताला बांधली काळी पट्टी



काळी पट्टी बांधून खेळताना भारतीय खेळाडू

◆ **मेलबर्न, २७ डिसेंबर**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीय क्रिकेट संघाने माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या स्मरणार्थ काळ्या पट्ट्या बांधल्या.

२००४ ते २०१४ या कालावधीत दोन वेळा माजी पंतप्रधान राहिलेले सिंग यांचे गुरुवारी रात्री नवी दिल्ली येथील भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या स्मरणार्थ भारतीय संघाने काळ्या पट्ट्या बांधल्या आहेत, असे बीसीसीआयने एका निवेदनात म्हटले आहे.

मनमोहनसिंग हे एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सुद्धा होते. ते १९९१ मधील आर्थिक सुधारणांचे शिल्पकार होते आणि भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढले व आर्थिक उदारीकरणाच्या युगाची सुरुवात केली. त्यांनी भारताच्या आर्थिक मार्गाचा मार्ग बदलला आहे असे मानले जाते.

◀(वृत्तसंस्था)

# किंग चषक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी लक्ष्य सेन सज्ज

◆ **शेनझेन, २७ डिसेंबर**

चीनचा दिग्गज बॅडमिंटनपटू लिन डॅनने सुरू केलेला नवीन बॅडमिंटन स्पर्धा- किंग चषक आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी भारताचा युवा स्टार खेळाडू लक्ष्य सेन सज्ज झाला आहे. शुक्रवारुपासून प्रारंभ होणाऱ्या या स्पर्धेत लक्ष्य सेन आपल्या हंगामाचा उच्चांक गाठण्याचा प्रयत्न करणार आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला लखनौ येथे झालेल्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपदाचा दुष्काळ संपवणाऱ्या अल्मोरा येथील २३ वर्षीय लक्ष्य सेनचा तीन दिवसीय स्पर्धेदरम्यान जगातील सर्वोत्तम पुरुष एकेरी खेळाडूंशी सामना होणार आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये प्लेऑफ गमावल्यानंतर कांस्यपदकापासून वंचित राहिलेल्या १२ व्या मानांकित लक्ष्य सेनचा पहिल्या फेरीत १७ व्या क्रमांकावर असलेल्या हाँगकाँगच्या अँगस एनजी का लाँगशी सामना होईल.



दोन वेळा ऑलिम्पिक विजेता चीनच्या लिन डॅनने सुरू केलेल्या या स्पर्धेत सर्वोच्च सन्मानासाठी आठ पुरुष एकेरी खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत.

पॅरिस ऑलिम्पिकचा रौप्यपदक विजेता थायलंडचा कुनलावुत विटीडसार्न आणि जागतिक क्रमवारीत २ क्रमांकावर असलेला डेन्मार्कचा ॲण्डर ॲन्टोनसेन हे स्पर्धेतील सर्वोच्च क्रमांकाचे खेळाडू आहेत. इतर उल्लखेनीय खेळाडूंमध्ये सिंगापूरचा माजी जगज्जेता लोह कीन य्यू आणि फ्रान्सचा ॲलेक्स लॅनियरचा समावेश आहे. चीनचे प्रतिनिधित्व दोन ख़ेळाडू करणार असून यात १८ वर्षांचे हू झे एन आणि वांग झी जून हे असतील.

◀(वृत्तसंस्था)



### चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा या शाळेत क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

याचे उद्घाटन सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक नसीरुद्दीन आळंदकर, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जे.बी बागबान, हाजी बशीर अहमद बागबान यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी रंगबिरंगी फुगे आकाशात सोडण्यात आले. सप्ताहात खोखो, १०० मिटर धावणे , लिंबु चमचा स्पर्धा, डॉज बॉल , सॅक रेस घेण्यात आले. मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी प्रास्ताविक केले. चौधरी यास्मीन यांनी सूत्रसंचालन केले. अशरफ पटेल यांनी आभार मानले.

### वेस्ट इंडीजवर ५ गड्यांनी मात

# भारताने जिंकली वन-डे मालिका





वडोदरा येथे शुक्रवारी वेस्ट इंडीज महिलांविरुद्धची वन-डे मालिका जिंकल्यानंतर चषकासह भारतीय महिला क्रिकेटपटू

### अष्टपैलू दीप्ती शर्मा चमकली

◆ **वडोदरा, २७ डिसेंबर**

दीप्ती शर्माच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या बळावर भारतीय महिला संघाने वेस्ट इंडीजवर ५ गड्यांनी मात करत तीन सामन्यांची एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिका ३-० ने जिंकली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडीजने ३८.५ षटकांत सर्वबाद १६२ धावा काढल्या आणि भारतासमोर विजयासाठी १६३ धावांचे लक्ष्य ठेवले. भारताने २८.२ षटकांत ५ बाद १६७ धावा काढून विजय साकार केला.

डळमळीत सुरुवात झाल्यानंतरही कर्णधार हरमनप्रीत कौर (३२), जेमिमाह रॉड्रिग्स (२९), दीप्ती शर्मा (नाबाद ३९) आणि ऋचा घोषने (नाबाद २३) महत्त्वपूर्ण खेळी करून भारताला लक्ष्य गाठून दिले. त्याआधी दीप्ती शर्माने ३१ धावांत ५ बळी टिपत पाहुण्या वेस्ट इंडीज संघाला १६२ धावांत गुंडाळण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यानंतर भारताचा विजय साकारताना दीप्तीने नाबाद ३९ धावांची खेळी केली.

भारताच्या ५ बाद १२९ धावसंख्येसह फलंदाजीला उतरल्यानंतर ऋचा घोषने ११ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कार मारून नाबाद २३ धावांची खेळी करून भारताच्या पराभवाची भीती दूर केली.

◀(वृत्तसंस्था)



### सेवासदन प्रशालेत क्रीडा सप्ताहाला सुरुवात

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

येथील सेवासदन प्रशालेमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रीय खेळाडू कार्तिकी चौगुले या विद्यार्थिनीच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे संचालक आणि पत्रकार पद्माकर कुलकर्णी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपमुख्याध्यापिका नंदीनी बारभाई, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू, क्रीडा प्रमुख ज्ञानेश्वर काळे, प्रियांका लाड, एरोबिक्स आंतरराष्ट्रीय खेळाडू वृंदा बोधुल तसेच राज्य, विभाग स्तरीय खेळाडू उपस्थित होते. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला. या क्रीडा सप्ताहामध्ये खो-खो डॉज बॉल, धावणे, लंगडी असे विविध खेळांचे आयोजन करण्यात आलेला आहे ,खेळाडूंना शपथ मीनल उदनूर यांनी दिली. आभार क्रीडा प्रमुख ज्ञानेश्वर काळे यांनी मानले.



### विश्वजित तायक्कॉन्दो ॲकॅडमीच्या खेळाडूंची खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

गोवा येथे झालेल्या खुल्या राष्ट्रीय तायक्कॉन्दो स्पर्धेत विश्वजित तायक्कॉन्दो ॲकॅडमीच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात कामगिरी केली. या यशस्वी विदयार्थ्यांचे सोलापूर जिल्हा तायक्कॉन्दोचे अध्यक्ष मोहन भूमकर, जिल्हा सचिव मंजूर शेख, खजिनदार प्रतिक्षा खंडाळकर, आबासो वाघमोडे, सोमशेखर भोगडे, जमिअत-उल्मा-ए-हिंद चे मौलाना इब्राहिम कासमी व मौलाना हरीश शेख, लक्ष्मी जमादार, वाजिद शेख, विदयाधर शाबादी, जयपाल नायडू यांनी कौतुक व अभिनंदन केले. **यशस्वी खेळाडू : मुले :** सोमनाथ दिक्षित, यशराज गड्डी, इब्राहिम सय्यद, मोहम्मद साद कुरेशी, अयान शेख, जैद साहेब, रुद्राक्ष खटावकर, जाहिद साहेब, सचिन बिद्री, पृथ्वीसिंग हजारे, ओसामा नदाफ. **मुली :** स्वराली माने, साक्षी जानराव, लावण्य पल्लेलू, साहिका बुध्दाराम, तनुष्का पल्लेलू.

# सोलापूरच्या रुद्रप्रताप चव्हाण, भक्ती जाधव यांची महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

येथील रुद्रप्रताप चव्हाण व भक्ती जाधव यांची १९ वर्षाखालील महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात निवड झाली असल्याचे महाराष्ट्र संघटनेचे सचिव रवींद्र सोनवणे यांनी कळविले आहे.

चंदीगड येथे २७ ते १ जानेवारी दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत ते भाग घेतील.रुद्रप्रतापने गोंदिया, सोलापूर व सातारा येथे झालेल्या राज्य स्पर्धेत रौप्य, कांस्य पदक व मागील तीन वर्षापासून शालेय राज्य स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

भक्ती हिने सांगली, सातारा, गोंदिया, लातूर , सांगली येथे झालेल्या राज्य सॉफ्टटेनिस स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त केले. मागील वर्षी चंदिगड येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने कांस्य पदक प्राप्त केले होते. तमिळनाडू येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतही महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते.



या कामगिरीच्या जोरावर त्यांची महाराष्ट्र संघात निवड झाली. त्यांना सुधीर सालगुडे, महेश झांबरे , पूजा सालगुडे, चंद्रकांत वाघमोडे, बालाजी केदार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्रा. संतोष गवळी, लॉन टेनिस राज्य मानद सचिव राजीव देसाई, विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड,सहसचिव शिवाजी वसपटे यांनी अभिनंदन केले.



### संगमेश्वर महाविद्यालयाच्या दोघींना रौप्य पदक; आंतरविद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेमध्ये संगमेश्वर महाविद्यालयाच्या कांचन चौगुले व शर्वरी वाघमोडे या दोघींनी आंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघाकडून खेळत असताना उपांत्य सामन्यात त्यांनी पुणे विद्यापीठास नमवून अंतिम सामन्यांमध्ये पाटण विद्यापीठाकडून निसटता पराभव झाला. या कामगिरीवरच या दोघींची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी व खेलो इंडियासाठी निवड झाली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### मुख्याध्यापक कोल्हे यांना राज्यस्तरीय क्रांतीसूर्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**पिलीव, दि. २७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगरचे मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी शिक्षक म्हणून जे उल्लेखनीय कार्य केले आहे यामध्ये लोकसहभागातून पालक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या विशेष सहकार्याने शाळेचा कायापालट असो कि गुणवत्ता वाढीसाठी जे उल्लेखनीय कार्य केले आहे. याचीच दखल घेऊन पुणे येथील जगदीशब्द फाउंडेशनने त्यांना राज्यस्तरीय क्रांतीसुर्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे. या पुरस्काराचे वितरण ५ जानेवारी रोजी म्हणजेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुणे येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात सकाळी ११ वाजता सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे फाउंडेशनच्या वतीने करणयात आले आहे. मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांना सदरचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घडयाळे, उपाध्यक्ष स्वाती गारुळे, सरपंच महावीर धायगुडे,उपसरपंच स्वाती मदने, माजी उपसरपंच राणी पवार, माजी उपसरपंच तथा शिक्षण तज्ञ संजय पाटील, माजी अध्यक्ष देवीदास पाटील, लक्ष्मण पवार, अणणासो ठेंगल, रुपाली मदने, भाग्यश्री गोंजारी यांनी अभिनंदन केले.





### अक्कलकोटमध्ये ऑनलाईन शिधापत्रिका वाटपाने ग्राहक दिन साजरा

**अक्कलकोट, दि. २७ डिसेंबर-**

ई-वितरण प्रणाली अंतर्गत कार्डधारकास ऑनलाईन शिधापत्रिका वाटप करून अखिल भारतीय ग्राहक पंचायतकडून अक्कलकोट तहसिलदार कार्यालय येथे शुक्रवारी राष्ट्रीय ग्राहक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. तहसिलदार विनायक मगर अद्यक्षस्थानी होते. याप्रसंगी अखिल भारतीय ग्राहक पंचायत अक्कलकोट शाखेचे अध्यक्ष अभिजीत लोके, संघटक प्रशांत केसकर, शांतप्पा कलबुर्गी, मुख्याध्यापक अभय शेट उपस्थित होते. या वेळी संघटक प्रशांत केसकर यांनी ग्राहक संरक्षणाबाबत विविध बाबतीत मार्गदर्शन केले. यावेळी निवासी नायाब तहसिलदार विकास पवार, पुरवठा निरिक्षण अधिकारी विराज वासेकर, पुरवठा निरिक्षक पी. डी. शेंडगे, पुरवठा लिपीक ए. एस. भैरामडगी उपस्थित होते. सूत्रसंचालन रास्तभाव धान्य दुकानदार दिलीप काजळे यांनी केले. आभार पुरवठा निरिक्षण अधिकारी विराज गजानन वसेकर यांनी मानले.

# वाघ कारी परिसरातच; शुक्रवारी त्याचे दर्शन नाही

**वन विभागाची डे-नाईट गस्ती पथके तैनात | पुण्याची रेस्क्यू टीमही तळ ठोकून | जंगल सोडून तो बाहेर आल्याने चिंतेचा विषय**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

गेल्या आठ दिवसांपासून बार्शी तालुक्यातील ढेंबरेवाडी, घोळवेवाडी, कारी परिसरात दबा धरून बसलेला वाघ राज्यात सर्वत्र चर्चा आणि कुतूहलाचा विषय बनला आहे. असे असले तरी गुरुवारी दुपारी कारी भागात दिसून आलेल्या या वाघाचे शुक्रवारी दिवसभर मात्र कोणाला दर्शन झाले नाही. मात्र याच परिसरात त्याच्या पायाचे मोठे ठसे दिसून येत आहेत. एकंदरीत जंगलाचे क्षेत्र सोडून हा वाघ सपाट भागात बाहेर आल्याने काळजीचे वातावरण मात्र निश्चितपणे तयार झाले आहे.

हा वाघ याच परिसरात आहे की, धाराशिवकडे गेला हे मात्र समजू शकले नाही. वाघावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्याला ताब्यात घेण्यासाठी बार्शी, पुणे, सोलापूर या ठिकाणची गस्ती पथके डे-



नाईट त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवून आहेत. याशिवाय पुणे येथील रेस्क्यू पथकही या भागात तैनात करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती देताना बार्शीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अलका करे म्हणाल्या की, कारी परिसरामध्ये वाघाचे मोठे पद मार्ग दिसून आले असून मोठमोठे ठसेही आढळून आले आहेत. यामुळे घोळवेवाडी, ढेंबरेवाडी व कारी या भागात मात्र आज वाघाचे दर्शन झाले नाही. ढेंबरेवाडी भागात दोन घोळवेवाडी भागात दोन असे ट्रॅप कॅमेरे देखील लावले आहेत. यासोबतच सोलापूर, बार्शी, पुणे वन विभाग आणि प्राणी मित्रांची अशा तीन टीम दिवस रात्र गस्त घालत फिरत आहेत. हा वाघ सुरुवातीच्या टप्प्यात येडशी अभयारण्य तसेच ढेंबरेवाडी गुळवेवाडी चिंचोली या परिसरात वास्तव्यास होता हा भाग जंगलाचा भाग आहे.त्यामुळे थोडीशी भीती कमी आहे. मात्र हा वाघ आता जंगलातून बाहेर येऊन कारी, नारी परिसरात दाखल झाल्याने व तो ज्वारीच्या क्षेत्रात आढळून आल्याने हा थोडा चिंतेचा विषय बनला आहे. येथून हा वाघ धाराशिव जिल्ह्यात गेल्या असल्याची शक्यताही नाकारता येत नाही. शुक्रवारी दिवसभरात धाराशिवचे उपवनसंरक्षक बी. ए. पोळ, येडशीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे, बार्शीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अलका करे यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही परिक्षेत्रातील कर्मचारी, अधिकारी तसेच गस्तीपथक या परिसरात बारीक लक्ष ठेऊन आहे.

**सतर्कता बाळगा :** नागरिकांनी दिवस असो किंवा रात्री सतर्क राहून काळजी घ्यावी असे आवाहनही वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. सोबतच तालुक्याच्या परिसरात काही भागात बिबट्या आढळून आल्याचे देखील चर्चा केली जात आहे. त्यामुळे बिबट्याचा वावरही असल्याचे निष्पन्न होत आहे. तो रात्रीच्या वेळी जास्त बाहेर पडतो. त्यामुळे रात्रीच्या वेळी एकट्याने बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन अलका करे यांनी केले आहे.

**कुत्र्यांना बिबट्या करतो आकर्षित :** बाहेर फिरत असताना सर्व प्रकारची दक्षता घ्यावी. भटक्या कुत्र्याची संख्यादेखील वाढली आहे. बिबट्या त्यांना आकर्षित करतो. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचाही बंदोबस्त करावा. अचानक बिबट्याजवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा आणि बिबट्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्या. त्याला डिवचण्याचा बिलकुल प्रयत्न करू नये आणि तसेच आढळल्यास तात्काळ वन विभागाला कळवावे असे आवाहनही अलका करे यांनी केले आहे.



## इस्रोतील शास्त्रज्ञाच्या हस्ते बार्शी तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रीसर्च बार्शी या प्रांगणामध्ये बार्शी तालुका विज्ञान प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाप्रसंगी बेंगलोरु येथील इस्त्रो शास्त्रज्ञ म्हणून कार्य करत असणाऱ्या वैष्णवी प्रभाकर पाटील या उपस्थित होत्या.

वैष्णवी पाटील यांनी विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान व संशोधन यामधील फरक स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना संशोधनात करिअर करण्याचे व बार्शी तालुक्यातून जास्तीत जास्त वैष्णवी पाटील तयार होतील यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे, असे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक बार्शी तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके यांनी केले. प्रास्ताविकामध्ये बाल संशोधक तयार व्हावेत या दृष्टिकोनातून या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते, असे सांगितले. यावेळी प्राचार्य लेंगरे, बार्शी तालुका अध्यापक मंडळाचे अध्यक्ष बेंद्रे, बार्शी टेक्निकलचे मुख्याध्यापक टकले, केंद्रप्रमुख धनंजय जाधवर व वैष्णवी पाटील यांचे आई-वडीलही उपस्थित होते. अध्यक्षस्थानी बार्शी नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे होते. बनसोडे यांनी विद्यार्थ्यांनी प्रत्येक घटनेचा कार्यकारणभाव समजावून घेऊन आपल्यामध्ये संशोधक वृत्ती निर्माण करावी, असे आवाहन केले. नियोजन बार्शी तालुक्याचे समन्वयक प्रताप दराडे, एमआयटी कॉलेजचे अंधारे, मुंडे, माळी यांनी केले. हे प्रदर्शन २७ व २८ डिसेंबर रोजी सकाळी दहा ते पाच या कालावधीमध्ये एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग व रिसर्च, आगळगाव रोड, बार्शी या ठिकाणी होत आहे. या प्रदर्शनात उच्च प्राथमिक गट सहावी ते आठवी एकूण २३४ विद्यार्थी, माध्यमिक व उच्च माध्यमिक गट १४२ विद्यार्थी प्राथमिक शिक्षक २, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक ३ व प्रयोगशाळा सहाय्यक परिचर १ अशा एकूण ३८२ स्पर्धकांनी भाग घेतलेला आहे. आज २८ रोजी या विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस वितरण होणार आहे.

## कार्यालयात येणाऱ्यांची नोंद होणार : नरहरे

**▸ कार्यालयात दाखल तक्रारींचा महिन्यात होणार निपटारा**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ डिसेंबर-**

विविध कामकाजासाठी व तक्रार करण्यासाठी तहसील कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक तक्रारदार व नागरिकांची तहसीलच्या दप्तरी नोंद होऊन त्यांच्या तक्रारींचा एक महिन्यांमध्ये निपटारा होणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नवीन वर्षात एक जानेवारीपासून या उपक्रमाचा सुरुवात करण्यासंदर्भात आदेश दिल्याची माहिती मंद्रुप अप्पर तहसीलचे तहसीलदार सुजित नरहरे यांनी दिली.



एक जानेवारीपासून तहसील कार्यालयात आल्यानंतर प्रत्येक नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, विविध योजनेसाठी येणारे लाभार्थी व तक्रारदारांची नोंद तहसीलच्या दप्तरांमध्ये करण्यात येणार आहे. कामाविषयी माहिती व तक्रारीसंदर्भात सविस्तर नोंद घेऊन त्या तक्रारींची संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. एक महिन्यानंतर त्या संदर्भात बैठक घेऊन त्या तक्रारींचा निपटारा करण्यात येणार आहे. त्यामुळे महसूल कार्यालयात येणाऱ्या तक्रारदारांबरोबर त्यांच्या तक्रारींची नोंद होऊन त्यांची कामे लवकरात लवकर मार्गी लागणार आहेत. या उपक्रमामुळे तक्रारदारांचे होणाऱ्या चकरा व हेलपाटे वाचणार आहेत. शिवाय वेळ व पैशाची बचत होणार आहे. त्यामुळे तक्रारदारांना दिलासा मिळणार आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीस एक जानेवारीपासून या उपक्रमाला सुरुवात करण्यात येणार असून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यासंदर्भात आदेश दिल्याचे तहसीलदार नरहरे यांनी सांगितले.

### पानगावच्या दर्शन जगताप यांचे सीए परीक्षेत यश

**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

तालुक्यातील पानगाव येथील आणि सध्या मुंबई बोरीवली येथे राहणाऱ्या दर्शन दत्तात्रय जगताप याने इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया आयोजित लेखापाल (सीए) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



नुकत्याच जाहीर झालेल्या निकालामध्ये दर्शनने आपली गुणवत्ता सिद्ध करत सीएची परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. दर्शनने आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांच्या मोलाच्या मार्गदर्शनाला व पाठिंब्याला दिले आहे. त्याच्या या यशाबद्दल राऊत, पाखरे, मोरे आणि मचाले कुटुंबियांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. दर्शन जगतापच्या या उल्लेखनीय यशामुळे पानगाव गावाचे नाव उंचावले असून त्याच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## बजाज ऑटोने लॉन्च केली आतापर्यंतची सर्वोत्तम चेतक

**फ्लॅगशिप ३५ सीरीज ३ व्हेरियंट्समध्ये उपलब्ध**

**पुणे, दि. २७ डिसेंबर-**

बजाज ऑटो लिमिटेड या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल २-व्हीलर आणि ३-व्हीलर कंपनीतर्फे 'आतापर्यंतची सर्वोत्तम चेतक' ही फ्लॅगशिप ३५ सीरिज लाँच करण्यात आली आहे. ही सीरिज तीन व्हेरियंट्समध्ये उपलब्ध असून, नवीन फ्लोअरबोर्ड बॅटरीज, नवीनतम तंत्रज्ञान आणि अतिरिक्त सुरक्षा फीचर्सनी सुसज्ज आहे.

आतापर्यंतची सर्वोत्तम बजाज चेतक : '३५ सिरीज' है नाय ३.५ ज्ञथह क्षमतेच्या शक्तिशाली बॅटरीवरून देण्यात आले आहे. चेतक ३५०१, ३५०२, आणि ३५०३ या मॉडेल्स खास सोयीस्कर राइडिंगसाठी, मोठ्या बूट स्पेससाठी आणि चार्जिंगसाठी लागणारा कमी वेळ यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत. यामुळे रायडर्सना लांब अंतराचा प्रवास, अधिक सामान नेणे आणि पुढील राइडसाठी लवकर तयार होणे शक्य होते.

महत्त्वाची फीचर्स : सर्वाधिक रेंज : एका चार्जवर १५३ किमीची सुधारित रेंज. सर्वात जलद चार्जिंग फक्त ३ तासांत ०-८०% चार्जिंग, सर्वात मोठा बूट स्पेस नवीन फ्लोअरबोर्ड बॅटरीजमुळे ३५ लिटरचा अंडर-सीट स्टोरेज मिळते. है या विभागातील सर्वाधिक स्टोरेज आहे.

टेकपॅकसह अतिरिक्त फीचर्स : स्मार्ट टचस्क्रीन कन्सोल : इंटिग्रेटेड नॅव्हिगेशन, म्युझिक कंट्रोल, डॉक्युमेंट स्टोरेज आणि कॉल हँडलिंग यांसारख्या सुविधा. सुरक्षा फीचर्स: रिमोट इम्मोबिलायझेशन, गाइड-मी-होम लाईट्स, जिओ-फेन्सिंग, अँटी थेफ्ट आणि ॲक्सिडंट डिटेक्शन.

चेतक '३५ सिरीज'च्या लॉन्चबाबत बजाज ऑटोच्या अर्बनाईट बिझनसे युनिटचे अध्यक्ष एरिक वास म्हणाले, चेतक '३५ सीरिज' हे इलेक्ट्रिक टू-व्हीलर बाजारातील आमच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे प्रतीक आहे. आम्ही अलीकडच्या महिन्यापर्यंत आमचे आघाडीचे स्थान अधिक भक्कम केले आहे. ही फ्लॅगशिप सीरिज विशेषतः तरुण रायडर्सना आकर्षित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली असून, यात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि निओ-क्लासिक शैलीची सांगड घालण्यात आली आहे. आमच्या सर्वसमावेशक उत्पादन श्रेणीमुळे आता प्रत्येक रायडरसाठी एक चेतक उपलब्ध आहे.

हरित प्रवास क्रांतीमध्ये सामील व्हा खास ऑफर्ससह : ग्राहक भारतभरातील ३५०० हून अधिक चेतक डीलरशिपला भेट देऊ शकतात किंवा www.chetak.com वर ऑनलाइन टेस्ट राइड बुक करू शकतात. ३५०१ ची डिलिव्हरी डिसेंबरच्या अखेरीस आणि ३५०२ ची डिलिव्हरी जानेवारीत सुरू होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे सर्वांसाठी एक हरित नवीन वर्ष सुनिश्चित होईल.

▸ एका चार्जवर १५३ किमीची सुप्रीम रेंज, लांब पल्ल्याच्या राइड्ससाठी रेंजची चिंता करायची गरज नाही. ▸ टीएफटी टचस्क्रीन, ज्यात नकाशे, म्युझिक कंट्रोल, कॉल हँडलिंग आणि अनेक सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत. ▸ ३५ लिटरचे अंडर-सीट स्टोरेज ईव्ही २-व्हीलर विभागातील सर्वांत मोठी स्टोरेज स्पेस. ▸ फक्त ३ तासांत ०-८०% चार्जिंग या विभागातील चार्जिंगसाठी लागणारा सर्वात कमी वेळ ▸ सॉलिड मेटल बॉडी खझ६७ वॉटर रेझिस्टन्स रेटिंगसह, कोणत्याही वातावरणात विश्वासार्हता सुनिश्चित करते. ▸ ३५०१ १,२७,२४३/- आणि ३५०२ १,२०,०००/- या किमतीत (एक्स-शोरूम बंगळुरू) उपलब्ध, डीलरशिपमध्ये आणि www.chetak.com या वेबसाइटवर बुकिंग सुरू झाले आहे.

## अन्नछत्र मंडळाकडून उत्तम उपाययोजना

**▸▸ठाण्याच्या आयकर विभागाचे मुख्य आयुक्त महेश कुमार यांचे मत**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासकडून भक्तांना मूलभूत गरजा ओळखून विविध उपाययोजना केल्या जात असल्याने मनोगत ठाणे आयकर विभागाचे मुख्य आयुक्त महेश कुमार यांनी व्यक्त केले.



श्रीक्षेत्र अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता, मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या उपस्थितीत न्यासाचे विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत सोलापूर आयकर विभागाचे अधिकारी कृष्ण चैतन्य, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके उपस्थित होते. यावेळी लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, पिंटू साठे, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब घाडगे, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, प्रविण घाडगे, गोटू माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते.

## शासनाने शिक्षणातील समस्या सोडवाव्यात

**▸▸अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची मागणी**
**▸▸अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा दिला इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

रखडलेली प्राध्यापक भरती, विद्यार्थी परिषद निवडणुका, बोगस महाविद्यालयांचे वाढते प्रमाण यासह शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी करत अंमलबजावणी न झाल्यास रस्त्यावर उतरण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.




सोलापुरात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ५९ वे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात या विविध समस्या, विषयांवर चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात आले. तसे प्रस्तावही पारित करण्यात आले आहेत. रखडलेली प्राध्यापक भरती, विद्यार्थी परिषद निवडणुका, बोगस महाविद्यालयांचे वाढते प्रमाण यासह शिक्षण क्षेत्रात विविध समस्या आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत चालणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अनधिकृत दंड वसुली करणे, अनुशेष परीक्षांना अर्ज करण्यासाठी अधिकचे शुल्क वसूल करणे, उपस्थितीची टक्केवारी पूर्ण न भरल्यास विद्यार्थ्यांकडून परीक्षेला पात्र करण्यासाठी जादाचे पैसे घेणे असे प्रकार सर्रास घडत आहेत असा आरोप यावेळी करण्यात आला. हा भ्रष्टाचार थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कठोर पावले उचलावीत. राज्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. यामुळे शासनाने ते नियंत्रित आणण्यासाठी महिला स्वसंरक्षण शिबिर, मानसिक स्थैर्य, समय सूचकता याकरिता समुपदेशन उपक्रम आयोजित करावेत तसेच अशा घटना घडू नये त्यसाठी उपाययोजना कराव्यात.

ओटीटी प्लॅटफॉर्मवर वेब सिरीज मार्फत पसरवली जाणारी अश्लीलता, दूरदर्शन वरील मालिका - चित्रपट समाज मनावर नकारात्मक परिणाम पाडत आहेत. यामुळे अशा प्लॅटफॉर्मवर, माहितीवर नियमांची चौकट घालण्यात यावी यासह विविध मागण्यासंदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी शासनाने तत्काळ शासन निर्णय घ्यावेत. अंमलबजावणी करावी यासाठी पाठपुरावा सुरू आहे. अंमलबजावणी न झाल्यास अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे. या पत्रकार परिषदेस आदित्य मुस्के, अनघा जाधव, यश उडाणशिव, पियुशा हिंगमिरे आदी उपस्थित होते.

## सोने, ट्रॅक्टर चोरी करणारी टोळी जेरबंद; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ डिसेंबर-**

सोने, ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीला सांगोला पोलिसांनी जेरबंद करुन मुद्देमाल जप्त केला. सांगोला पोलीस ठाणे येथे मुक्ताई मंगल कार्यालय (शिवणे, ता.सांगोला) येथे लग्नकार्याचे वेळी फिर्यादी विद्या अविनाश लेंडवे (रा.आंधळगांव, ता. मंगळवेढा) यांच्या पर्समधून सुमारे २३ ग्रॅम वजनाचे ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरी झाल्याबाबत तसेच कडलास नाका, सांगोला येथे लावण्यात आलेला फिर्यादी रविंद्र विठ्ठल महंकाळ (रा. कडलास) यांचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. एम. एच. ४५/ ए. क्यू. ६८२३) असे चोरी झाल्याबाबत अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हे दाखल होते.

तपास करताना तांत्रिक व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मंगल कार्यालय येथे चोरी करणारे आरोपी हे सांगोला पोलीस ठाण्याकडील रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता नईम अमीर तांबोळी (रा. दिघंची, ता. आटपाडी, सध्या रा. कडलास रोड, खंडागळे हॉस्पिटल जवळ, सांगोला) व सुहानी पिराजी सावंत (रा. भीमनगर, सांगोला) यांची नावे निष्पन्न करुन त्यातील आरोपी नईम तांबोळी यास अटक करण्यात आली आहे. तसेच नईम तांबोळी याने पोलीस चौकशीदरम्यान कडलास नाका, सांगोला येथून महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर हा त्याचा मित्र बबलू भोसले (रा. परीट गल्ली, सांगोला) याच्यासोबत मिळून चोरी केल्याची कबुली दिली आहे. आरोपी नईम तांबोळी याच्याकडून सदरचा ट्रॅक्टर व सोन्याचे गंठण असा सुमारे ४ लाख ९० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात सांगोला पोलिसांना यश आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ अस्लम काझी, पो. ना. बाबासाहेब पाटील, पोना वाकीटोळ, पोकॉ लक्ष्मण वाघमोडे तसेच सायबर पोलीस ठाणेकडील पोहेकॉ युसूफ पठाण यांनी पार पाडली.



सांगोला पोलीस ठाणे हद्दीत चोरीच्या घटना पाठीमागील काही दिवसात घडलेल्या असून पोलीस अंमलदाराची प्रभावी गस्त करण्यात येत आहे. पोलीस ठाणे हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी रात्रगस्त, नाकाबंदी नेमण्यात आली आहे. यामुळे काही दिवसापासून अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांना आळा बसला आहे. यापुढेही प्रभावी गस्त ठेवण्यात येणार आहे. आठवडा बाजारामध्ये मोबाईल चोरीचा छडा लावण्यासाठी साध्या वेशात गस्त ठेवण्यात येत आहे.

**- भीमराव खणदाळे, पोलीस निरीक्षक, सांगोला**

## संक्षिप्त वृत्त



### दिव्यांगांना सहाय्यक उपकरण देण्यासाठी दोन दिवसांपासून तपासणी मोजमाप शिबिर

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि. (सी.एस.आर फंड अंतर्गत) व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, मुंबई (अलिम्को ) यांच्या वतीने जिल्ह्यातील दिव्यांगांना सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी (मोजमाप) शिबिराला दोन दिवसांपासून प्रारंभ झाला. शनिवार, (दि. २८) पर्यंत चालणा-या या शिबिरात जवळपास ४०० पर्यंत दिव्यांगांची तपासणी झाली. जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभाग व नॅब संचलित जिल्हा पुनर्वसन केंद्र यांच्या आयोजनातून सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांच्या हस्ते करण्यात आले. अलिम्कोच्या डॉ. प्रियंका चंद्रा, दिव्यांग विभागाचे प्रभारी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे, नॅबचे सचिव शशिभूषण यलगुलवार, कार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी, अलीम्कोच्या डॉ.किरण पावरा, डॉ. रितू, शोबीत तसेच नॅब संस्थेचे सदस्य डॉ.किशोर देशपांडे, संस्थेचे विभाग प्रमुख नरसिंह आसादे, सौरभ शिंगाडे, संगीता गायकवाड, विशाल शिंदे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील दिव्यांगांना (अंध, कर्णबधिर, अस्थीव्यंग) त्यांच्या आवश्यकतेनुसार सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी कवले यांनी केले. यावेळी अलीम्कोच्या वतीने डॉ.प्रियंका चंद्रा यांनी लाभार्थ्यांनी योग्य कागदपत्रे आणून साहित्याचा लाभ घ्यावा, असे सांगितले. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. मेघा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. रामचंद्र कुलकर्णी आभार मानले.

### बाहुबली दिगंबर जैन मंदिरात रविवारी महामस्तकाभिषेक सोहळा

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

विजापूर रोडवरील श्री १००८ भगवान बाहुबली दिगंबर जैन मंदिरात रविवार दि. २९ डिसेंबर रोजी भगवान बाहुबली यांच्या महामूर्तीचा २१ वा महामस्तकाभिषेक आणि वार्षिकोत्सव आयोजित केला आहे, अशी माहिती मंदिराचे अध्यक्ष सुधीर पंडित यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता मंडप उद्घाटन ॲड. साधना व प्रकर्ष संगवे यांच्या हस्ते, ध्वजारोहण सौ.लीझ व श्री. राजेश शांतीलाल व्होरा ( पंढरपूर) यांच्या हस्ते, बाहुबली फोटो अनावरण सौ. कीर्ती व श्री दिलीप - जयपाल काक्रंबे( पुणे) यांच्या हस्ते व दीपप्रज्वलन सौ. सविता व श्री. संजय भानुदास बिडवई (सोलापूर) यांच्या हस्ते करण्यात येईल. त्यानंतर ११ वाजता जिनबिंबाचा पंचामृत महामस्तकाभिषेक, महाशांतिमंत्र व पंचारती होईल. प्रतिवर्षाप्रमाणे मानाचा शाश्वत अभिषेक सौ. ज्योती व सुधीर बाहुबली पंडित परिवारातर्फे, मांगलिक कार्यक्रम श्री माणिकजी पंडित यांच्या मार्गदर्शनामध्ये होणार आहे. महामस्तकाभिषेकानंतर महाप्रसादाचे आयोजन माजी विश्वस्त स्व. अशोक वैद्य यांच्या स्मरणार्थ श्रीमती उषादेवी वैद्य, श्रीकांत औषधी भांडार अकलुज यांच्यातर्फे करण्यात आले आहे. प.पू. १०८ प्रज्ञाश्रमण आचार्य श्रीदेवनंदीजी महाराजांच्या प्रेरणेने निर्मित या मंदिराचे वैशिष्ट्य असे की, आचार्य देवनंदी महाराजांच्या प्रेरक उपस्थितीत या मंदिराची निर्मिती अवघ्या १०८ दिवसात करण्यात आली आहे. वर्षातून एकदाच या मूर्तीचा महामस्तकाभिषेक केला जातो. एरवी फक्त चरणांचाच अभिषेक होतो. या धार्मिक कार्यक्रमास सकल जैन बांधवांनी वेळेवर उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन भगवान बाहुबली जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस विश्वस्त प्रा. डॉ. अजित माणिकशेटे, सेवा समिती सदस्य अरुणकुमार धुमाळ, राजेंद्र पाटील, अभिनंदन विभूते आदी उपस्थित होते.

# ढाबा चालक, मद्यपी ग्राहकांना साडेचार लाखांचा दंड

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची विनापरवाना ढाब्यांवर कारवाई

### चालू महिन्यात १८७ गुन्ह्यात ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने गेल्या तीन महीन्यात अवैध विनापरवाना मद्य पिण्यास परवानगी देणा-या १७ ढाब्यांवर कारवाई करीत १७ ढाबा मालक व ४५ मद्यपी ग्राहकांना ४ लाख ६७ हजारांचा दंड करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागावतीने केलेल्या धडक कारवाईमध्ये कालावधीमध्ये १ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८७ गुन्हे नोद करण्यात आले आहे. या कालावधीत २४ वाहनासह एकुण ७६ लाख ६६ हजार ३८ रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये मातोश्री ढाबा, दुर्गा ढाबा (होटगी रोड), जयभवानी ढाबा (मंगळवेढा रोड), सावजी कोड्रिंक्स (कन्ना चौक), तसेच पंढरपुर कासेगाव येथील साईराजे, महाराजा ढाबा (तारापूर ता. माढा) येथील राणा ढाबा, माळशिरस येथील सावनी ढाबा, शिवनेरी (टाकळी सिकंदर ता. मोहोळ), हॉटेल सावली (भोगाव ता.उ. सोलापूर), शुभम ढाबा (सांगोला ता. सांगोला), राहुल गणपत जाधव याचे राहते घर (भाळवनी ता. पंढरपुर), श्रीराम कोल्ड्रिंक्स (जोडभावी पेठ सोलापूर), जय भवानी ढाबा (बेलाटी ता.उ. सोलापूर), हॉटॅल अपुर्वा ढाबा (तुळजापुर रोड तळेहिप्परगा) या १७ ढाब्यांवरती कारवाई करुन ब्रीथ् ॲनलायझर चा वापर करुन वैदयकीय चाचणी करण्यात आली. त्यानंतर १७ ढाबा मालक व ४५ मद्यपी ग्राहकांना न्यायालायासमोर हजर केले असता ढाबा मालकास प्रत्येकी २५ हजार रुपये व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी तीन हजार रुपये इतक्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून एकुण ४ लाख ६७ हजार रुपये इतका दंड जमा करुन घेण्यात आला आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये ढाब्यांवर कारवाई यापुढेही अशीच चालू राहणार आहे. परवाना नसणाऱ्या ठिकाणी मदय प्राशन केल्याने संबंधित जागा मालक व मदयपी या दोघांवर कारवाई होऊ शकते याची नोंद संबंधितानी घ्यावी असे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने सांगण्यात आले.



#### एक दिवसीय परवाना घेण्याचे आवाहन...

नाताळ, ३१ डिसेंबर व नववर्षाच्या पार्श्वभुमीवर हॉटेल, रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात येणा-या पार्ध्यामध्ये मद्य सेवनाकरीता आवश्यक असणारा एक दिवसीय विशेष परवाना राज्य उत्पादन शुल्क सोलापूर विभागाकडुन तात्काळ देण्याची सोय उपल्बध आहे. ज्या हॉटेल व रिसॉर्टधारकांना पार्टीमध्ये मद्य ठेवण्यात येणार आहे अशा हॉटेल्स व रिसॉर्धारकांनी एक दिवसाचा परवाना अर्ज करुन घ्यावा, असे अवाहन या विभागाकडुन करण्यात येत आहे. सोलापूर शहरामध्ये नववर्षाच्या स्वागतासाठी आजतागायत होटगी रोडवरील हॉटेल बालाजी सरोवर, व दमाणी नगर येथील ऑफसेट स्पेरॉलीटी एल एल पी या फक्त दोन हॉटेल्स कडुन एक दिवसीय विशेष परवाना घेण्यात आलेला आहे. ज्या हॉटेल व रिसॉर्टधारकांनी परवाना नसणाऱ्या ठिकाणी मदय विक्री व प्राशन करण्या परवानगी दिल्यास संबंधित जागा मालक व मदयपी या दोघांवर कारवाई होऊ शकते याची नोंद संबंधितानी घ्यावी.

#### थर्टी फस्टच्या पार्श्वभूमीवर विशेष पथकांद्वारे लक्ष...

३१ डिसेंबर व नववर्षाच्या पार्श्वभुमीवर ढाबे, चायनिज गाड्या व हॉटेल्स, क्लब रिसॉर्ट मध्ये कारवाई करण्याकरीता सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये विशेष पथके नेमण्यात आलेली आहेत. नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी ठिकठीकाणीढाबे, चायनिज गाड्या व हॉटेल्स, क्लब रिसॉर्ट मध्ये पार्टीचे आयोजन केले जात असते अशा प्रकारच्या ढाबे, चायनिज गाड्या व हॉटेल्स, क्लब रिसॉर्ट मध्ये बनावट व परराज्यातील मद्याची अनाधिकृत विक्री केली जाते, जी मानवी शरीराला अपायकारक असते. अशा प्रकारच्या मद्य पिणा-या ग्राहक व मालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. मद्यपिणा-या ग्राहकांनी मद्य अधिकूत वाईन शॉप/ शासनमान्य देशी दारू दुकानातुनच मद्य खरेदी करावे व अधिकृत परमिटरुमव बिअर बार मध्ये मद्य सेवन करावे.

### पत्नीला आणण्यासाठी गेलेल्या पतीसह दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

माहेरी गेलेल्या पत्नीस आणावयास गेलेला पती व त्याच्या वहिनीस मारहाण करण्यात आली. हा प्रकार २५ डिसेंबर रोजी घडला.

याबाबत सोनी तुषार तुपदोळकर ( वय २५, रा. कोनापूरे चाळ सोलापूर) यांनी फिर्यादी दिली. त्यावरून रुक्मिणी अलझेंडे व विशाल अलझेंडे ( रा. कोनापुरे चाळ, सोलापूर) विरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील सोनी यांचा दीर दत्तात्रय यांची पत्नी सुनिता हिस माहेरी म्हणजेच कोनापुरे चाळ येथे गेली होती. घटने दिवशी म्हणजेच २५ डिसेंबर रोजी यातील फिर्यादी सोनी व त्यांचा दीर दत्तात्रय असे दोघे त्याची पत्नी सुनिता यांना आणावयास गेले होते. त्यावेळी यातील आरोपी रुक्मिणी व विशाल यांनी सुनीता हीस सासरी पाठवीत नाही असे म्हणून शिवीगाळ करून दत्तात्रय यास फरशीने मारहाण केली. त्यावेळी भांडण सोडविण्याकरिता फिर्यादी गेल्या असता त्यांनाही आरोपींनी मारहाण करून जखमी केले. या गुन्ह्याचा तपास हवालदार चव्हाण करत आहेत.

### अश्विनी हॉस्पिटलमधून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

शहरातील आश्विनी हॉस्पीटल येथून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत महेश तानाजी पाटील (वय २८, रा. कलाहंगरा, ता. गुलबर्गा, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश पाटील याने १६ सप्टेंबर रोजी दुपारी अश्विनी हॉस्पीटलसमोर त्याची एमएच १३ एई २०२६ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

### सोलापूर रेल्वे विभागाच्या व्यवस्थापकपदी सुजित मिश्रा यांची नियुक्ती

#### नीरज कुमार दोहरे यांची बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सोलापूर रेल्वे विभागाच्या व्यवस्थापकपदी सुजित मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली असून नीरज कुमार दोहरे यांची बदली करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश रेल्वे विभागाकडून २६ डिसेंबर रोजी काढण्यात आला आहे. सोलापूर रेल्वे विभागाचे



माळवते व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे हे ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सोलापुर रेल्वे विभागात रुजू झाले होते.

त्यांच्या कार्यकाळात सोलापूर रेल्वे विभागात दुहेरी लाईन, विद्युतीकरण, रेल्वे स्थानकाचे सुशोभिकरण अशी कामे करण्यात आली.

सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. १ येथून प्लॅटफॉर्म क. ५ वर जाण्यासाठीच्या पदपथाच्या पुलाचे काम मात्र पूर्ण होऊ शकलेले नाही. ते काम नविन व्यवस्थापक मिश्रा यांच्या कार्यकाळात पूर्ण होईल अशी अपेक्षा रेल्वे प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

### जबरी चोरी, मोबाईल, घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस

#### शहर गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर -**

सोलापूर आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पथकाने ६ सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून जबरी चोरी, मोबाईल, घरफोडीचे ५ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी ५१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शंकर चंदुरसिंग मैनावाले (वय २५, रा. आडकी हॉस्पीटलच्या पाठीमागे, आर के स्टुडिओच्या बोळात, बेडर पुल, सोलापूर), महेश हनुमान मौलावाले (वय २३, रा. महात्मा फुले नगर, सिध्दार्थ चौक, कनक अपार्टमेंटच्यासमोर, सोलापूर), अजय मनोज जमादार (वय २३, रा. जय भारत शाळेच्या पाठीमागे, बापूजी नगर, सोलापूर), विजय विष्णु कांबळे (वय २३, रा. हब्बु वस्ती, जगताप हॉस्पीटलच्या पाठीमागे, सोलापूर), सचिन शंकर कदम (वय ४६, रा. लक्ष्मी विष्णु चाळ, महादेव मंदीराजवळ, सोलापूर), विकि किशोर फटफटवाले (वय ३२, रा. बालाजी मठ जवळ, लोधी गल्ली, उत्तर सदर बझार, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी शंकर मैनावाले, महेश मौलवाले, अजय जमादार या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सदर बझार पोलिस व एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या चार गुन्ह्यातील ३२ हजार रुपये किंमतीचे ४ मोबाईल जप्त केले. तसेच सचिन कदम यास ताब्यात घेऊन सलगर वस्ती पोलिस ठाण्यातील चोरीचा गुन्हा उघडकीस आणून ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विकी फटफटवाले यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून सदर बझार पोलिस ठाण्यातील मोबाईल चोरीचा गुन्हा उघडकीस आणून ८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, पोलिस अमंलदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, दत्तात्रय सुळ, अजय गुंड, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, वसिम शेख, सतिश काटे, बाळू काळे, महिला पोलिस कर्मचारी ज्योती लंगोटे यांनी केली.




## अ. भा. मराठी नाट्य परिषदेचे रंगकर्मी पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**



रजनीश जोशी
(नाट्य कलावंत)



नागेश भोसेकर
(सुप्रसिध्दी संगीतकार)



अमीर तडवळकर
(सिने नाट्य कलावंत)



वनमाला किणीकर
(ज्येष्ठ नाट्य कलावंत)



दत्तात्रय श्रीराम
(ज्येष्ठ सिने नाट्य कलावंत)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेच्या वतीने दरवर्षी ज्येष्ठ कलावंताच्या सन्मानार्थ पुरस्कार सोहळा तसेच सध्या रंगभूमीवर कार्यरत असलेल्या कलावंतांना मा. सुशीलकुमार शिंदे रंगकर्मी पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या वर्षी रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्फी थिएटर), सोलापूर येथे हा समारंभ संपन्न होणार आहे. या समारंभास आघाडीचे सिनेनाट्य अभिनेते सुशांत शेलार व धर्मरक्षक संभाजी मालिकेतील बहीर्जी नाईक यांची भूमिका साकारणारे अजय तपकिरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार प्रकाश यलगुलवार हे भूषविणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, दक्षिण साहित्य परिषदेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर, बालरंगभूमीचे अध्यक्ष सीमा यलगुलवार, नाट्य परिषद मध्यवर्तीचे सहकार्यवाह दिलीप कोरके तसेच डॉ. मंदार सोनवणे अध्यक्ष पंढरपूर शाखा, प्रा. अजय दासरी अध्यक्ष महानगर शाखा, मध्यवर्ती नियामक मंडळाचे सदस्य डॉ. विश्वनाथ आवड, प्रा. तेजस्विनी कदम व सुमित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

अ.भा.म.ना.प. उपनगरीय शाखेच्या वतीने यंदाचे वर्षी दिले जाणारे पुरस्कार पुढील प्रमाणे आहेत. विजयकुमार साळुंके पुरस्कृत डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती पुरस्कार - मा. रजनीश जोशी (सिनेनाट्य अभिनेते) सोलापूर. एस. एम. पाटील परिवार पुरस्कृत रंगभूमी संवर्धक सिध्दा पाटील स्मृती पुरस्कार - मा. नागेश भोसेकर (सिनेनाट्य संगीतकार) सोलापूर. शोभा बोल्ली व राजा बागवान पुरस्कृत रंगकर्मी लक्ष्मीनारायण आकेन स्मृती पुरस्कार - मा. अमीर तडवळकर (सिनेनाट्य अभिनेते) सोलापूर. मिलिंद व मंदार काळे पुरस्कृत रंगकर्मी संजीवनी काळे स्मृती पुरस्कार - श्रीमती वनमाला किणीकर (ज्येष्ठ अभिनेत्री व दिग्दर्शक वय वर्षे ८७) सोलापूर. प्रशांत शिंगे पुरस्कृत रंगकर्मी कमल ढसाळ स्मृती पुरस्कार - श्री. दत्तात्रय श्रीराम (ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते, लेखक, दिग्दर्शक व निर्माता) यांना जाहिर झाला असून पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृती चिन्हे, आणि मानपत्र असे आहे. या पुरस्कारासोबतच मा. सुशीलकुमार शिंदे रंगकर्मी सन्मान-२०२४ ही पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले आहे. अश्विनी तडवळकर, ऋतुराज आरसिद, अमोल देशमुख, राजेश जाधव, अशोक किल्लेदार, बाळकृष्ण निमसूडकर, अपर्णा जोशी, सुनंदा शेंडगे, सई देरेकर, अर्चना सलवारु, श्रीनिवास देशपांडे, कुबेर शास्त्री, अरविंद माने, श्याम चव्हाण, उमेश बटाणे, रमेश श्रावण, नमिता देशमुख.

६३ व्या महाराष्ट्र राज्यनाट्य स्पर्धा सोलापूर केंद्रातील पारितोषिक प्राप्त नाट्यसंघांचा सत्कार विजयकुमार साळुंके पुरस्कृत - प्रथम - विक्रमाचा घातांक क्ष (अ. भा. वा. सांप्रादायिक मंडळ, सोलापूर). जयप्रकाश कुलकर्णी पुरस्कृत- द्वितीय - ती रात्र- (अनघ नाट्य मंदिर, सोलापूर) कृष्णा हिरेमठ पुरस्कृत - तृतीय - एका उत्तराची कहाणी - (श्रुती मंदिर, सोलापूर) या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह व मानपत्र असे आहे. तरी या समारंभास सर्व कलावंतांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाट्यपरिषदेच्या उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजयकुमार साळुंके यांनी केले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मनपा शाळेमध्ये राबविला जातोय 'वॉटर बेल' उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

सोलापूर शहरात विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी मनपा मुलांची शाळा क्रमांक २९ भवानी पेठ येथे 'वॉटर बेल' वाजत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. शालेय वेळेत तीन वेळा ही बेल वाजविली जाते. गेल्या पाच वर्षापासून हा उपक्रम या शाळेत घेतला जातोय.



शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शरीरात पाण्याची कमतरता दिसून येत असून, यामुळे अनेक आजारांचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी शाळेच्या वेळापत्रकात तीन वेळा वॉटर बेल वाजविण्यात येत आहे. त्यामुळे या राखीव वेळेत विद्यार्थ्यांना गरजेनुसार पाणी पिता येते. परिणामी त्यांची पाणी पिण्याविषयीची मानसिकता तयार होते व पुढे ती सवय होऊन विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने पाणी पितात, असा विश्वास मुख्याध्यापक गणेश धनवटे, अरुण डोके, नवनाथ माळी, अविनाश हिंगणे यांनी व्यक्त केला.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### सोमवारपासून दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयात सोमवार दिनांक ३० डिसेंबर ते ५ जानेवारी पर्यंत वाचनालयाच्या संग्रहातील दुर्मिळ व इतर ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन सोलापूर आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी सुजित बनसोडे यांच्या हस्ते होणार आहे. हे प्रदर्शन ३० डिसेंबर ते ५ जानेवारी २०२५ पर्यंत सकाळी साडेआठ ते बारा आणि सायंकाळी पाच ते आठ या ग्रंथालयाच्या वेळेत पाहण्यासाठी खुले राहील. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.

### पगार घेऊन घराकडे परतणारा तरुण रिक्षा धडकेत जखमी

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

पगार घेऊन घराकडे मित्राच्या दुचाकीवरून परतताना उलट दिशेने आलेल्या रिक्षा चालकांनी धडक दिल्याने तरुण जखमी झाला. हा अपघात वाय चौकात २५ डिसेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडला. दत्तात्रेय तुकाराम पवार (वय ३४, रा. देगाव , बसवेश्वर नगर सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. घटनेच्या दिवशी फिर्यादी मित्राची दुचाकी घेऊन पगार आणण्याकरिता गेला होता. पगार घेऊन परतत असताना वाय चौकात समोरून उलट दिशेने आलेल्या रिक्षा चालकांनी त्याच्या दुचाकीस धडक दिली. या अपघातात उजव्या पायाच्या करंगळीस मार लागून फ्रॅक्चर झाले आहे. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली. या घटनेचा तपास हवालदार राठोड करत आहेत.

### मार्केट यार्डात शेतकऱ्याचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

मार्केट यार्डातील सिध्देश्वर बँकेजवळ झोपलेल्या सांगलीतील बनपुरी येथील शेतकऱ्याचा १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत सुभाष धोंडीराम गुजले (वय ४५, रा. बनपुरी, ता. आटपाडी, जि. सांगली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑक्टोबर रोजी सुभाष गुजले हे सिध्देश्वर मार्केट यार्डमधील सिध्देश्वर बँकेजवळ झोपले होते. त्यावेळी चोरट्याने गुजले यांच्या शर्टच्या खिशातील १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार माळी पुढील तपास करीत आहेत.

### महिलेला मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

महिलेला मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नागराबाई जितेंद्र कदम (वय ५२, रा. रामजी चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सत्वशिला मुकुंद कदम, तुषार मुकुंद कदम, विकास मुकुंद कदम (रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ डिसेंबर रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास नागराबाई यांची जाऊ सत्वशिला यांचा मुलगा तुषार हा दारू पिऊन आजीला तुमच्या घरात का ठेऊन घेतले असे म्हणून नागराबाई यांना शिवीगाळ करीत होता. त्यास नागराबाई या समजावून सांगत असताना तो ऐकत नव्हता. त्यामुळे नागराबाई व त्यांचा मुलगा हा तुषारच्या घरी त्याच्या आईस सांगण्यासाठी गेले असता सत्वशिला, तुषार व विकास यांनी शिवीगाळ करून नागराबाईच्या डोक्यात कळशीने मारून जखमी केले.

### शेत जमिनीचा पूर्णपणे कब्जा देण्याची मागणी

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील गुरसाळे येथील शेत जमिनीचा प्रांत अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे कब्जा देण्यात यावा तसेच अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी ई तक्रारी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी येथील शेतकरी संतोष पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी. आदेशाप्रमाणे जमिनीवरील पूर्ण अतिक्रमण काढण्यात यावे. सातबारा उतारा देण्यात यावा. न्याय मिळावा या मागणीसाठी यापूर्वीही आझाद मैदानावर उपोषण केले मात्र अद्यापही मागण्यांची पूर्तता करण्यात आली नाही. तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही यावेळी संतोष पाटील यांनी केली आहे.


# १९ हजार कोटींचा शहर प्रारुप विकास आराखडा

### गॅजेट प्रसिद्धीनंतर 30 दिवसात नागरिकांनी हरकती, सूचना द्याव्यात

### महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

महापालिका प्रशासनाने सोलापूर शहराचा १९ हजार २७१ कोटी रुपयांचा प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. गॅझेट प्रसिद्धीनंतर तीस दिवसात नागरिकांनी त्यावर हरकती आणि सूचना द्याव्यात. त्यानंतर या हरकतींवर सुनावणी घेण्यात येईल. अंतिम मंजुरीसाठी हा आराखडा



शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहराचे एकूण १७८.५८ चौरस किलोमीटर क्षेत्र आहे. या संपूर्ण क्षेत्राचा विकास आराखडा सध्या तयार करण्यात आला आहे. यंदा प्रथमच सर्व क्षेत्राचा आराखडा तयार केला जात आहे. जसजशी हद्द वाढ झाली. नवनवीन क्षेत्र जोडले गेले. वेगवेगळ्या क्षेत्राचे तीन आराखडे चालले होते. जुळे सोलापूर, नियोजन प्राधिकरण म्हाडा व इतर एजन्सीचे आराखडे वेगवेगळे होते. यंदा संपूर्ण शहराच्या हद्दीचा आराखडा बनविण्यात येत आहे.

यापूर्वी इरादा जाहीर करणे, लोकांच्या हरकती सूचना मागवणे, प्रस्तावित जमीन उपयोग बनवणे, प्रारूप विकास आराखडा बनवणे, त्यावर हरकती सूचना मागवणे, नियोजन समितीने त्यावर सुनावणी घेणे, नियोजन प्राधिकरणाने तो मंजूर करणे त्यानंतर तो आराखडा शासनाला अंतिम मंजुरीसाठी पाठवणे असे विविध टप्पे आहेत. शहराचा प्रारूप विकास आराखडा २६ डिसेंबर २०२४ रोजी मुदतीत बनविण्यात आला आहे. त्यास महापालिका प्रशासकांनी मंजुरीही दिली आहे. हा शहर विकास आराखडा लवकरच गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. गॅजेट प्रसिद्ध झाल्यानंतर एका महिन्याच्या कालावधीत नागरिकांनी त्यावर हरकती व सूचना द्यावयाच्या आहेत. त्यानंतर या हरकती, सूचनांवर नियोजन समितीकडून सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर नियोजन समिती अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे देईल. दोन महिन्याच्या आत अहवाल शासनाकडे सादर करणे बंधनकारक आहे. शहरातील नागरिकांना चांगले जीवनमान जगता यावे अशा प्रकारे हा आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा तयार करताना विविध सुविधांचा विचार करण्यात आला आहे. दरम्यान १५ ठिकाणी पाण्याच्या टाक्यांचे आरक्षणे आहे. कोर्टाने आठ आरक्षणे हटविले आहेत. या सुविधा प्रस्तावित करताना जास्तीत जास्त आरक्षणे महापालिका व शासकीय जागेवर प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे. काही आरक्षण ही रेखांकनातील सुविधा भूखंडावर प्रस्तावित आहेत.विकास आराखड्यात आरक्षणे शहराच्या गरजेनुसार व वयोगटानुसार अभ्यास करून प्रस्तावित आहेत. त्यासाठी २५ बैठका घेण्यात आल्या. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आरक्षणे प्रस्तावित केली आहेत. यावेळी नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### मागील वीस वर्षात केवळ १५ टक्के आरक्षणे केली विकसित

जुना आराखड्याची अंमलबजावणी पाहिली असता वीस वर्षात एकूण ८२९ पैकी १२१ आरक्षणे विकसित करण्यात आली आहेत. ते प्रमाण १५ टक्के आहे. जमिनीचा विकास करताना नेमका जुना की प्रस्तावित आराखडा लागू होणार असा प्रश्न नागरिकांना पडू शकतो. यामुळे पूर्वीचा आराखडा आणि प्रस्तावित विकास आराखडा याम ध्ये जो कडक आहे. त्याचा उपयोग करण्यात येणार असल्याचेही यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली- उगले यांनी स्पष्ट केले आहे.

### पुढील २० वर्षांचा विकास आराखडा

सोलापूर शहराच्या पुढील वीस वर्षाचा विचार करून करण्यात येत असलेल्या विकास आराखड्यामध्ये एकूण ९२१ आरक्षणे प्रस्तावित केली आहेत. त्यामध्ये नियोजित जमीन किंमत ६ हजार ८९३.९६ कोटी रुपये रेडी रेकनर प्रमाणे तर विकास किंमत १२ हजार ६७८.७७ कोटी रुपये असे एकूण १९ हजार २७१ कोटी रुपयांचा हा प्रारूप विकास आराखडा असणार आहे. सोलापूर शहराच्या पारंपारिक गरजांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, असेही यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### एकूण ९२१ आरक्षणे या आराखड्यात प्रस्तावित

एकूण ९२१ आरक्षणे या आराखड्यात प्रस्तावित केले आहेत. प्रक्षेपित लोकसंख्येची प्रक्षेत्र निहाय अंदाजीत परिगणना सन २०११ च्या जनगणना प्रभाग निहाय काम पूर्ण केले आहे. त्या आधारे सन २०११ च्या तुलनेत सन २०३८ व २०४८ ची वाढ विचारात घेऊन सेक्टर निहाय लोकसंख्या परीगणित केली आहे. त्या आधारे आवश्यक सोयी सुविधा परिगणना केली आहे. मूळ विकास योजनेम ध्ये १६ प्रक्षेत्र कायम ठेवण्यात आली आहेत परंतु प्रक्षेत्र तेराचे क्षेत्र व त्यामधील प्रक्षेपित लोकसंख्या जास्त असल्याने त्याची विभागणी केली आहे. त्यामुळे एकूण प्रक्षेत्रांची संख्या आता १७ झाली आहे.

## सेफ्टी डोअरचा कडी-कोंडा तोडून दागिन्याची चोरी

### संगमेश्वर नगर येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

अक्कलकोट रोडवरील संगमेश्वर नगरात दरवाजा असलेल्या सेफ्टी डोअरची कडी-कोंडा तोडून १०.२ ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेले. हा प्रकार २५ डिसेंबरच्या सायंकाळनंतर २६ डिसेंबरच्या सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडला.

याबाबत स्टिपन सुनील कुमार पवार ( वय ३४, रा. सध्या रा. हिरा हाईटस, सदर बाजार सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यातील फिर्यादी हे २५ डिसेंबर रोजी सायंकाळी सात नंतर सदर बाजार परिसरातील हिरा हाइट्स येथे मुक्कामी आले होते ते २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता परत संगमेश्वर नगर येथील घरी गेले. त्यावेळी त्यांना घराचा दरवाजाच्याचा सेफ्टी डोअरचा कडी कोयंडा तुटलेला दिसून आला. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता बेडरूम मध्ये लाकडी कपाटातील रोकड व दागिने असा सुमारे एक लाख तीस हजार किम तीचा ऐवज नसल्याचे दिसून आले. त्यांनी याबाबतची माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव करत आहेत.

## दुहेरी जलवाहिनीबाबत आ. कोठेंनी केली आयुक्तांशी चर्चा

### शहर विकासावरही बोलणी; विक्रम देशमुखांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

भाजपाचे आ. देवेंद्र कोठे यांनी शुक्रवारी सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांची भेट घेऊन शहर विकासाबाबत विविध विषयांवर चर्चा केली.

शहर मध्य विधानसभेचे आमदार झाल्यापासून आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रथमच सोलापूर म हानगरपालिकेला भेट देत महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनीही आमदार देवेंद्र कोठे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर पाणीपुरवठ्यासाठी वरदान ठरणाऱ्या उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाच्या पूर्णत्वाबाबत सविस्तर चर्चा केली. दुहेरी जलवाहिनीचे काम लवकरात लवकर पूर्ण झाले तर शहराच्या पाण्याचा मोठा प्रश्न



संपणार आहे. त्यामुळे हे काम त्वरित पूर्ण करावे, अशा सूचना आमदार देवेंद्र कोठे यांनी महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांना दिल्या. स्मार्ट सिटीची कामे, शहरातील कचरा, पाणी व्यवस्थापन, विद्युत व्यवस्थापन, स्वच्छता आदी विषयांवर उपाय योजनांबाबत सविस्तर चर्चा केली. याप्रसंगी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष विक्रम देशमुख, सोलापूर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर उपस्थित होते.

### सोलापूरही आता थांबणार नाही

मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र आता थांबणार नाही' अशी घोषणा केली आहे. त्यांचा विकासाचा महासंकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आम्ही योगदान देण्यास कटीबद्ध असून सोलापूरही आता विकासाच्या बाबतीत थांबणार नाही, हे वचन आम्ही सोलापूरकरांना देत आहोत, असे आ. देवेंद्र कोठे यांनी स्पष्ट केले.

## मार्केट यार्डात शेतकऱ्याला गळ्याला चाकू लावून लुटले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

कर्नाटकातील लच्याण येथून सोलापूर येथील मार्केट यार्डात उडीद विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्याच्या गळ्याला चाकू लावून तिघांनी लुटले. यात मोबाईल रोकड असा १६ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरून देण्यात आला. हा प्रकार २६ डिसेंबर रोजी घडला.

अर्जुन मल्लप्पा मुलगोड ( वय २५, रा. वीरभद्रेश्वर लच्छाण ता. इंडी राज्य कर्नाटक) असे लुटण्यात आलेले शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाणयात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी यांनी सोलापूर मार्केट यार्ड उडीद विक्रीसाठी आणले होते. ते मार्केट यार्डात त्यांच्या स्वतःच्या पिकप वाहनात झोपी गेले होते. त्यावेळी अचानक दुचाकी तिघेजण आले. ते फिर्यादीच्या पिकामधील उडीदाचे भरलेली पोती काढत होते. त्यावेळी फिर्यादीने त्यांना कोण आहे असे म्हणून हटकले. त्यावेळी त्यातील एकाने येऊन फिर्यादीची शर्टाची गच्ची पकडली. तर दुसऱ्याने दुचाकीतील चाकू आणून फिर्यादीच्या गळ्याला लावला. आरडाओरडा करू नकोस असे म्हणून त्यांनी फिर्यादीत धमकी दिली त्यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या तिसऱ्या अनोळखी व्यक्तीने फिर्यादी कडील मोबाईल व त्यांच्या खिशातील ३ हजार ६०० रुपयांची रोकड बळजबरीने काढून घेतली. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक डेरे करत आहेत.

## साखर पेठेतून दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

शहरातील साखर पेठेतील अग्निशामक दलाजवळून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सुहेल वाहीद शेख (वय ३०, रा. अग्निशामक दलजवळ, साखर पेठ, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख याने २५ डिसेंबर रोजी रात्री त्याची एमएच १३ एपी६३८५ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली



होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत.

# कृषी अधिकाऱ्यांची 'शिवार फेरी' वाढविते कोट्यवधींचे उत्पन्न

### जिल्ह्यात 'मासिक प्रक्षेत्र भेटी'चा पुन्हा श्रीगणेशा!

### जिल्हा कृषी अधीक्षकांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी सतत काही तरी नाविण्यपूर्ण करीत राहायचे...या पदावर असताना ऑफीसच्या खुर्चीवर उगं सारखंच बसू वाटत नाही बघा...यामुळे निसर्ग चक्राप्रमाणे आपणही आपल्या कर्तव्यात नेहमी बदल करायचा...अन् यामुळंच शेतकऱ्यांना त्यांच्या शिवारातील शेतात भेटून पीक पाहणी करीत सल्ले द्यायचे ठरविले...त्यांच्या आनंदात आपला आनंद द्विगुणीत करायचा आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा टक्का वाढवित राहायचे बघा...शेतकरी अन् अधिकाऱ्यांच्या विचारांची देवाण-घेवाण झाली की नवं शिकायला मिळतंय..असाच आपला कामाचा पायंडा हाय बघा... पत्रकारसाहेब!

सोलापूर जिल्ह्यासाठी नव्याने आलेले जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांना एका बातम ीसाठी आज (दि. २७) सहज दुपारी फोन केला आणि त्यांचे शेतकऱ्यांबाबतचे वरील भावनिक उद्‌गार ऐकून आवाक्‌च झालो. अगदी साधे राहणीमान ठेवून...सहज शेतकऱ्यांच्या बोलीभाषेत त्यांनी दिलेल्या सल्ल्यातून शेतकरी पिकात बदल करतात अन् कोट्यवधींचे उत्पन्न वाढते यात शंकाच वाटली नाही. त्यांचा कृषी क्षेत्रातील दिर्घानुभव आहे. यामुळे त्यांनी अवघ्या महिनाभरापूर्वी या पदाचा चार्ज घेताच जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालयाकडून गेल्या ५ ते ६ वर्षांपासून बंद पडलेला 'मासिक प्रक्षेत्र भेट' या कार्यक्रमास उजाळा देत नव्याने श्रीगणेशा केला आहे. यासाठी त्यांनी जिल्ह्यातील ११ तालुक्याचे कृषी अधिकारी, मोहोळचे कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. लालासाहेब तांबडे, जाधव, विभागीय कृषी केंद्र राहुरीचे पवार, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाचे मंगरूळे व इतर काही सहकाऱ्यांना घेवून हा एक प्रकारे अभ्यास दौरा अन् कृषी सल्लाच देणे सुरू केले आहे. याचा फायदा शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी भोसले यांनी कृषी अधिकाऱ्यांची मोठी फौज घेवून यापूर्वी सांगोला तालुक्याचा दौरा केला आणि आज दुसऱ्या महिन्यात उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी, हिरज, नान्नज, पाकणी, कारंबा आदींसह इतरही काही गावातील शेतकऱ्यांच्या बांधावर जावून रब्बी हंगाम ातील पीकपाहणी केली. द्राक्षबागा, फळबागा पाहिल्या, हिरजची केव्हीके तूर, पाकणीची वाईन द्राक्ष, कारंब्याची भाजीपाला नर्सरी, झेंडू लागवड, घेवडा, राजमा, नान्नजची किंग बेरी द्राक्ष (बेदाण्याकरिता) अन् मार्डीचा केशर आंबा पाहून समाधान व्यक्त केले. इतकेच नाहीतर या भागातील कोरडवाहू, बागायतदार शेतकऱ्यांशी हितगुज करीत या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. यामुळे शेतकऱ्यांनाही समाधान वाटले. सध्याच्या आभाळी वातावरणामुळे ज्या पिकांवर बुरशीजन्य रोग पडला आहे.त्या ठिकाणच्या पिकांवर कोणत्या औषधांची फवारणी करायची, याचाही सल्ला या सर्वांनी सल्ला दिला. यामुळे उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तर याच धर्तीवर प्रत्येक महिन्यात एक तालुका याप्रमाणे ११ तालुक्यात असाच मासिक प्रक्षेत्र भेटीचा उपक्रम आपण राबविणार असून, यातून आमच्या कृषी अधिकाऱ्यांना व इतर विभागीय अधिकाऱ्यांना भरपूर माहिती मिळणार असल्याचेही जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी भोसले यांनी शेवटी सांगितले.




### सध्या ज्वारीला अत्यंत पोषक वातावरण

उत्तर सोलापूर तालुक्यात पिकांची पाहणी करताना असे लक्षात आले की, सध्या हवामानात झालेल्या बदल ज्वारी पिकांसाठी अत्यंत पोषक असून, या वातावरणामुळे ज्वारी पिकांची मोठी वाढ झाली आहे. या वातावरणामुळे कडबा मोठा येवून ज्वारीचा उतारही चांगला पडतो. मात्र वायनरी द्राक्ष, केव्ही, आंबा पिकांवर बुरशीजन्य रोग वाढतात. यामुळे शेतकऱ्यांचा फवारण्यासाठी जास्तीचा खर्च होतो. तर अशात मोठा पाऊस पडल्यास फळबागा, द्राक्षबागांची हानी होण्याचा संभव असतो.

**- शुक्राचार्य भोसले,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### नव्या साहेबांचं मार्गदर्शन लाख मोलाचं!


उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी या आम च्या गावी हे कृषीपथक आल्यानंतर त्यांनी काही शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करून माझ्या शेतावर आले आणि त्यांनी माझा ७ एकरातील केशर आंबा पाहिला, माझी आंबा नर्सरी पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी भोसलेसाहेबांनी पीक पाहणी करताना बदलत्या हवामानाचा या पिकांवर काय परिणाम होतो आणि त्यासाठी काय उपाययोजना करायच्या याबाबत मार्गदर्शन केले. त्यांचे हे मार्गदर्शन आमच्यासाठी लाखमोलाचे आहे.

**- लखन फसके,**
**प्रगतशील शेतकरी, मार्डी, ता. उत्तर सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९८७

**येर प्रिया पुत्र धना कोण लेखा ।
करिती ती दुःखा पात्र शत्रू ।।**



भगवंत हा सर्व प्राणीमात्रांत भरुन उरला असल्याने सर्व प्राणी मात्रांना भगवंताचा अंश मानले गेले आहे. सर्व संत महात्म्यांनीही भगवंताला सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणीच पाहिले आहे. सर्व जीवावर समदृष्टी ठेवून समत्वाच्या भावनेने वागणे, अडी-अडचणींच्या वेळी मदतीला येणे, नीती-नियमांचे पालन करणे यालाच संतांनी धर्म ही संज्ञा दिली आहे. धर्माचे पालन म्हणजेच ईश्वरभक्ती होय असेही संत मानतात. अशा धर्मस्वरुप ईश्वर भक्तित कोणीही अडथळा करीत असेल तर त्याचा त्याग करण्याचा सल्लाही संत महात्म्ये देतात. ईश्वरभक्तीत म्हणजेच धर्माच्या आचरणात अडथळा ठरणाऱ्या कोणाचाही त्याग केला तर चुकीचे होणार नाही. हा त्याग करण्यापुर्वी आपल्या सत्यत्वाची आपण खात्री करायला हवी. अन्यथा चुकीचे घडू शकते. अधर्माची शिकवण देणारे किंवा अधर्म करायला लावणारे पालक ज्या ठिकाणी त्यागले जाउ शकतात त्याठिकाणी प्रिय व्यक्ती किंवा बंधू, भगिणीचा त्याग म्हणजे तर कांहीच असणार नाही. आपल्याकडून अधर्म घडवून आणणाऱ्या किंवा अधर्मास प्रवृत्त करणाऱ्या आई-बापांचा, बंधू-भगिणींचा त्याग केला नाही तर हे सर्व आपल्यासाठी दुःख निर्माण करणारे शत्रूच असू शकतील. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, जेणे घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ।।, येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती ती दुःखा पात्र शत्रु ।। भगवंत म्हणजे निती-नियमाचे भांडार होय. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे निती-नियमाचे पालन हाच धर्म होय. भगवंतापासून म्हणजे धर्मापासून दूर जाण्याचा माणसाने विचारही करु नये. धर्माच्या आचरणात बाधा ठरणारा कोणीही आप्तेष्ट असला तरी प्रसंगानुरुप त्याचा त्याग करणे चूक नाही. भक्त प्रल्हादाने आपल्या पित्याचा, वाल्याने आपल्या आई-वडील, पत्नी, मुलांचा, बिभिषणाने आपल्या बंधूंचा, भरताने आपल्या आईचा, राजगादीचा त्याग केला. या सर्वांना त्याग हा भगवंतासाठी / धर्मासाठीच होता. आई-वडीलांची सेवा हा धर्म आहे. पण आई-वडीलच जर धर्मापासून दूर नेत असतील तर त्यांचाही त्याग करावा असे सांगण्यात आले आहे. कोणतेही आई-वडील आपल्या मुलांना वाईट शिकवित नाहीत. कैकयी, हिरण्यकश्यपू ही तुम्हा-आम्हामध्ये चांगली निर्मिती करण्यासाठी उदाहरण बनले आहेत. या उदाहरणाची पुनरावृत्ती होण्याची वेळ कोणावरही येऊ नये. आई-वडील हेच खरे दैवत, त्यांची सेवा हीच खरी ईश्वरभक्ती असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. तुम्हा-आम्हाला धर्माचे/ ईश्वराचे महत्व पटवून देण्यासाठी प्रसंगानुरुप त्यांनी कठीण शब्द वापरले आहेत. निती-नियमांचे म्हणजेच धर्माचे पालन करण्यात दुर्दैवाने कोणी रक्ताचा नातेवाईक अडथळा ठरु लागला तर त्याचाही त्याग करावा. त्याच्या प्रेमापोटी किंवा नाजूक संबंधापोटी आपण त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागू लागलो तर एके दिवशी दुःखाशिवाय आपल्या वाट्याला कांहीही येणार नाही. निती-नियम हाच भगवंत प्राप्तीचा धोपट मार्ग आहे. या मार्गावरुन चालतांना माया-मोह, काम-क्रोध, अहंकार आदी शत्रुंचे आगमन कोणालाही माध्यम करुन होऊ शकते. त्यांना तोंड देण्यासाठी प्रसंगानुरुप कोणाचाही त्याग करण्याची मानसिकता आपण जोपासली पाहिजे. अधर्माप्रमाणे वागू देत नाहीत. म्हणून आई-वडीलांचा, भावंडांचा त्याग करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. आपण संत श्री ज्ञानोबा-तुकारामांचे भक्त असल्याने व आई-वडील हेच चालते-बोलते भगवंत असल्याने आई-वडीलांची सेवा हाच धर्म समजून आपण वागावे. तुकाराम महाराजांनी अनेक ठिकाणी आईवडिल हे ईश्वर असल्याचे म्हटले आहे, हे लक्षात असावे.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शनिवार** | **दिनविशेष -** |
| **दि. २८ डिसेंबर २०२४** | **शनि प्रदोष** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **यल्लमा यात्रा खटाव** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - मार्गशिर्ष** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. त्रयोदशी - (२७.३२)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - अनुराधा (२२.१२)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - शुल (२२.२२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - गर (१५.०४)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दुःखी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वतः निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्सविरोधात मोहीम

## महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

शहरातील अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, कटआऊटसविरोधात महानगरपालिका लवकरच पोलिसांच्या मदतीने विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

महापालिकेकडून सर्व अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, कटआऊटस काढून टाकण्याची कारवाई संबंधित विभागीय कार्यालयामार्फत पोलिस विभागाच्या सहकार्याने करणार आहे. महापालिकेने यासंदर्भातील कारवाईसाठी एका प्रकरणाचा संदर्भ दिला आहे. एका जनहित याचिकेच्या सुनावणीमध्ये उच्च न्यायालयाने दि.३१ जानेवारी २०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे.तसेच उच्च न्यायालयाने पुन्हा जनहित याचिकेमध्ये वेळोवेळी सुनावणी अंती विविध आदेश पारीत करुन अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, होडींग्स इत्यादी राज्यातील नगर पंचायती व सर्व महानगरपालिका व पोलिस प्रशासन यांना निष्कासन, कारवाई व गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सोलापूर महानगरपालिका विशेष मोहिम राबविणार आहे. सर्व अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, कटआऊटस हटवण्याची कारवाई संबंधित विभागीय कार्यालयामार्फत पोलिस विभागाच्या सहकार्याने करणार आहे.



याशिवाय उच्च न्यायालयाने अनधिकृत फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर यांच्या काढून टाकण्याची कारवाई करताना आढळणाऱ्या अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, होर्डिंग्स लावणारे नागरीक, संस्था, राजकीय पक्ष यांचीही माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर इत्यादी अनाधिकृतरित्या न उभारण्याबाबत सर्व राजकीय पक्षांनी उच्च न्यायालयाकडे हमीपत्र सादर करूनही न्यायालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्रत्यक्षरित्या राजकीय पक्षाकडुन अनाधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी उभारण्यात येतात. अनाधिकृतरित्या उभारण्यात येणाऱ्या होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टीक किंवा इतर अविघटनशील पदार्थांचा वापर केला जात आहे. ही बाब उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारी आहे. या संबंधित व्यक्ती, संस्था, राजकीय पक्ष यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत व उच्च न्यायालयात शपथपत्राद्वारे माहिती सादर करण्याबाबत सर्व महानगरपालिकांना निर्देश देण्यात आले आहेत.

उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाचे अनधिकृत होडींग्स, फ्लेक्स, बॅनर्स किंवा पोस्टर्स लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे व लावल्यास त्यांचे तात्काळ निष्कासन करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश सर्व विभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

### राजकीय पक्ष, शहरवासीयांना आवाहन

सर्व राजकिय पक्ष, कार्यकर्ते व शहरवासियांना सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्सबाबत परवानगीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून या संकेतस्थळावरुन परवानगी प्राप्त करुनच फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स लावण्यात यावे, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

# कत्तलीसाठी नेणारे गोवंश रोखले

## नई जिंदगीमधील अंबिका नगरातील घटना

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

शहरातील नई जिंदगीमधील अंबिका नगरात कत्तलीसाठी नेण्यात येणारे गोवंश पोलिस कर्मचाऱ्यांने रोखले. त्यावेळी पोलिस कर्मचाऱ्यास मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस शिपाई वसेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शोएब मेहबुब इनामदार आणि समीर महेबुब इनामदार (रा. अंबिका नगर, नई जिंदगी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ डिसेंबर रोजी साडेबाराच्या सुमारास अंबिका नगरात शोएब इनामदार हा गोवंश कापण्यासाठी घेऊन आल्याची माहिती एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई वसेकर यांना मिळाली होती. त्यावरुन पोलिस कर्मचारी वसेकर हे अंबिका नगरात येऊन इनामदार याच्याडे चौकशी करीत होते. त्यावेळी शोएब इनामदार व समीर इनामदार या दोघांसह त्यांच्या सोबत असलेल्या नदीम नावाच्या व्यक्तीने पोलिस शिपाई वसेकर यांना शिवीगाळ करून अंगावर धाऊन जाऊन मारहाण केली व शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. म्हणून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.

# अभाविपच्या शोभा यात्रेवर फुलांची पुष्पवृष्टी

## भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव संदीप जाधव मित्र परिवाराच्या वतीने आयोजन



### शहरात ठिकठिकाणी शोभा यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने संमेलनाच्या पार्श्वभूमीवर शहरात सर्वत्र शोभा यात्रेचे विशेष असे आयोजन करण्यात आले होते.या शोभा यात्रेत दीड हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या यात्रेत वाद्य, बग्गी, आणि पारंपरिक वेशभूषा परिधान केलेले युवक-युवती सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. जय श्री राम, भारत माता की जय च्या जय घोषणेने वातावरण निर्मिती झाल्याचे दृश्य निदर्शनास पडले.दरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान येथे या पदयात्रेचे आगमन होताच फटाक्याची आतषबाजी व भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव संदीप जाधव मित्र परिवाराच्या वतीने शोभा यात्रेत सहभागी युवक-युवतींवर फुलांची पुष्पवृष्टी करण्यात आली. व स्वागत करण्यात आले.

याबाबत ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव संदीप जाधव यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली. यावेळी जयवंत सलगर, चेतन शर्मा, गुरू कवडे, अक्षय अंजिखाने, युवराज माळगे, श्रीकांत माळगे, समर्थ बंडे, यतिरज होनमाने, शिवा कवडे, संस्कार नरोटे, अमोल काळे, बबलू सावंत, ओंकार जाधव, पंकज जाधव, गोसावी, अनुप कुलकर्णी यांच्यासह मित्र परिवाराच्या मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# आंतरभारती स्नेहमिलन मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

आंतर भारती ट्रस्ट संलग्रित आंतरभारती शाखा सोलापूरचा स्नेह मिलन मेळावा २५ डिसेंबर रोजी नागेश करजगी ऑर्किड स्कूल येथे संपन्न झाला.

पांडुरंग नाडकर्णी (गोवा) यांच्याअध्यक्षतेखाली पार पडलेल्या या स्नेह मिलन मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. इरेश स्वामी, प्राचार्य नरेश बदनोरे, संगीता देशमुख (वसमत) अमर हबीब (अंबेजोगाई) डॉ. डी एस कोरे (पुणे) व प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. साने गुरुजींच्या आंतरभारती प्रार्थनेनंतर मनीषा दीदी (हैदराबाद) यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व साने गुरुजी आणि सदा विजय आर्य यांच्या छायाचित्रांचे पूजन करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

व्यासपीठावरील मान्यवरांनी थोडक्यात प्रासंगिक मनोगत व्यक्त केल्यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे स्वातंत्र्य चळवळीतील सोलापूरचे योगदान या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले. उदगीर येथील कार्यकर्ते शिवलिंग मठपती यांना आंतरभारती ट्रस्टच्या वतीने सदा विजय आर्य उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार) देऊन सन्मान करण्यात आला. स्वागताध्यक्ष कुमार करजगी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मनीषा दीदी हैदराबाद यांनी उद्घाटकीय मनोगत व्यक्त केले.

व्यासपीठावरील मान्यवरांचा शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी आंतरभारती सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष एड. प्रमोद शहा, सचिव प्रा डॉक्टर राजशेखर नळगे कोषाध्यक्ष अरुण धुमाळ, सहसचिव गणेश लेंगरे, प्राध्यापक धरेप्पा नागणसुरे, सुनील व्हसाळे सर, डॉक्टर जयश्री मेहता आदींनी मेळावा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. भोजन अवकाशा नंतर ऑर्किड स्कूल व ग्लोबल विलेज कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. खुल्या अधिवेशनानंतर शाखा सचिव डॉक्टर नळगे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. अमिता जावळे यांनी सूत्रसंचालन केले. या मेळाव्यासाठी विविध राज्यातून, महाराष्ट्राच्या विविध भागातून आंतरभारतीचे पदाधिकारी व सदस्य यांची लक्षणीय उपस्थिती होती.

# पंढरपूर शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाडे तत्त्वावर देण्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. २७ डिसेंबर-**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहासाठी पंढरपूर, येथे कमीत कमी सर्वसाधारण ८५०० चौ. फुट पक्के बांधकाम असलेली इमारत भाड्याने घ्यावयाची आहे.

शासकीय वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारत देण्यासाठी इच्छुक इमारत मालकांनी सहायक आयुक्त समाजकल्याण सोलापूर व गृहपाल मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय पंढरपूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे. इच्छुक इमारत मालकांनी जागेची कागदपत्रे नकाशासह ७ दिवसाच्या आत सहायक आयुक्त समाजकल्याण सोलापूर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता सोलापूर (दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७३४९५०) व गृहपाल मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, संभाजीराजे नगर, कोर्टी रोड, पंढरपूर (दुरध्वनी क्रमांक ०२१८६-२९५८३२) यांच्याकडे तात्काळ संपर्क साधावा.

# कस्तुरबाई कॉलेजमध्ये विद्यार्थी संसदेची स्थापना

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथे बी.एड, व एम.एड. विद्यासाठी विद्यार्थी संसदेचे उद घाटन समारंभ मोठया थाटामाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. चे समन्वयक डॉ. बाळकृष्ण भावे उपस्थित होते. संसदेचे प्राध्यापक प्रतिनिधी व महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्ता वाघमारे यांनी या विद्यार्थी संसदेच्या उदघाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले.



या प्रास्ताविक डॉ. दत्ता वाघमारे यांनी केले. यानंतर दिपप्रज्वलन करुन नव्या विद्यार्थी संसदेची औपचारिक उदघाटन प्राचार्य व सन्माननीय इतर संसदेच्या विद्यार्थ्यांची निवड करुन डिजिटल फलकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या निवडलेल्या ०८ विद्यार्थ्यांच्या कार्याची ओळख व व्यक्तिमत्व परिचय विद्यार्थी संसदेचे प्रमुख डॉ. दत्ता वाघमारे यांनी करुन दिली. या ८ विद्यार्थ्यांची निवड करण्यामागे विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा आढावा या ठिकाणी घेण्यात आला. सूत्रसंचालन स्नेहा विरणक याने केले आभार प्रमोद फुलारी यांनी मानले.

### ही आहे विद्यार्थी संसद

दिपाली दुरुगकर- जनरल सेक्रेटरी, आरे शिवम दत्तात्रय- सहल, नियतकालिका व भित्तीपत्रक -फुलारी प्रमोद भिमाशंकर, प्रसिध्दी प्रमुख - साखरे जयश्री मल्लिकार्जुन, सांस्कृतिक प्रमुख : गांधी मानसी वीरकुमार, क्रीडा प्रमुख : मुंडे पार्थ गौरीशंकर, विद्यार्थीनी प्रतिनिधी : लोंढे श्रुतिका दिपक, महाविद्यालयीन शिस्त व आंतरवासिता : पाटील दिव्या दिपक



# विश्वहिंदू परिषद, बजरंग दलाचे शौर्य संचालन

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

शौर्य दिन व गीता जयंतीचे औचित्य साधून विश्वहिंदू परिषद, बजरंग दलच्या वतीने शौर्य संचालन व त्रिशूल दीक्षाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्रिशूल दिक्षेच्या या कार्यक्रमात १०८ बजरंगींना त्रिशूल दीक्षा देऊन दीक्षांती म्हणून सिद्धी देण्यात आली. संचालनाच्या मार्गावरती शहरातील नागरिकांकडून व तसेच बजरंग दल हितचिंतकांकडून रांगोळीच्या पायघड्या घालून संचलनात सहभागी झालेल्या सर्व बजरंगींवरती पुष्पवृष्टीचा वर्षाव करून ठिकठिकाणी संचालनाचे स्वागत करण्यात आले. शौर्य संचलन का व कशासाठी या विषयावर शिवस्मारक येथे बजरंग दल मुंबई क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. तद्नंतर त्रिशूल दीक्षा का व कशासाठी या विषयावर बजरंग दल पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक नितीन महाजन यांनी मार्गदर्शन केले.

संचालनाची सुरुवात बजरंग दल जिल्हा सोलापूरच्या वतीने छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती मूर्तीस पुष्पहार घालून महाराजांना अभिवादन करून आणि तसेच बजरंग दलची शाखा लावून संचलन मार्गस्थ झाले. संचलनाचा समारोप ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरामध्ये महाआरती करून ध्वजवंदना घेऊन करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून बजरंग दल मुंबई क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी, बजरंग दल पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक नितीन महाजन, बजरंग दल विभाग संयोजक ऋषिकेश चव्हाण आदींची उपस्थिती होती. यावेळी बजरंग दल जिल्हा संयोजक सिद्राम चरकुपल्ली, बजरंग दल जिल्हा सह संयोजक नागेश बंडी, बजरंग दल जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी, बजरंग दल जिल्हा सुरक्षा प्रमुख शितल परदेशी, विश्वहिंदू परिषद जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, विश्व हिंदू परिषद विभाग संयोजक विजयकुमार पिसे उपस्थित होते.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या रुममध्ये आढळला कावड्या साप

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**



वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील लोकमंगल कृषी महाविद्यालय मध्ये एका रुम मध्ये साप असल्याची माहिती वडाळ्यातील सर्पमित्र नागेश मोरे आणि सर्पमित्र संकेत खरात यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तेथे जाऊन पाहणी केली असता तेथे एक बिनविषारी काळा ठिपक्यांचा कवड्या साप आढळून आला.

बिनविषारी असलेला हा साप फार कमी ठिकाणी आढळतो. यापूर्वी सोलापुर मध्ये या सापाची नोंद आहे. काळ्या शरीरावर ठळक पिवळे ठिपके व त्याला लागूनच समांतर रेषा, तोंडाजवळील ओठाकडचा आणि पोटाकडचा भाग पांढऱ्या रंगाचा दिसून येतो. बऱ्यांचवेळा हा साप मण्यार म्हणून नागरिकांकडून मारला जातो. त्यामुळे या सापाची संख्या फार कमी राहिली आहे.

पूर्ण वाढ झालेल्या या सापाची लांबी एक ते दीड फुटापर्यंत असते. ते साधारणतः रात्रीच्यावेळी बाहेर पडतात आणि पाली, सापसुरळी आदींवर गुजराण करतात. नागरिकांनी कोणताही साप मारू नये. वन विभागाशी किंवा जवळील सर्पमित्रांनशी संपर्क साधून त्याला सुरक्षितरित्या निसर्गात सोडण्यास मदत करावी, असे आवाहन सर्पमित्रांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### द. ह. कवठेकर प्रशालेमध्ये शारीरिक शिक्षण दिन साजरा

**पंढरपूर, दि. २७ डिसेंबर-**



येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित द. ह. कवठेकर प्रशालेत शारीरिक शिक्षणदिन पार पडला. विद्यार्थ्यांना शारीरिक कसरती, व्यायाम, पिऱ्यामिड, शिवकालीन खेळ दांडपट्टा फिरवणे, तलवारबाजी, लाठीकाठी फिरवणे, लांबउडी, उंच उडी, झेंडा पथक, मुलींची लेझीम, कराटे व योगासने आदी मैदानी व मर्दानी खेळांचा संगम मैदानावर बघण्यात आला. सुमारे दोन तास चाललेल्या या विविध खेळ प्रकारात विद्यार्थ्यांसह पालकही दंग झाले होते. सुमारे आठशे विद्यार्थी एकत्रितरित्या विविध कवायत व मैदानी खेळ सादर केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी केले. ओळख आर. एस. कुलकर्णी यांनी केले. यावेळी निरीक्षक विश्वजीत घोडके, डॉ. मंदार सोनवणे, डॉ. आशिष चव्हाण, पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नाना मालक कवठेकर, मानद सचिव सुधीर पटवर्धन, डॉ. मिलिंद जोशी, एस. पी. कुलकर्णी, मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, गडदे, गजेंद्र पवार, वगरे, महेश तेंडुलकर, दीपाली सतपाल, शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मोरे, शेलार, पाटोळे, एम. बी. कुलकर्णी, व्ही.पी. पवार, संजय गवळी, चव्हाण आदी उपस्थित होते. आभार उपमुख्याध्यापक रुपनर यांनी मानले.



### महिला सुरक्षा संघटनेच्या बैठकीत सन्मान मिळवून देण्याचा निर्धार

**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

नवी दिल्लीच्या महिला सुरक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत महिला, मुली, तरुणींना न्याय मिळवून देण्याबरोबरच त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून त्यांना हक्क मिळवून देणे, अडचणीतून मार्ग दाखवणे, कौटुंबिक अत्याचार रोखणे, सुनेला आणि सासूसालाही छळमुक्त करण्याबरोबरच महिलांना सन्मान मिळवून देण्याचा निर्धार करण्यात आला. जिल्हाध्यक्षा मुख्याध्यापिका रेखान सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापुरातील बैठकीत हा विडा उचलण्यात आला. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्याबरोबरच कृती आराखडाही तयार करण्यात आला. प्रत्येकांना जबाबदारीही देण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष किसनराव काशीद-पाटील यांनी फोनसंदेशाद्वारे मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्षा रेखा सोनकवडे यांनी आपल्यातील ताकदीला बळ देऊन महिला हित जपण्याचे गरज असल्याचे सांगितले. जिल्हा संपर्क प्रमुख नीलावती केदार, जिल्हा सचिव छाया कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष रेखा हिरेमठ, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्षा संध्या सरवदे, उपाध्यक्षा शिला हावळे, सचिव विद्या साबळे, दक्षिण सोलापूर अध्यक्षा भंगारेव्वा सोनकडे यांनी यावेळी आढावा मांडला.

### दलित स्वयंसेवक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब पाटोळे

**मोहोळ, दि. २७ डिसेंबर-**



मोहोळ तालुक्यातील देवडी येथील अण्णासाहेब पाटोळे यांची दलित स्वयंसेवक संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघप्रमुख राजाभाऊ धडे यांनी लेखी पत्र देऊन त्यांची निवड केली. अण्णासाहेब पाटोळे हे मोहोळ तालुक्यातील ग्रामीण भागातील देवडी येथील असून ते प्रमाणित लेखा परीक्षक म्हणून काम करित आहेत. अभ्यासू व्यक्तीमत्व असणारे पाटोळे यांना समाजाची चांगली जाण समाज सेवेची आवड असून त्यांच्या कामाची पोच पावती म्हणून त्यांची सोलापूर जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी संजय केंद्रे तानाजी रणदिवे, नानासाहेब मोरे, आनंद जाधव, अशोक कांबळे, बाळासाहेब हजारे, गायकवाड, सुरेश उमाप, सुरेश लोखंडे, सिद्धाप्पा श्रीकांत ऐवळे, आप्पा शिंदे, अशोक देडे, विनोद क्षीरसागर, चंद्रकांत थोरात, श्रीशैल कट्टीमनी आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



### स्वेरीमध्ये माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण

**पंढरपूर, दि. २७ डिसेंबर-**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना स्वेरीमध्ये श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा मंजुषा मिसकर, डॉ. यशपाल खेडकर, शिक्षणाधिकारी स्वाती हवेली, जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी सुर्वे, स्वेरीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, डॉ.एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार, डॉ. एम. एस. मठपती, डॉ. एम. पी. ठाकरे, डॉ. आर. आर. गिड्डे, डॉ. डी. एस. चौधरी, डॉ. ए. पी. केने, डॉ. के. बी. पाटील, प्रा. ए. ए. मोटे, डॉ. एस. पी. पवार, डॉ. एस. बी. भोसले, प्रा. बी. डी. गायकवाड, प्रा. डी. टी. काशीद, प्रा. एस. एस. गायकवाड, प्रा. विक्रम चव्हाण, राजेंद्र झरकर, प्रा. ए. एस. भातलवंडे उपस्थित होते.

### विजयपूरचे बहुभाषा कवीसंमेलन रद्द

**विजयपूर, दि. २७ डिसेंबर-**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यामुळे कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद विजयपूर जिल्ह्याच्या वतीने रविवार २९ डिसेंबर रोजी विजयपुरात आयोजित करण्यात आलेला बहुभाषा कविसंमेलन व नूतन पदाधिकाऱ्यांच्या सत्कार सम रंभ स्थगित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम जानेवारी महिन्यात घेण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष दीपक शिंत्रे यांनी सांगितले.

# धोकादायक ऊस वाहतूक; प्रवाशांची वाढली धाकधूक

## प्रशासनाचे दुर्लक्ष; अपघाताच्या प्रमाणात वाढ, वेळीच लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ डिसेंबर-**

उजनी लाभक्षेत्रालगत कुंभेजफाटा ते जिंती मार्ग विकसित झाल्यामुळे याम ार्गावरुण वेगवान वाहतूक सुरू झाली आहे. त्यामध्ये सद्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला आहे. कारखान्यांमध्ये ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला अनधिकृतपणे दुसरी ट्रॉली लावून क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. तसेच रात्रीच्या वेळी या मार्गावर जागो जागी उसाच्या फडातून काढलेल्या ट्रॉल्या रस्त्यावर उभ्या केल्याने अपघाताला निमंत्रण देत आहे.

करमाळा तालुक्यात ऊस वाहतुकीसाठी ट्रक व ट्रॅक्टरला प्राधान्य देण्यात येते. मात्र ऊस वाहतूकदार व वाहनचालकांकडून नियमांचे पालन केले जात नाही. कारखाना प्रशासनाचा ट्रॅक्टर चालकांवर वचक नाही. त्यामुळे ऊस वाहतूक करण्यास दोन ट्रॉलींचा वापर करण्यात येतो. ट्रॉलीची क्षमता १४ टनांची असते. परंतु यात १८ ते २० टन ऊस भरण्यात येतो. सर्रासपणे विनापासिंग ट्रॉलींचा वापर करण्यात येतो. उसाची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या अपघाताला प्रामुख्याने ट्रॉली कारणीभूत ठरतात. ट्रॅक्टरला स्वतंत्रपणे ट्रॉली जोडण्यात येते. इंडीकेटर आणि लिफ्लेक्टर लावण्यात येत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी मागून येणाऱ्या वाहनाचा समोरच्या वाहनांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो.





### रिफ्लेक्टरविना रस्त्याच्या कडेला वाहने

कधी उसाचे ट्रॅक्टर अचानक बंद पडल्याने ट्रॅक्टर रात्रभर रस्त्यावर आणि रस्त्याच्या कडेला थांबून ठेवतात. तसेच रस्त्याच्या अवतीभवती असलेल्या उसाच्या फडातून ऊस भरुन रस्त्यावर उभा करतात. अशा ट्रॉल्यांवर नंबर, सुरक्षिततेच्या रिफ्लेक्टर आदी कोणत्याही उपाययोजना नसतात. यामुळे रात्रीच्या अंधारात ट्रॅक्टर रस्त्यावर दिसत नसल्याने अनेक वाहने ट्रॅक्टरला धडकून अपघात होत असतात. मागील आठवड्यात रात्रीच्या वेळी पारेवाडी नजीक रस्त्याच्या कडेला ऊसाने भरुन उभा असलेल्या ट्रॉलीला वाशिंबे येथील दुचाकीस्वार धडकून पती-पत्नी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गोयेगांव येथील एकाचा उमरड नजीक ऊसाने भरलेल्या ट्रॉलीला धडकून जीव गमवावा लागला आहे. मागील वर्षी उमरड, केत्तूर येथील दुचाकीस्वार ट्रॉलीला धडकून ठार झाला होता.

### रस्त्यावर तसेच राहतात दगड

ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरमध्ये सर्रास ध्वनिक्षेपक असतो. त्यामधून मोठ्या आवाजात गाणी लावली जातात. परिणामी चालकास मागून येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नाही. त्यामुळे आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत. तसेच रस्त्यावर उभा केलेल्या ट्रॉलीला दगडाची उटी लावण्यात येते. परंतु ट्रॅक्टरला ट्रॉली जोडून गेल्यावर उटी म्हणून वापरलेली दगड रस्त्यावर जागीच राहतात. परिणामी इतर वाहनांना अपघात होतो.

करमाळा तालुक्यातील ऊस गाळपासाठी जाणाऱ्या कारखान्यांवर जाऊन कारखाना प्रशासन व ट्रॅक्टर चालकांशी चर्चा करुन अष्टसुत्री कार्यक्रम देणार आहे. ऊस वाहतुकीसंदर्भात मार्गदर्शन केले आहे.तसेच वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

**-आश्विन पोंदकुले, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकलूज**

# श्री विठ्ठलाच्या नित्यपूजेची मार्च २०२५ पर्यंत नोंदणी

## महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश राज्यातून पूजा नोंदणी

### ऑनलाईन पूजा नोंदणीसाठी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ डिसेंबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या सर्व पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा यांची ऑनलाइन नोंदणी २६ डिसेंबरपासून सुरु करण्यात आले. या नोंदणीस भाविकांनी चांगला प्रतिसाद दिल्याने ३१ मार्चपर्यंतच्या श्री विठ्ठलाच्या नित्य पूजेची संपूर्ण नोंदणी झाली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मंदिर समितीच्या वतीने दि. १ ऑक्टोबर पासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात आली होती. याद्वारे पहिल्या टप्प्यात ७ ऑक्टोबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०१४ या कालावधीतील पुजा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्यानंतर दिनांक २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ पासून १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यातील



पूजा उपलब्ध करून दिल्या होत्या. सदर कालावधीत उपलब्ध झालेल्या पूजेमधून विठ्ठलाच्या संपूर्ण नित्यपूजेची नोंदणी झाली आहे. याशिवाय, रूक्मिणीमातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व तुळशीपूजा देखील नोंदणी झाल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यासह आसाम, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश राज्यातून पूजा नोंदणी झालेली आहे. ऑनलाईन पध्दतीने पूजा उपलब्ध करून दिल्यामुळे भाविकांना घरबसल्या पूजा नोंदणी करता येत आहे, याबाबत भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे. श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाईन नोंदणीची सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

### यावरुन करता येईल नोंदणी

दुसऱ्या टप्प्यातील दोन्ही कडील पाद्यपूजा, तुळशीपूजा व रूक्मिणीमातेच्या नित्यपूजा अजूनही नोंदणीसाठी शिल्लक असून, https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून भाविक भक्तांनी आवर्जून पूजेची नोंदणी करावी. दुसऱ्या टप्प्यात देखील भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

# श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी ९ लाखांचा सोन्याचा हार अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ डिसेंबर-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी शुक्रवारी (दि.२७) नाव जाहिर न करण्याच्या अटीवर दानशुर भाविकाने सुर्य कळ्यांचा सोन्याचा हार गोफासह अर्पण केला आहे. त्याचे वजन १३२ ग्रॅम असून, अंदाजे किंमत ९ लाख २६ हजार होत असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.





संबंधित दानशुर भाविक हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. ते आज सहकुंटुंब श्रींच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूला आले असता, सदरचे दान दिले आहे. याशिवाय, त्यांनी मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये अन्नदान देखील केले आहे. त्याचा सुमारे १२०० ते १५०० भाविकांनी लाभ घेतला. श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समितीला सोने-चांदी वस्तू दान करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे. त्यासाठी दोन सराफाची पूर्णवेळ नियुक्ती व संबंधित भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते. तसेच इतर स्वरूपात देखील दान देण्यासाठी विविध प्रकारच्या योजना असून, इच्छुक भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयात समक्ष भेट द्यावी अथवा दुरध्वनीद्वारे संपर्क करावा असेही आवाहन ही यावेळी व्यवस्थापक श्रोत्री यांनी केले.

# कोरफळे येथे ३२५ महिला, मुलींची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि २७ डिसेंबर**

एकता महिला मंच व साई होमिओपॅथी कॉलेज व हॉस्पिटल यांच्यावतीने महिला व मुलींसाठी कोरफळे येथे घेण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात ३२५ महिला व मुलींची आरोग्य तपासणी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कोरफळे येथे करण्यात आली.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. अशोक अनपट यांनी केले. डॉ. प्रा. अशोक अनपट यांनी विविध आजारावर माहिती देत होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक यामध्ये नेमका काय फरक आहे तो सांगितला.

या आरोग्य शिबिरामध्ये महिलांचे मासिक पाळी, संधिवात, आमवत, रक्तदाब, मधुमेह, थायरॉड, बीपी, शुगर, हिमोग्लोबिन, थायरॉईड तसेच महिलांचे वेगवेगळे आजार याची तपासणी करण्यात आली. डॉ. वर्षा कुंभार, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. सपना मलमे, डॉ. केदार महाडिक, ज्योती भस्मे, राहुल आवचरे, प्रशांत खोबरे, मुख्याध्यापक सिद्धेशवर तिकटे, प्रभाकर क्षीरसागर, तेजश्री घेमाड, अश्विनी ठाकरे, रेश्मा घेमाड, ज्योती डांगे, सुनिता ठाकरे, दिव्या मुटकुळे, सीमा चव्हाण, शोभा वांगदरे, दुर्गा गाडे, सुंदर वांगदरे, रेश्मा ठाकरे, राजश्री घेमाड, मनीषा कसबे, तेजस्विनी किरतकर्वे, पूजा ठाकरे, दैवशाला ठाकरे, सोनाली पाचले, सुमन पासले, स्वाती वांगरे, उल्फा मिरगणे, पूजा गंगाधर, नीता सुक्रे, अर्चना ठाकरे, सीमा पासले, स्वाती ठोणगे, पुनम भोंगे, धनाजी मचाले, संदीप घाडगे, सुनीता ठाकरे, रुपाली कदम, योगिता हुबळीकर, शैलजा सांगवे, पंचशीला गव्हाणे, नलिनी यादव, क्रांती काळे, अंगणवाडी सेविका निशा होनराव, फुलाबाई वांगदरे, विजया शेजाळ, गीता तीकटे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सिद्धेश्वर तिकटे यांनी केले.




# कृषी सहाय्यक चक्क गैरहजर... शेतकरी मात्र बेजार

## वरिष्ठ विचारेनात कोणालाही जाब; कर्मचाऱ्यांचा वाढलाय रुबाब

### मंद्रुप कृषी कार्यालयातून शासकीय योजनांचा मिळेना लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ डिसेंबर-**

येथील कृषी कार्यालय अनेक दिवसापासून बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यालय उघडण्याची प्रतीक्षा करावे लागत आहे. कृषी सहाय्यकाचे मनमानी कारभार व दांडी मारण्यामुळे कार्यालय बंद असून शेतकरी अनेक योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कृषी सहाय्यकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

मंद्रुप येथे कृषी कार्यालय असून येथे दररोज कृषी सहायक उपस्थित राहणे बंधनकारक आहे. मात्र कृषी सहाय्यकच उपस्थित नसल्यामुळे कार्यालय बंद असलेले दिसून येते. मंद्रुपमध्ये ३,००० शेतकरी खातेदार असून येथे शासनाच्या विविध शेती योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी हेलपाटे मारत असतात. कृषी सहाय्यक कार्यालयात नसल्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती मिळण्यास विलंब होत आहे. शिवाय शासनाकडून आलेल्या अनेक बी-बियाणे, रासायनिक औषधे, शेती औजारे व इतर अनुदानाचे काम खोळंबल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. याबाबत कृषी सहाय्यकांकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दररोज कृषी कार्यालय चालू ठेवण्याची मागणी होत आहे.



### अन्यथा आंदोलन करणार

मंद्रुप येथे कृषी कार्यालय असूनही कृषी सहाय्यक उपस्थित नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळताना अडचणी येत आहेत. कृषी सहाय्यक वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे अनुदान मिळण्यास विलंब होत आहे. तालुका कृषी अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे. अन्यथा तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल.

**-अनमोल केवटे, अध्यक्ष, युवा क्रांती संघटना, मंद्रुप**

### तालुका कृषी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

तालुक्यातील अनेक गावांत कृषी कार्यालय असून कृषी सहायकांच्या गैरहजेरीमुळे कार्यालय बंद आहेत. मंद्रुपसह अनेक कृषी सहाय्यकांचा तालुका कार्यालय व अन्य ठिकाणी ठिय्या असल्याने शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित राहत आहेत. याकडे तालुका कृषी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अ. भा. वारकरी मंडळातर्फे उद्यापासून अखंड हरिनाम सप्ताह

**सोलापूर, दि.२७ डिसेंबर-**

अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर शहर तर्फे रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ ते दि. ५ जानेवारी २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य सचिव हभप गणेश महाराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जगद्गुरू श्री. संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळा व श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त वै. दा. का. थावरे भाऊ यांच्या स्मरणार्थ अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष ह. भ. प. प्रकाश महाराज बोधले, जिल्हा अध्यक्ष ह.भ.प. डॉ. किरण महाराज बोधले शहर अध्यक्ष ह.भ.प. सुभाष महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जुनी मिल कंपाऊंड, भैय्या चौक, सोलापूर येथे या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहामध्ये काकडा आरती, श्री. संत तुकाराम महाराज गाथा भजनी पारायण, संगीत भजन, हरिपाठ, प्रवचन हरिकिर्तन, हरिजागर अशा अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय संत महात्मे, संत परंपरेतील वंशज यांची किर्तनरूपी सेवा आयोजित करण्यात आली आहे. दि. २९ डिसेंबर रोजी ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, ३० रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील, ३१ रोजी ह.भ.प. बंडा तात्या कराडकर, १ जानेवारी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, २ रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज चव्हाण, ३ रोजी ह.भ.प. कान्होबा महाराज देहूकर, ४ रोजी ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी यांची दररोज रात्री ७ ते ९ कीर्तने होणार आहेत. शनिवार दि.४ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ६ पर्यंत सोलापूर शहरामध्ये दिंडी प्रदक्षिणा होणार आहे. तसेच दि.५ जानेवारी सकाळी १० ते १२ ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### बार्शीत मनुस्मृती दहन दिन, स्त्रीमुक्ती दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. २७ डिसेंबर-**

विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगडाच्या पायथ्याशी महाड भूमीमध्ये या देशातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था व गुलामगिरीची मानसिकता असणारे विषारी विचार मांडणारा ग्रंथ जाळला. त्याच दिवसाचे औचित्य साधून आज आंबेडकरी समाज बार्शीच्यावतीने मनुस्मृती दहन व स्त्रीमुक्ती दिन पार पडला. यावेळी डॉ. मैत्रीयी लंकेश्वर, आयेशा हजूरे, रेखा सरवदे, स्नेहल लंकेश्वर, सुवर्णा शिवपुरे या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा भारताचे संविधान, शाल, व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. यु. एफ. जानराव, तानाजी बोकेफोडे, आनंद काशीद, दिनेश नाळे, ॲड. संतोष कसबे, डॉ. प्रकाश लंकेश्वर, प्रमिला झोंबाडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अय्याज पठाण, दिलीप सरवदे, कुमार कांबळे, सचिन सोनवणे, महेदीमिया लांडगे, अर्जुन कांबळे, विनायक कांबळे, संभाजी कदम आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अजित कांबळे यांनी केले.



### वळसंगच्या उपसरपंचपदी समीर कटरे

**वळसंग, दि. २७ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२३ मध्ये निवड झालेल्या सदस्यांपैकी उपसरपंच म्हणून आरिफ कुरेशी यांची निवड करण्यात आली होती. २६ डिसेंबर रोजी उपसरपंच पदात बदल करून पुन्हा एकदा निवड करण्यात आली. ग्रामसेवक राजकुमार जाधव व अध्यक्ष म्हणून सरपंच जगदीश अंटद यांच्या उपस्थितीत समीर कटरे यांना उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच आरिफ कुरेशी, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गायकवाड, माजी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, तंटामुक्त अध्यक्ष दाऊद आमलीचुंगे, माजी ग्रामपंचायत सदस्य रहीम कटरे, शफिक पटेल, जावेद कटरे, आयुब आमलीचुंगे, यासीन कटरे, रमेश व्हनकडे, रियाज नदाफ व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

### सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात आजपासून सेवा इंटरनॅशनल अनुभूती कॅम्प

**सांगोला, दि. २७ डिसेंबर-**

शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होऊन देशात जास्तीत जास्त शास्त्रज्ञ तयार व्हावेत यासाठी सेवा इंटरनॅशनल संस्था, कुप्पम, आंध्रप्रदेश ही सेवाभावी संस्था कार्य करते. या संस्थेची महाराष्ट्र राज्यात प्रथमच उत्कर्ष विद्यालय, सांगोला येथे सेवा इंटरनॅशनल अनुभूती कॅम्प म्हणजेच विज्ञान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२८ व २९ डिसेंबर रोजी सेवा इंटरनॅशनल शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांच्या समवेत हे शिबीर पार पडणार आहे. यावेळी सेवा इंटरनॅशनल कुप्पम संस्थेचे प्रमुख सर्वाननजी यांचे मार्गदर्शन उत्कर्ष विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यावेळी सेवा इंटरनॅशनल शिष्यवृत्ती पात्र ८० विद्यार्थी या शिबिरात सहभागी होणार आहेत, अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी यांनी दिली. सदर शिबीरासाठी संस्थाध्यक्ष निलीमा कुलकर्णी, डॉ. संजीवनी केळकर, वसुंधरा कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.



### नूमवित वीर बाल दिन साजरा


**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

नू. म. वि. शाळेत वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्नेहल शिंदे, मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांच्या हस्ते वीर बालांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय रोहिणी चौधरी यांनी केला. मुख्याध्यापिका श्रीमती जेधे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता चौथीमधून आरुषी चौगुले या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. शिक्षकांच्या वतीने श्रीलंगोटे यांनी वीर बाल दिवस का साजरा केला जातो, याबद्दल माहिती सांगितली. यावेळी शाळेस वीर बालांचे पुस्तक भेट दिले. सूत्रसंचालन आणि आभार रोहिणी चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हाताच्या पंजावर उमटणार 'सु-रेश'

● लोकसभा, विधानसभेतील निष्ठेचे फळ

### ▶▶ जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुरेश हसापुरेंचे नाव निश्चित







**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जिंकण्यासाठी हसापुरे यांना जिल्हाध्यक्ष केल्यास त्याचा फायदा होणार आहे. हसापुरे जिल्ह्यात 'किंगमेकर' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या अभ्यासू नेतृत्वामुळे सहकार व जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसला 'अच्छे दिन' आणण्यासाठी हालचाली गतिमान झाल्या आहेत.**

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप.. २४ डिसेंबर-**

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांचे निकटवर्तीय व निष्ठावान म्हणून ओळखले जाणारे सुरेश हसापुरे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड निश्चित मानली जात आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीतील निष्ठेचे फळ त्यांना मिळणार असल्याने हाताच्या पंजावर हसापुरेंच्या रुपाने 'सु-रेश' उमटणार असल्याचे बोलले जात आहे.

तालुक्यातील अनेक दिग्गज नेते काँग्रेस पक्ष सोडून भाजपासह इतर पक्षात जात असताना हसापुरे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून पक्षवाढीसाठी प्रयत्न केला. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच पाच वर्षांपासून दक्षिण तालुक्यात चांगला लोकाश्रय मिळाला आहे. काँग्रेसच्या पडत्या काळात दक्षिण सोलापूर तालुक्यात काँग्रेस वाढीसाठी मोठ्या प्रमाणात हातभार लावला. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे यांना भाजपाचे ३८ हजारांचे मताधिक्य कमी होऊन दहा हजारांचे मताधिक्य मिळाले. हसापुरे यांनी माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारून दक्षिण सोलापूर तालुक्यात काँग्रेसला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळवून दिली. हसापुरे यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, जिल्हा परिषद सदस्य, बाजार समिती संचालक, तसेच विद्यमान संचालक म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवाय शिंदे घराण्याने व काँग्रेसच्या पक्ष नेतृत्वाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडल्यामुळे काँग्रेस पक्ष तळागाळात पोहोचला आहे. दक्षिण तालुक्यात काँग्रेसला गतवैभव मिळवून देण्यासाठी हसापुरे यांना जिल्हाध्यक्ष करण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती व सोलापूर जिल्हा बँक ताब्यात घेण्यासाठी सुरेश हसापुरे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड निश्चित मानली जात आहे.

हसापुरे यांना यापूर्वीही जिल्हाध्यक्षपदाने हुलकावणी दिली आहे. दोन वर्षांपूर्वी जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कार्य केल्यानंतर त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड निश्चित मानली जात असताना मुंबईवरून धवलसिंह मोहिते-पाटील यांचे नाव जाहीर झाल्याने हसापुरे यांना जिल्हाध्यक्ष होता आले नाही. मात्र जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शिंदे घराण्यांनी हसापुरे यांना अधिकार दिल्यामुळे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या कार्याला व शब्दाला महत्त्व आहे. खा. प्रणिती शिंदे व काँग्रेसच्या इतर आमदारांच्या विकासनिधीमधून कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. इतर पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

# कासेगाव नगरीत अडीच लाख भाविक दाखल

### ● यल्लम्मा देवी यात्रा | जग-जोगत्यांचे ग्रामपंचायत, मानकऱ्यांकडून स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ डिसेंबर-**

तालुक्यातील कासेगाव येथील श्री यल्लमा देवीच्या यात्रेसाठी अंदाजे दोन ते अडीच लाख भाविक कासेगाव नगरीत दाखल झाले आहेत.

यात्रेच्या पहिल्या दिवशी जग जोगत्यांचे स्वागत ग्राम पंचायत व मानकरी यांच्या हस्ते करण्यात आले. नंतर जग जोगती आपापल्या स्थानावर स्थानापन्न होतात. सकाळी गावातील मानकऱ्यांच्या मानाचे नैवेद्य व लिंब नेसण्याचा कार्यक्रम होतो. यावेळी दोन देशमुख व देशपांडे यांचे मानाचे नैवेद्य वाजत गाजत नेऊन देवीला अर्पण केले जातात .नंतर वसंतराव देशमुख यांचा मानाचा लिंब नेसण्याचा कार्यक्रम व नैवेद्य वाजत गाजत मोठ्या उत्साहात पार पडतो. कासेगाव नगरीत विविध राज्यातून आलेले भाविक भक्त नैवेद्य दाखवतात. रात्री बारा वाजता देवीची पूजा दोन देशमुख व देशपांडे यांच्या हस्ते होते.

दरम्यान जत्रेच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शनिवारी (दि.२८) सकाळी मंदिरातून देवीची पालखी मानकरी बसंतराव देशमुख, भाऊसाहेब देशमुख यांच्या वाद्यात जाऊन मानकऱ्यांच्या हस्ते मानाची साडी चोळी बांगडी पालखीला अर्पण केली जाते. अरविंद माधव देशपांडे यांच्या घरी विसावा घेऊन पालखी मार्गस्थ होऊन गावातील सर्व समाजातील मानकऱ्यांच्या हस्ते साडी चोळी घेऊन देवीची पालखी मंदिराकडे प्रस्थान होते.

**मोठा पोलिस बंदोबस्त :** यात्रा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे . यासाठी ११५ पोलीस कर्मचारी एक पी.आय. व दहा पोलीस निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. चोऱ्यांना आळा घालण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे असे पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर यांनी सांगितले.

# वांगी गावच्या सरपंच सीता खडाखडे अपात्र

### जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने बसला फटका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगीच्या सरपंच सीता खडाखडे यांनी जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने त्यांना सरपंच व सदस्य म्हणून चालू राहण्यास जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी अपात्र घोषित केले आहे.

खडाखडे या सन २०२२ मध्ये सरपंचपदाच्या थेट निवडणुकीमध्ये अनुसूचित जमाती जागेवरून निवडून आल्या होत्या. घेरण्या खडाखडे यांनी ॲड. शरद पाटील यांच्यामार्फत ग्रामपंचायत विवाद दाखल केला होता. या प्रकरणी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या समोर सुनावणी झाली. त्यामध्ये ॲड. शरद पाटील यांनी सरपंच सीता खडाखडे यांचा जातीचा दाखला अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभागाने अवैध घोषित केला आहे. जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांची निवड भुतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे जाहीर करून सरपंच व सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र घोषित करण्यात यावे असा युक्तिवाद केला. युक्तिवाद ग्राह्य धरुन जिल्हाधिकाऱ्यांनी खडाखडे यांची थेट सरपंचची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाले असल्याचे घोषित केले व खडाखडे यांना वांगी ग्रामपंचायतीचे सरपंच तथा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र घोषित केले. यात विवाद अर्जदारातर्फे ॲड. शरद पाटील, ॲड. प्रसाद काशिद यांनी काम पाहिले.

# ग्राहक चळवळीसाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा

### ● तहसीलदार कणसे | सांगोला तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ डिसेंबर-**

जगाची अर्थव्यवस्था ग्राहकांभोवती फिरत असल्याने ग्राहकाचे महत्व कमालीचे वाढले आहे. कायद्याने ग्राहकांना सुरक्षा हक्क, माहितीचा हक्क, वस्तू निवड करण्याचा हक्क, म्हणणे मांडण्याचा हक्क, तक्रार निवारण, आदी हक्क प्राप्त झाले आहेत. त्यामुळे ग्राहकांचे शोषण कमी व्हायला मदत झाली आहे.

ग्राहक चळवळ यशस्वी करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेऊन तत्कालीन विचार न करता दीर्घकालीन विचार करावा असे प्रतिपादन सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांनी केले. तहसील कार्यालय व ग्राहक पंचायत, सांगोला यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पत्रकार नागेश जोशी यांनी प्रास्ताविकात स्पर्धात्मक किमतींमुळे ग्राहकांची दिशाभूल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अभ्यास करूनच ग्राहकांनी वस्तू खरेदी कराव्यात असे मत व्यक्त केले. ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष प्रा.भगवंत कुलकर्णी यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाचे महत्त्व अनेक उदाहरणे देऊन समजावून सांगितले. उपाध्यक्ष डॉ.मानस कमलापूरकर यांनी आभार मानले. यावेळी पुरवठा निरीक्षक प्रियंका जाधव, महसूल सहाय्यक सचिन शेंडगे, पुरवठा ऑपरेटर सागर दिघे, ग्राहक पंचायतीचे मोहसीन तांबोळी, मोहसीन मुलाणी, बाळासाहेब ताकभाते, पत्रकार उमेश मंडले उपस्थित होते.

# अखेर कुर्डूवाडी शहर होणार एकसंघ

▶ गाव एकत्रिकरणासाठी रेल्वे प्रशासनाचा पुढाकार
▶ शहर, रेल्वे कॉलनी, परिसर जोडणार



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २७ डिसेंबर-**

कुर्डूवाडी शहरातील गेट नंबर ३८ पाच वर्षांपूर्वी बंद करण्यात आले होते. त्यामुळे शहराचे दोन भाग झाले होते. अखेर कुर्डूवाडी गाव एकत्रीकरण व रेल्वे कॉलनी तसेच परिसर जोडण्यासाठी रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांची युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत.

कुर्डूवाडी-कुर्डूवाडीतील रेल्वे गेट नंबर ३८ येथील भुयारी मार्गाला गुरुवारी सुरुवात झाली असून लवकरच हा मार्ग सुरु होणार आहे. सदर ठिकाणी रेल्वे रुळाच्या चार लाईन असल्याने मोठा ब्लॉक घेण्यात येत आहे. गुरुवार, शुक्रवार दोन दिवस दुपारी साडेतीन तासाचे ब्लॉक घेण्यात आले. यावेळी रेल्वेचे अधिकारी व कर्मचारी काम ला लागले होते. प्रारंभी कटरच्या सहाय्याने आवश्यक ते रुळ कट करुन सदर ट्रॅक दोन जम्बो क्रेनच्या सहाय्याने उचलून बाजूला काढण्यात आला. दोन पोकलेन, टिप्परच्या सहाय्याने खोदाईचे काम सुरु झाले. या दोन दिवसात रेल्वे लाइन खालील ब्लॉकचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. साधारणपणे हे काम प्राथमिकरित्या पूर्ण होण्यास सुमारे १७ दिवसाचा अवधी लागणार आहे. त्यानंतर रस्ता, सिमेंट काँक्रिटीकरण हे सुरु होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आली.

**३२ बॉक्स टाकणार**

भुयारी मार्गात प्रत्येकी १.५ मीटर लांबीचे २३ बॉक्स म्हणजेच एकूण ३४.५ लांबीचे बॉक्स टाकण्यात येणार आहेत. या बॉक्सची उंची २७५ मी आहे. या बॉक्समधून जाण्या-येण्यासाठी दुहेरी रस्ता असून त्याची उंची ही २.७५ मी. असून रुंदी प्रत्येकी ४ मीटर असणार आहे.

# मैदानी खेळामुळे मानसिक, शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते

### ▶▶ फलटण जैन सोशल ग्रुपच्या अध्यक्षा सविता दोशी | ▶▶ विद्यार्थ्यांनी सादर केली नेत्रदीपक योग प्रात्यक्षिके



**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २७ डिसेंबर-**

अभ्यासाबरोबर खेळायला ही अतिशय महत्त्व आहे. ज्या खेळाची आपल्याला आवड आहे. तो खेळ जिद्दीने खेळला तरच आपण जिल्हा-राज्यस्तर-देशपातळीवर यश मिळवू शकतो. मैदानी खेळामुळे मानसिक, शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते, असे प्रतिपादन सविता दोशी यांनी केले.

शांतिनिकेतनची आठवण करून देणाऱ्या निसर्गरम्य वातावरणातील शाळा असल्याचे प्रमुख पाहुणे सी. ए. निलेश मर्दा यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, या शाळेमध्ये येण्याचा योग क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आला. आज आपण सहज पाहिले तर आपल्यामध्ये वेगवेगळ्या तीनस्तरांचे लोक आहेत. बाल, तरुण व काही ज्येष्ठ मंडळी आहेत. आपल्यामध्ये कोणी, उद्योग, व्यवसायिक, नोकरी, परीक्षार्थी व विद्यार्थी बसलेले आहेत. पण प्रत्येकाला प्रत्येकाचे काम सुरू करण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी करावी लागते. त्यासाठी सातत्य, सराव अतिशय महत्वाचा असतो. कारण त्यातून अनेक अनुभव येतात आणि आपण तयार होतो त्यातून आपल्याला प्रतिस्पर्ध्याची चाल ओळखता येते. खेळाडू चिरकाल तरुण, निरोगी असतात आणि निरोगी शरीरामध्ये निरोगी मन वास करते. खेळामुळे शारीरिक समृद्धी प्राप्त होते. प्रत्येकाला जय-पराजय खेळाडू वृत्तीने स्वीकारता आला पाहिजे. माणूस कितीही वेळा हरला तरी फिनिक्सप्रमाणे झेप घेणे म हत्वाचे असते तर आणि तरच आकाशाला गवसणी घालता येते. अनंतलाल दोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक अशी योगा प्रात्यक्षिके करून दाखविली. यावेळी क्रीडा शिक्षिका स्वाती शेंडगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मैदानाचे उद्घाटन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संचालक चंद्रप्रभू प्रा.वि. शे. स. पतसंस्था नातेपुते रवींद्र डुडू, संस्थापक अध्यक्ष रत्नत्रय परिवार, अनंतलाल दोशी, सी. ए. पंढरपूर निलेश मर्दा, संस्थेचे मार्गदर्शक वीरकुमार दोशी, संस्थेचे सचिव प्रमोद दोशी, अमित गांधी, रौनक चंकेश्वरा, वैभव शहा, सनतकुमार दोशी, रामदास करणे, सुरेश धाईजे, बबन गोफने, ज्ञानेश राऊत, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे उपस्थित होते. प्रास्ताविक सविता देसाई व सूत्रसंचालन अमृता मोहिते यांनी केले.

**खेळामुळे आत्मविश्वास वाढतो :** विद्यार्थ्यांनी खेळाकडे करीअर म्हणून पहावे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाकडे पूर्णपणे लक्ष देणे गरजेचे आहे. असे केल्यास विद्यार्थी खेळात आपले करिअर बनवू शकतात. शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे. शालेय जीवनापासून व्यायामाची सवय लावणे खूप महत्त्वाचे आहे. दररोज मैदानी खेळ खेळल्याने आत्मविश्वासही वाढतो. एखादा विद्यार्थी खेळामध्ये यश संपादन करून क्लास वन अधिकारी बनू शकतो, असे रविंद्र डुडू म्हणाले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री 'तुळजाभवानी'च्या १५ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनियर म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**



श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील संगणक विभागातील अंतिम वर्गातील १५ विद्यार्थ्यांची निवड पुणे येथील Sun Fibo Technology Pvt Ltd. Pune या कंपनीमध्ये ट्रेनि इंजिनियर म्हणून निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार संगणक विभागाच्या वतीने करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख प्रा. वाघमारे डी.जे., उपप्राचार्य प्रा.आर.जी. मुदकन्ना, प्राचार्य आर.एच. आडेकर व संगणक विभागातील स्टाफ यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे विश्वस्त माया माने, तहसीलदार तथा व्यवस्थापक श्री तुळजाभवानी मंदिर तुळजापूर आणि अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी धाराशिव डॉ. सचिन ओंबासे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### एकलव्य विद्या संकुलात मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी (ता. तुळजापूर) येथे भारताचे माजी पंतप्रधान कैलासवासी मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कैलासवासी मनमोहन सिंग हे भारताचे पंतप्रधान होते अर्थतज्ञ होते. देशासाठी मनमोहन सिंग यांचे योगदान मोठे आहे. शिक्षक हरीश मगदूम, संतोष बनसोडे यांनी मनमोहन सिंग यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांचे निधन झाल्याबद्दल एकलव्य विद्या संकुल मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी यावेळी गोविंद सोमानी, अण्णासाहेब कोल्हटकर, हरीश मगदूम, विठ्ठल म्हेत्रे, अशोक बनकर, महादेव शेंडगे, बालाजी क्षीरसागर, अनिल घुगे, संतोष बनसोडे, निर्मला हूगें, खंडू काळे, कोंडीबा देवकर, दत्ता भोजने,अण्णासाहेब मगर, संतोष बनसोडे व कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



### शासनमान्य तूर हमीभाव केंद्र चालू करण्याची मागणी

**परंडा, दि.२७ डिसेंबर -**

शासनामार्फत परंडा तालुक्यात मुग, उडीद व इतर कडधान्ये पिकांची हमीभाव केंद्र चालू करण्यात आली असून त्यामध्ये तूर पिकाचा सामावेश केला नाही. चालू वर्षी परंडा तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी तूर पिकाचे उत्पन्न घेतले आहे. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची तूर शासनाच्या हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाने तात्काळ शासनमान्य तूर हमीभाव केंद्र चालू करून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला यासाठी भाजपा परंडाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. झहीर चौधरी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते, बाबासाहेब जाधव, शिवाजी पाटील, धनाजी गायकवाड, रामकृष्ण घोडके, ॲड. भालचंद्र औसरे, परसराम कोळी, साहेबराव पाडुळे, धनंजय काळे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जयप्रकाश विद्यालयात माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांना श्रध्दांजली

**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी विद्यालयात मनमोहन सिंग यांना आदरांजली

**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

शहरातील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव येथे भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य बाळासाहेब प्रतापराव मुंडे, उपप्राचार्य विक्रमसिंह देशमुख यांच्यासह शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिंगळजवाडी आयडियल इंग्लिश स्कूलमध्ये क्रिसमस डे साजरा

**तेर, दि.२७ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी येथे आयडियल इंग्लिश स्कूल मध्ये बुधवारी क्रिसमस डे व बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन संस्थाध्यक्ष, अनिल देशमुख याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाजपाला, पावभाजी, पाणीपुरी, ढोकळा, पोहे, भजे, स्टेशनेरी, वडापाव, आदी स्टॉल लावले होते. मेळाव्यासाठी प्राचार्य व्ही.पी. आडसूळ, एम.पी. लोमटे, यु.एम. कोथिंबीरे, आर.आर. नाडे, बी.व्ही. खोडवे, एस.एन. घेवारे, एस.बी. मुळे, ज्ञानदा घुटुकडे, एन.ओ. शिंदे, इत्यादींनी परिश्रम घेतले.

### संतोष वतने यांना मातृशोक

**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

कंत्राटदार व धनगर चळवळीतील संतोष कोंडोंबा वतने यांच्या मातोश्री चंद्रकला कोंडीबा वतने (वय ७३) यांचे गुरूवार दि.२६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार शुक्रवार दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष दत्ता बंडगर यांच्यासह सर्वस्तरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील व्यापारी ज्ञानेश्वर वैद्य यांच्या त्या भगिणी होत्या.

## जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची आढावा बैठक संपन्न...

# पवन ऊर्जा प्रकल्पांशी निगडीत सर्व तक्रारींचे निराकरण करणार



### जिल्हाधिकारी डॉ. मैनक घोष...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

जिल्ह्यात सुरु असलेल्या पवन ऊर्जा प्रकल्पांबाबत अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत.याबाबत काही वादही निर्माण झाले आहेत.या संदर्भातील जिल्ह्यातील सर्व वाद आणि तक्रारींचे निराकरण करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मैनक घोष यांनी सांगितले. आज २७ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची बैठक डॉ. घोष यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीस पोलिस अधिक्षक संजय जाधव, अपर पोलिस अधिक्षक गौहर हसन, अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे, तहसीलदार मृणाल जाधव, तुळजापूर अरविंद बोळंगे तसेच महाऊर्जा, संबंधित विविध विभागाचे अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.काही उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन सहभागी होते.

जिल्हाधिकारी डॉ. घोष यांनी महाऊर्जा विभागाच्या वतीने जिल्ह्यात परवानगी देण्यात आलेल्या पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्पाबाबत माहिती घेतली. तसेच प्रकल्प उभे करण्यासाठी पवन ऊर्जा कंपन्या कोणत्या प्रक्रिया राबवतात, कंपनीला परवानगी देत असताना कोणकोणत्या नियमांची अंमलबजावणी करावी लागते, महाऊर्जा विभाग अशा प्रकल्पाबाबत कोणकोणती कागदपत्रे घेते याबाबत महाऊर्जाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. प्रकल्पांशी संबंधित असलेल्या कोणात्याही शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याचा विचार केला जाणार असल्याचे डॉ. घोष यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे पवन ऊर्जा कंपन्यांना जिल्हास्तरावर विविध स्वरुपाच्या परवानगी देण्यासाठी नियमावली बनविण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. महाऊर्जा विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पवन ऊर्जा प्रकल्पांची उभारणी असली पाहिजे असे सांगून डॉ. घोष म्हणाले, हे पवन ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प किती क्षमतेचे आहे. त्याचे क्षेत्र किती आहे हे तपासून घ्यावे. बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळण्यासाठी सुनावणी घेण्यात येणार आहे. जेथे तक्रारी आहेत त्याठिकाणी जावून अधिकारी भेट देवून संबंधित शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतील. कोणतीही ग्रामपंचायत पवन ऊर्जा कंपनीला परस्पर नाहरकत प्रमाणपत्र देणार नाही याबाबत आपण जिल्हा परिषदेमधून लेखी कळविणार असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिस अधिक्षक संजय जाधव म्हणाले, जानेवारी महिन्यापासून उपविभागीय अधिकारी पातळीवर पवन ऊर्जा प्रकल्पाशी संबंधित समस्याग्रस्त शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी बैठक घेण्यात येणार आहे. बैठकीबाबत शेतकऱ्यांना माहिती व्हावी, यासाठी बैठकीची निश्चित तारीख प्रसिध्दी माध्यमातून कळविण्यात येईल. दर महिन्यास जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक घेऊन पवन ऊर्जा प्रकल्पाशी संबंधित समस्येवर मार्ग काढण्यात येईल. तसेच सर्वांना विश्वासात घेवून हे काम करण्यात येईल, यामध्ये पारदर्शकता राहणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी जिल्ह्यातून विविध ठिकाणहून पवन ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित तक्रारदार शेतकऱ्यांनी आपल्या तक्रारी या बैठकीत समितीपुढे पोटतिडकीने मांडल्या. आपल्याला पवन ऊर्जा कंपन्यांकडून होणाऱ्या त्रासापासून सुटका करावी तसेच योग्य मोबादला कंपन्यांनी शेतकऱ्यांना द्यावा अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी पवन ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित समस्याग्रस्त शेतकऱ्यांनी आपले लेखी निवेदन पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीकडे सादर केली.

### प्रशासनाने पुढील काळात जबाबदारी चोखपणे बजावावी



बीडमध्ये कै. संतोष देशमुख यांची पवनचक्कीच्या प्रकरणात निर्घृणपणे हत्या झाली. जिल्ह्यात ही पवनचक्की उभारणीत पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांना दडपशाहीचे धोरण राबविले जात असून पवनचक्की कंपनीकडून पोलिस बळाचा वापर करून शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर आजतगायत त्याच्यावर कांहीच कारवाई झाली नव्हती. मात्र आता जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती स्थापन झाल्याने शेतकऱ्यांना आशा निर्माण झाली आहे. आता प्रशासनाने यापुढील काळात आपली जबाबदारी चोखपणे बजावावी, अन्यथा आम्ही शेतकऱ्यांना घेवून रस्त्यावर उतरू.

**- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते.

## पाळीव कुत्र्याला ठार मारल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

खेड गावातील एका व्यक्तीने आपल्या पाळीव कुत्र्याला मारहाण करून ठार मारल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक रामराव गव्हाळे (वय ५९, रा. खेड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २५ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जिलानी महबूब शेख (रा. खेड) हा दारूच्या नशेत त्यांच्या शेतात (गट क्रमांक ६१/१) आला आणि त्यांच्या ४ वर्षांच्या तांबड्या रंगाच्या कुत्र्याला काठीने मारहाण करून ठार मारले. या घटनेची माहिती मिळताच लोहारा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर जिलानी महबूब शेख विरोधात भारतीय दंड संहिता कलम ३२५ (मारहाण) आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१) (एल) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आठ महिन्याच्या बाळाच्या हृदयावरील शस्त्रक्रिया यशस्वी

### मुरूमच्या ग्रामीण रुग्णालयातील पथकाने घेतला पुढाकार...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२७ डिसेंबर -**

हृदयासंबंधित जन्मजात होणारा आजार म्हणजे सीएचडी हा आजार वरनाळवाडी येथील आठ महिन्याचा बाळ आरव महादेव अक्कलकोटे यास जन्मजातच जडला होता. त्याच्यावर उपचार करण्यासाठी मुरूम ग्रामीण रुग्णालयातील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागाने पुढाकार घेतला व मुंबईतील कोकिळाबेन हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे आणि मोफत शस्त्रक्रिया करण्यात आले शुक्रवारी दि.२७ रोजी आरव यास उपचारानंतर घरी पाठवण्यात आले.



उमरगा तालुक्यातील मुरूम ग्रामिण रुग्णालयातील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत संबंधित पथकाने नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात वरनाळवाडी येथील अंगणवाडीतील बालकांचे आरोग्य तपासणी केली होती. यावेळी आठ महिन्याचा बालक आरव अक्कलकोटे यास जन्म जातच हृदयासंबंधित होणारा सीएचडी आजार असल्याचे तपासणीत दिसून आले. त्यामुळे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश अरदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पथकाचे प्रमुख डॉ. जी.एल. कांबळे तसेच डॉ. तेजस्वीनी सोनवणे त्याचप्रमाणे औषध निर्माण कर्मचारी गजानन ठोंबरे, अधिपरिचारिका पुष्पां गोरे यांनी पुढाकार घेतला व सदरील बालकाला धाराशिव येथे प्राथमिक उपचार्थ दाखल करून पुढे शस्त्रक्रिया करण्यासाठी मुंबई येथील कोकिळाबेन हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

दि.४ डिसेंबर रोजी आरव याच्यावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आले असून त्यास शुक्रवारी २७ डिसेंबर रोजी उपचारानंतर घरी पाठवण्यात आले.

## राष्ट्रीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत प्रियंका हंगरगेकरला सुवर्ण पदक

### राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाची चमकदार कामगिरी...

### महाराष्ट्र संघाने तब्बल ११ पदके पटकावली

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**



राष्ट्रीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत तुळजापूर च्या खेळाडूंची चमकदार कामगीरी करत दोन सुवर्ण सह ४ पदके पटकावली. या स्पर्धेत प्रियंका हंगरगेकरने एकेरी मध्ये सुवर्ण पदक पटकावत अजिंक्य पद पटकावले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने तब्बल ११ पदके पटकावली आहेत.

देवास-मध्यप्रदेश येथे १८ ते २२ डिसेंबर दरम्यान पार पडलेल्या ६८ व्या राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचा संघाने चमकदार कामगीरी केली आहे. या स्पर्धेत प्रियंका हंगरगेकरने १७ वर्षे वयोगटात एकेरी सह सांघिक प्रकारात सुवर्ण पदक पटकावले आहे. तसेच समर्थ शिंदेने १४ वर्षे वयोगटात सांघिक प्रकारात सुवर्ण पदक पटकावले आहे. याशिवाय यश हुंडेकरीने १९ वर्षे वयोगटात सांघिक प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक संजय नागरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघटनेचे अध्यक्ष सुनील पूर्णपात्रे, सचिव रवींद्र सोनवणे, जिल्हाध्यक्ष अध्यक्ष संदीप गंगणे, सचिव सीराज शेख आदिंनी अभिनंदन केले आहे.

## लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथे वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ डिसेंबर -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल व पोदार जम्बो किड्स,उमरगा येथे वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. सलग दोन दिवस चाललेल्या ह्या स्नेहसंमेलनात पहिल्या दिवशी पोदार जम्बो किड्स व लोटस पोदार लर्न स्कूल येथील इयत्ता १ ली ते ४ थी वर्गातील विद्यार्थ्यांनी 'आजिविका'या विषयावर आपली कला सादर केली.

स्नेहसंमेलनासाठी पहिल्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा तहसीलचे तहसीलदार गोविंद यरमे हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत शिर्षी येथिल तहसीलदार शिवाजी कदम यांची होती. तर दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस उपाधिक्षक सदाशिव शेलार उपस्थित होते.

## वित्त विभागाचा लेखा परिक्षण अहवाल नागरिकांना पाहण्यासाठी खुला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

जि.प.च्या वित्त विभाग व भविष्य निर्वाह निधी विभागाचा सन २०२१-२२ आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, धाराशिव यांचेकडून करण्यात आले आहे. हा लेखा परिक्षण अहवाल कार्यालयास प्राप्त झाला आहे. लेखा परिक्षण अहवाल वित्त विभाग जि.प. या कार्यालयात सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे. अशी माहिती जि.प.चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे यांनी दिली.

## मेसाई जवळगा येथील सरपंचाच्या गाडीवर हल्ला; गाडी पेटवण्याचा प्रयत्न

**पवनचक्की प्रकरणामुळे हल्ला झाल्याचा सरपंचाचा दावा ! संरक्षण देण्याची मागणी... चार अज्ञातांवर गुन्हा दाखल...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**

तालुक्यातील मेसाई जवळगा येथील सरपंच नामदेव निकम यांच्या गाडीवर अज्ञात दोन मोटरसायकलवरून चार-चार अज्ञात मारेकऱ्यांनी हल्ला करून गाडीच्या काचा फोडून पेट्रोलचे फुगे फेकून गाडी पेटवण्याचा प्रयत्न केला.

मागील काही दिवसा खाली पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवण्यासाठी मेसाई जवळगा येथील शेतकऱ्यांना दमकावण्यासाठी पंधरा-वीस स्कार्पियो मधून ४०-५० बॉन्सर आणि भाडोत्री गुंड आणून दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी संपूर्ण गावातील नागरिक महिला वृद्ध आणि लहान मुले रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी सरपंच नामदेव निकम आणि प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांनी त्या बाऊन्सरला धमकावून गावातून हाकलून दिले होते. त्याच प्रकरणातून हा हल्ला झाल्याचा सरपंच निकम यांनी दावा केला आहे.



याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की मेसाई जवळग्याचे सरपंच नामदेव निकम हे दि.२६ डिसेंबर रोजी हे दिवसभर गावात लाईट नसल्याने लाईटच्या कामासाठी तुळजापूर येथे आले होते.

तुळजापूरहुन वापस गावाकडे रात्री दहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मारुती सुझुकी कंपनीची एमएच १२ जीटी ७७९० या गाडीने जात असताना त्यांच्यावर चार अज्ञात व्यक्तीने मोटरसायकलवर येऊन दोन्ही बाजूंनी अंडे आणि दगड मारून गाडीच्या काच फोडून सरपंच नामदेव निकम आणि त्यांचा मित्र प्रवीण इंगळे यांच्या अंगावरती पेट्रोलने भरलेले फुगे फेकून मारून अज्ञात मारेकरी फरार झाले.

या प्रकरणी चार जणांविरुद्ध नामदेव बालिश निकम (वय ३८, रा. तुळजापूर) यांच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद झाला आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भालेराव हे करत आहे.

## पाटसांगवी ग्रा.पं सार्वत्रिक निवडणूक प्रारुप प्रभाग रचना पडताळणीस मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

ग्रामविकास विभागाने जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ मध्ये मुदत संपणार्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केला आहे. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी जिल्ह्यातील भूम तालुक्यातील पाटसांगवी ग्रा.पं.च्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रारूप प्रभाग रचना पडताळणी करून त्यास मान्यता दिली आहे. सूचना संबंधित ग्रा.पं., तलाठी, मंडळ अधिकारी, पं.स. व तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर ३० डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# मलकापूर शिवारात वाघाने केली वासराची शिकार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथे गुरुवारी (ता.२६) रात्री अज्ञात हिंस्त्रप्राण्याने वासराची शिकार केल्याची घटना रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली. शेतात असणाऱ्या शेतकऱ्यांनी वासराला ज्वारीच्या पिकात हिंस्त्रप्राण्याने ओढत नेल्याच्या प्रकार पहिला . वनविभागाला सदरील घटनेची माहिती देताच वनविभागाचे गस्त पथक मलकापुर शिवारात दाखल झाले होते. येडशी अभयारण्यात वाघाचा मुक्काम वाढणार असुन शेतकऱ्यात भीतीचे वातावरण असुन वनविभागाकडून शेतकऱ्यांचे सुरक्षितता,बचाव, व्याघ्रसंरक्षण या बाबत समुपदेशन करण्याची गरज निर्माण झाली आहे.



येडशीच्या अभयारण्यात गेल्या तीन दिवसांपासून वनविभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात वाघाचे रोजच दर्शन होत असुन मंगळवारी बार्शी तालुक्यातील ढेंबरेवाडी तलाव परिसरात वाघोबा दिसल्याची माहिती आहे. येडशी अभयारण्यालगत बालाघाटातील वडगाव, चोराखळी, उक्कडगाव, पिंपळवाडी (ता. बार्शी) श्री. येडेश्वरी मंदिर येरमाळा परिसरात सार्वजनिक वनविभागाचे वनक्षेत्र आहे.गुरुवारी (ता.२६) कळंब तालुक्यातील मलकापूर येथील शेतकरी विश्वास आनंदराव लोमटे, किरण लोमटे, हेमंत लोमटे शेतात गेले असता हेमंत लोमटे यांचे गायीचे वासरु हिंस्त्र वाघसदृष्य वन्यप्राणी फरफटत घेऊन जात असल्याचे निदर्शनास आल्याने आजुबाजुचे शेतकरी जमा होऊन आरडाओरडा केला. सदरील घटनेची माहिती वनविभाग अधिकाऱ्यांना ग्रामपंचायत सदस्य आदित्य लोमटे यांनी संपर्क करुन सदरील घटनेची माहिती देताच येडशी अभयारण्याचे वन्यप्राणी वनपरिक्षेत्रपाल ए.डी. मुंडे, वनविभाग भूम परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल दीपक गांधले वनरक्षक सतीश साळुंके, बालाजी ससाने, गजानन दांडगे, संकेत टाके, सागर जगताप, प्रमोद कांबळे, वनसेवक भारत काकडे सर्व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन परिसरात टेहळणी करण्यास सुरुवात केली. ज्वारी हे पिक उंच असल्याने रात्रीची वेळ असल्याने ठसे टेहळणी करता येत नसल्याने जमावाला घरी पाठवून आज सकाळी घटनास्थळाचा पंचनामा करुन त्याठिकाणी ट्रॅपकॅमेरे बसवण्यात आले आहेत.

> मलकापूर येथे हिंस्र प्राण्याने वासरावर हल्ला करुन ठार केल्याचा पंचनामा केला आहे.पाऊस पडल्याने ठसाचे पंचनामे करण्यात अडचण आली. तो हिंस्र प्राणी वाघ आहे की बिबट्या याबाबत शंका आहे. ठसे बिबट्या सदृश्य असुन वासरु हल्यात मृत्युमुखी पडल्याने शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरपाई वनविभागाकडून मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. शेतामध्ये रात्री अपरात्री आवश्यक असेल तरच शेतकऱ्यांनी बाहेर पडावे. हातामध्ये काठी, बॅटरी असावी. मोबाईलवर मोठ्या आवाजात गाणी लावावीत किंवा मोठ्या आवाजात बोलावे म्हणजे वाघ, बिबट्या जवळ येणार नाहीत.
>
> **- दीपक गांधले,** वनपरीक्षेत्र अधिकारी भूम.

> सध्या बिबट्या, वाघ या सारख्या हिंस्त्रवन्य प्राण्यांचा वावर परिसरात वाढल्याने शेतकऱ्यांना वन्यप्राणी संरक्षणासह स्वरक्षणासाठी वनविभाग काय उपाययोजना करणार यासाठी येडशी अभयारण्याचे वन्यप्राणी वनपरिक्षेत्रपाल ए.डी. मुंडे यांना दोन वेळा संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क साधु शकला नाही.



जिल्ह्यातील चार तालुक्यात बिबट्या, वाघाचा वावर असल्याचे वनविभागाने सांगितले आहे. सध्या या हिंस्त्र वन्याप्रण्यासह, नामशेष होतं चाललेल्या राष्ट्रीय वाघ प्राण्याच्या येण्याने वन्यप्राणी प्रेमित आनंदाचे वातावरण, कुतूहल निर्माण झाल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून दिसत असले तरी सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी रात्री अपरात्री शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यात भीतीचे वातावरण आहे, असे असले तरी अभयारण्यात राहणाऱ्या इतर प्राण्यांसह मानवी जीवाचे, तर मानवी जीवापासून दुर्मिळ वाघाचे संसरक्षण होणे गरजेचे असल्याने, मानवी जीवाकडून सुरक्षिततेसाठी वाघाला दगा फटका होण्याची शक्यता पाहता या परिसरातील शेतकऱ्यांचे स्वरक्षणासह, व्याघ्ररक्षणा बाबत वनविभागाकडून समुपदेशन होणे गरजेचे आहे.

# धनंजय सावंत यांना धमकी देणाऱ्या पवनचक्की माफियाचा तपास एसआयटीकडे देण्याची शिवसेनेची मागणी

**सावंत परिवाराला पोलिस संरक्षण द्या ! शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**

राज्याचे माजी आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांचे पुतने धनंजय सावंत व केशव सावंत यांना पत्राव्दवारे धमकी देणाऱ्या पवनचक्की माफीयाचा आकाला तात्काळ आटक करुन तपास एसआयटीकडे देण्याची मागणी तुळजापूर शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री यांना तहसीलदार मार्फत दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, राज्याचे माजी आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांचे पुतने धनंजय सावंत व केशव सावंत यांना दि.२३ डिसेंबर रोजी ऊस वाहतुक ट्रक्टर ड्रायव्हर मार्फत जिवे मारण्याची धमकी वजा पत्र ज्यामध्ये तुमचापण संतोष देशमुख मस्साजोग केला जाईल अशा आशयाचे पत्र शंभर रुपायाची नोट जोडून दोन अज्ञात वाहनधारकांनी दिले.

सदरील प्रकार हा अतीशय गंभीर असून पवनचक्की माफीयांचा यांच्या मध्ये हात असल्याचे नाकारता येत नाही. मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या काही मारेकऱ्यांना आणखीनही अटक करणे बाकी आहे.

महाराष्ट्रामध्ये अराजकता माजवण्यासाठी निघृण हत्येची साखळी रचलेली आहे आणि त्यांना कोणत्याही कायद्याचा धाक नसल्यामुळे धकमी वजा पत्र दिलेले आहे.

मुख्यमंत्री यांनी सदरील प्रकरणाची चौकशी एसआयटीकडे वर्ग करावी व जीवे मारण्याची धकमी दिलेल्या व्यक्तींना आणि त्यांच्या आकाला तात्काळ अटक करावी व सावंत परिवाराला पोलिस संरक्षण द्यावे.

सदरील निवेदनावर शिवसेना तालुकाप्रमुख संभाजी पलंगे, शहर प्रमुख बापूसाहेब भोसले, राजाभाऊ शिंदे, सुरेश नेपते, अभय साळुंके, लालासाहेब तांबोळी, मोहन भोसले, पांडुरंग पलंगे, दिनेश भोसले, मनोज कोकणे, दिनेश कापसे, ओमकार कराडे, अंकुश पवार, गणेश म्हेत्रे, महादेव जमदाडे, गणेश गंधुरे, प्रशांत कांबळे, अंबादास कदम, संतोष शिंदे, सचिन मोटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कोळी महादेव समाजाचा वधू-वर सूचक मेळावा

**मेळाव्यात १८७ वधू-वरांची नोंदणी... जाधवर यांचे कायदेविषयक मार्गदर्शन...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

महाराष्ट्र कोळी समाज संघ व शामल कोळी वधू-वर सूचक सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी, २५ डिसेंबर रोजी शहरातील जनाई मंगल कार्यालयात कोळी महादेव समाजाचा वधू-वर सूचक मेळावा व अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळविण्याकरीता कायदेविषयक मार्गदर्शन पार पडले. या दोन्ही कार्यक्रमांना समाजबांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र कोळी समाज संघाचे सोलापूर शहराध्यक्ष गणेश कोळी, राज्य पोलीस प्राधिकरणचे अध्यक्ष उमाकांत मिटकर, प्रमुख पाहुणे महाराष्ट्र कोळी समाज संघाचे सचिव मदन भोई, वधू-वर सूचक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष नागनाथ नाटकरे, प्रमुख मार्गदर्शक ॲड. प्रताप जाधवर, माजी सभापती तथा नगरसेवक सिद्धेश्वर कोळी, चंद्रकांत हुग्गे, जिल्हा परिषद माजी सदस्य उषा सर्जे, माजी नगरसेवक पंढरीनाथ कोणे, बालाजी कोरे, सुजित राऊत, राम चामे, रमाकांत नाटकरे, चंद्रहास नलमले, माधव पटले, राम काळगे, वैजीनाथ नाटकरे उपस्थित होते.

कार्यक्रमास पोलीस तक्रार प्राधिकरणचे अध्यक्ष उमाकांत मिटकरी यांनी यावेळी समाजाच्या प्रश्नांसाठी मुख्यमंत्र्यांकडे बैठक लावू, असा शब्द दिला आहे.

यावेळी प्रताप जाधवर यांनी जात प्रमाणपत्र काढण्यासाठी कायदेशीर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात काही समाजबांधवांनी अडचणी मांडल्या. त्यावरजाधवर यांनी कायदेशीर सहकार्य करण्याचे अभिवचन दिले.

मेळाव्यास लातूर, नांदेड यवतमाळ, वाशीम, परभणी, हिंगोली, पुणे, सोलापूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर, सांगली, कोल्हापूर, जालना, जिल्ह्यातील समाज बांधव उपस्थित होते. उपस्थितांचे आभार बापू जगदे, श्रीधर बलवंडे यांनी व्यक्त केले.

# येडशी रामलिंग वन्यजीव अभयारण्यात वाघाचे आगमन

**नागरिकांसाठी जनजागृती व सुरक्षा उपाय...**

यवतमाळ येथील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातील एका नर वाघाने जवळपास ५०० किमी प्रवास करून धाराशिव जिल्ह्यातील येडशी रामलिंग अभयारण्यात दाखल होत आपले अस्तित्व दाखवले आहे. हा वाघ मराठवाड्यात प्रथमच आढळल्याने स्थानिकांमध्ये काळजी व उत्सुकता दोन्ही निर्माण झाली आहे.

❋ वाघ, बिबट असलेल्या परिसरात अशी घ्या खबरदारी....

❋ वाघ, बिबट प्रवण क्षेत्रामध्ये वावरताना समूहाने फिरावे. शक्यतो एकटे फिरणे टाळा.

❋ मुलांनी शाळेत जाताना शक्यतो समूहाने जावे. ❋ वाघ, बिबट्याच्या बाबतीत अफवा पसरू नयेत. ❋ वन विभाग व वन्यजीव संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्थांना सोबत घेऊन गावात सभा घ्या आणि वाघ व बिबट्यापासून कसा बचाव करावा या बाबत जनजागृती करा. ❋ घराच्या परिसरात मुबलक प्रकाश असावा. ❋ शक्य असल्यास घराभोवती जाळीचे कुंपण मारावे. ❋ रात्री बिबट्या जास्त सक्रिय असल्याने रात्रीच्या वेळी अंगणात उघड्यावर झोपणे टाळा. ❋ रात्री अंधारात बाहेर पडायचे असल्यास काठी आणि टॉर्च सोबत घेऊन जावे. काठीला घुंगरू बांधून जमिनीवर आपटत चालावे. मोबाईलवर मोठ्याने समूह गीत लावावे जेणेकरून बिबट्या सदृश्य प्राण्याला एकापेक्षा अधिक माणसे सोबत असल्याचा भास होईल. सोबत एखादी शिट्टी घेऊन जा व कालांतराने ती वाजवा. सोबत आपला पाळीव कुत्रा नेल्यास उत्तम. ❋ वाघ, बिबट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करू नये किंवा त्याला मारण्याचा, डीवचण्याचा प्रयत्न करू नये. ❋ त्याला हाकलून लावण्यासाठी मोठमोठ्याने आरडाओरडा करा, काठी वाजवा, ताट वाजवा, फटाके फोडा. ❋ लहान मुलांना खेळण्यासाठी किंवा घराबाहेर एकटे सोडू नये. ❋ घराजवळ व गावात स्वच्छता राखा कारण अस्वच्छ परिसरात कुत्री- डुकरे यांचा वावर जास्त असतो आणि यांची शिकार करण्यासाठी बिबट्या सारखे प्राणी तेथे येऊ शकतात. ❋ एखाद्या ठिकाणी वाघ, बिबट्या आढळल्यास तेथे चोहोबाजूंनी गर्दी करणे टाळा. अश्या वेळेस तो प्राणी संभ्रमावस्थेत जाऊन गर्दीवर हल्ला करू शकतो. ❋ गुरे उघड्यावर व अंधारात बांधण्याऐवजी बंदिस्त गोठ्यात व उजेडात बांधावे. ❋ उसाच्या शेतात प्रवेश करण्यापूर्वी सोबत एक ताट व काठी घेऊन जा आणि जोरात वाजवा. ❋ उघड्यावर शौचास जाणे टाळा. ❋ अचानक वाघ अथवा बिबट्यासमोर आल्यास खाली बसणे अथवा जमिनीवर आडवे पडणे टाळा. ❋ शक्य असल्यास अश्या प्राण्यां पासून लांब राहून त्याचे फोटो अथवा विडिओ काढा. ❋ वाघ, बिबट्या अथवा बिबट्यासदृश्य प्राणी दिसल्यास तत्काळ वन विभागाला कळवावे अथवा वनविभागाच्या १९२६ या टोलफ्रि क्रमांकावर संपर्क साधावे.



**वन्यजीव अभ्यासक**
**राहुल शिंदे,**
**सोलापूर मोबा :- ९८६००९३७१२**

# प्रलंबित महामार्गचे काम त्वरित पूर्ण करा; जनता दरबारात आ. पाटील यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते वागदरी, येडोळा, गुजनूर, शहापूर, गुळहळ्ळी मार्गे अक्कलकोट जाणारा नव्याने मंजूर झालेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५२ चे सिमेंट रोडचे काम गेल्या सहा वर्षांपासून जगोजागी प्रलंबित आहे. ते प्रलंबीत काम त्वरित पूर्ण करून या मार्गावरील वाहतूक सुरळीत करावी. या मागणीचे लेखी निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा जिल्हा सचिव एस.के. गायकवाड व ग्रामस्थांनी आ. राणाजगजितसिंह पाटील यांना तुळजापूर येथे आयोजित जनता दरबारात देण्यात आले.

विधानसभा निवडणुकीनंतर तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या माध्यमातून विजयी झालेले भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.२४ डिसेंबर रोजी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी तुळजापूर येथील शासकीय विश्रामगृहात पहिल्यांदाच आमसभेचे आयोजन केले होते.

यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक एस.के. गायकवाड यांनी आ. पाटील यांना सदर मागणीचे निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, नळदुर्ग ते अक्कलकोट या राष्ट्रीय महामार्गचे काम शेतकरी, शासन, प्रशासन, गुत्तेदार व न्यायालय यांच्या चक्रव्यूहात अडकले असून गेल्या सहा वर्षांपासून जागोजागी शेतकऱ्यांनी अडविल्याने अर्धवट अवस्थेत रखडले आहे.

ज्याठिकाणी काम रखडले आहे. त्या ठिकाणी रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून दगडही उघडे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून वाहन चालवणे मोठे जोखमीचे झाले असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे.वारंवार या बाबत जनतेनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन विधानसभा निवडणुक-२०२४ च्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे आयोजित प्रचार सभेत देशाचे केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी या रोडचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी ६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून लवकरच हे काम पूर्ण करण्यात येईल, असे सांगितले होते. परंतू अद्याप या कामाला सुरुवात झाली नाही. तरी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी या कामी योग्य तो पाठपुरावा करून या रोडचे प्रलंबित काम त्वरित पूर्ण करून या रोडवरील वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी केली आहे.



यावेळी भाजपा मेडिया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ, सरपंच फुलचंद वाघमारे, लहुजी शक्ती सेनेचे महादेव मोरे, वागदरी, येडोळा, गुजनूर, शहापूर, गुळहळ्ळी, दहीटणा येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# जल संजीवनी प्रकल्पाकडून शेतकरी अभ्यास भेट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

युनायटेड वे मुंबई संस्थेच्या जल संजीवनी प्रकल्पाअंतर्गत लोहारा आणि तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अभ्यास भेट आयोजित करण्यात आली. कसबे तडवळे येथील सेंद्रिय शेती पद्धती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीला भेट देवून मार्गदर्शन करण्यासाठी देण्यात आले. यामध्ये लोहारा तालुक्यातील मार्डी, नागराळ, उंडरगाव, हिप्परगारवा तसेच तुळजापूर तालुक्यातील कार्ला आणि वानेगाव या गावांतील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

सहल प्रामुख्याने शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, तंत्रज्ञानाचा वापर, पशुपालन, फळबागेची देखभाल, आणि सेंद्रिय निविष्ठा कशा तयार कराव्यात याविषयी माहिती देण्यावर लक्ष केंद्रित करत होती.

कसबे तडवळे येथील शेतकरी महेश जमाले यांनी सेंद्रिय शेती पद्धतीचे सर्व पैलू शेतकऱ्यांना समजावून सांगितले. महेश जमाले हे सेंद्रिय शेतीसाठी लागणारी सर्व निविष्ठा स्वतः शेतावरच तयार करतात.

त्यामध्ये गांडूळ खत, जीवामृत, घन जीवामृत, हुमिक ॲसिड, अमायनो ॲसिड, वेस्ट डीकंपोजर, नत्र, स्पुरद, पालाश, दुय्यम अन्नद्रव्य आणि सूक्ष्म अन्नद्रव्य यांचा समावेश आहे. हे सर्व निविष्ठा शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे उत्पादन मिळवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

महेश जमाले यांनी शेतकऱ्यांना कसे सेंद्रिय निविष्ठा तयार कराव्यात, त्याचे फायदे, आणि पारंपारिक शेतीच्या तुलनेत सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगितले.

त्याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीला जास्त महत्त्व देऊन शाश्वत आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले.

तसेच जाधव यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे फायदे आणि भविष्यातील त्याची महत्त्वता सांगितली.

जाधव सरांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीसाठी असलेला उत्साह अधिक वाढला. त्यांनी सेंद्रिय शेतीला वाव देण्यासाठी विविध तंत्रज्ञानांचा उपयोग, जलसंधारण, आणि योग्य पद्धतींचा अवलंब करण्याचे महत्त्व सांगितले. त्यांच्या या उपदेशाने शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या दृष्टीकोनात बदल करण्याची प्रेरणा मिळाली.

संपूर्ण सहलीचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना नवी तंत्रज्ञान शिकवणे आणि त्यांना सेंद्रिय शेतीकडे वळवणे हे होते.

ज्यामुळे शेतीला अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवता येईल. शेतकऱ्यांना इतर शेतकऱ्यांचे अनुभव ऐकून त्यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा ठराव केला.

**जाहीर नोटीस**

रे. दिवाणी वाद नं. ५९/२०१९ नि.नं. ५८
पुढील नेमलेली तारीख ०९/०१/२०२५

**भूम येथील दिवाणी न्यायाधीश कनि. स्तर यांच्या न्यायालयात**

**सविता व २** ----- **वादी**
**- विरुद्ध -**
**जंगलू व इतर** ----- **प्रतिवादी**

**प्रति,**
**प्रतिवादी नं. : ६**
६ अ) **संतोष चांगदेव देवकर,** वय ३४ वर्षे, धंदा, शेती, रा. ईडा, ता. भूम, जि. धाराशिव (उस्मानाबाद)
६ ब) **संदीप चांगदेव देवकर,** वय ३३ वर्षे, धंदा, शेती, रा. ईडा, ता. भूम, जि. धाराशिव (उस्मानाबाद)
६ क) **शारदा यल्लाप्पा चव्हाण,** वय ३८ वर्षे, धंदा, घरकाम, रा. ईडा, ता. भूम, जि. धाराशिव (उस्मानाबाद)

ज्याअर्थी, उपरिनामित **वादी- सौ. सविता सुखदेव जाधव व २,** यांनी या न्यायालयाकडे, अर्ज केला आहे की, तुम्ही मयत प्रतिवादी नं. ६ सुशिलाबाई चांगदेव देवकर त्याअर्थी, याद्वारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुद्ध कारण दाखविण्याकरिता **दिनांक ०९/०१/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणी करीता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक २१/११/२०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय कनि. स्तर, भूम,
ता. भूम, जि. धाराशिव (उस्मानाबाद)

क्राईम वृत्त...



## शिवाजी महाविद्यालयात बाल शौर्यदिन साजरा

**उदगीर, दि.२७ डिसेंबर -**

शिवाजी महाविद्यालयात फतेहसिंग व जोरावसिंग यांच्या देशासाठी दिलेल्या बलिदानाबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने शौर्य बालदिन साजरा केला जातो. आजच्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे होते. यावेळी दोन्ही वीर पुत्रांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आपल्या मनोगतामध्ये फतेहसिंग आणि जोरावसिंग यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना या सहा व आठ वर्षाच्या मुलांच्या धैर्याचे कौतुक केले. नवाब वजारे खान यांनी त्यांना मुस्लीम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले होते. हा विरोध झुगारून हिंदू धर्माचे व शिख पंथीयाचे पावित्र्य राखले असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख प्रो.डॉ. सुरेश शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन सहसंयोजक डॉ.डी.बी. मुळे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.एल.एच पाटील, डॉ. विष्णु पवार, डॉ.डी बी. कोनाळे, डॉ.एस.एम. कोनाळे, डॉ.ए.एस. टेकाळे, डॉ.एस.डी. निटुरे, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खरी कमाई उपक्रमाने जि.प. प्रशाला अंबुलगा (बु) येथे गणित दिवस साजरा

**निलंगा, दि.२७ डिसेंबर -**

थोर गणितज्ञ रामानुज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्रशाला अंबुलगा (बु.ता.निलंगा) येथे विद्यार्थ्यांना गणितातील संकल्पना प्रत्यक्षात व्यवहारातून कळावा, नफा-तोटा, खरेदी-विक्री, व्यवहार ज्ञान कळावे यासाठी खरी कमाई हा उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब बिरादार, उपाध्यक्ष यशोधन कांबळे, सरपंच स्वाती शिंदे, स्वस्त धान्य दुकानदार किरण शिंदे, उपसरपंच जगदीश सगर, ग्रामपंचायत सदस्य महावीर काकडे, इंदिरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक सुर्यवंशी, प्रशालेचे मुख्याध्यापक शिवशंकर मिरगाळे,ब.शि.महासंघाचे जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, मा.शि. संघाचे जिल्हाउपाध्यक्ष तुबाकले, कुलकर्णी, गिरी, पाटील, सिध्दार्थ सोमवंशी, संदिप पाटील, अरविंद भालके, नागटिळक, भोसले, पटने, शेळकीकर, स्वाती शिंगे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी यासाठी विविध खाद्यपदार्थ बनवून आणले होते. खाद्य पदार्थ, फळे, पाणीपुरी आदी अनेक मेनू आणले होते. विक्रीसाठी एकूण ३० स्टॉल लावण्यात आले होते. यातून अंदाजे १५००० रुपयांची खरेदी विक्री उलाढाल झाली. खरेदीसाठी गावातील नागरिक, शाळेतील शिक्षक, इंदिरा विद्यालयाचे विद्यार्थी व प्रशालेतील विद्यार्थ्यांची झुंबड उडाली होती. कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.

### बसस्थानक दोन; लातूर जिल्ह्यातील सर्वाधिक भंगार बसेस औसा आगारात...!

# औसा आगारातील बसेसची दयनीय अवस्था; प्रवाश्यांचे हाल

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.२७ डिसेंबर -**

राष्ट्रीय महामार्गावरील व लातूर शहरापासून जवळच असलेल्या औसा शहरातील दोन्ही बसस्थानक प्रवाशांसाठी तसेच तालुक्यातील जनतेसाठी गैरसोयीची होत आहेत. तसेच औसा आगारात जिल्ह्यातील सर्वाधिक भंगार बस असल्यामुळे प्रवाशांना वेळेत प्रवास करता येत नाही.प्रवाशी घेऊन गेलेली बस परत येईल याची शास्वती नाही. यामुळे औसा आगाराच्या बसमधून तालुक्यात प्रवास करणं प्रवाशांना गैरसोयीचे होत आहे.

४० हजाराहून अधिक औसा शहराची व जवळपास तीन लाख तालुक्याची लोकसंख्या आहे. या जनतेला सोयीने प्रवास करता यावा यासाठी औसा शहरात राज्य परिवहन महामंडळाचे बस आगार असून शहरात जुनं बसस्थानक



आहे. याचबरोबर अधिकाधिक चांगली सेवा मिळावी म्हणुन नवे बसस्थानक आगारालगत उभारले आहे. या नव्या बसस्थानकामुळे औसा शहराच्या वैभवात कम ालीची भर पडली आहे. परंतू औसा आगारातील बसेस जुन्या बसस्थानकातून आणि इतर या मार्गावरुन धावणाऱ्या बसेस नव्या बसस्थानकातून सुरु आहेत. यामुळे शहरासह तालुक्यातील जनतेला दोन्ही बसस्थानकं गैरसोयीचे होत आहेत.

औसा शहरात विद्यालय, महाविद्यालय, शेतीमाल, इतर बाजारपेठ, पंचायत समिती, पोलिस स्टेशन, तहसिल कार्यालय, न्यायालय व इतर शासकीय कार्यालय जुन्या बसस्थानकाजवळ आहेत. यामुळे शेतकरी, विद्यार्थी, छोटे व्यवसायिक व कांही कामानिमित्त औशात येणाऱ्या किल्लारी, खरोसा, उजनी म ार्गावरील प्रवाशी नागरिकांना नव्या बसस्थानकावर उतरुन पुन्हा जुन्या बसस्थानकाकडे ये-जा करण्यासाठी २० रुपयांचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. याचबरोबर वेळ वाया जात आहे.

याचबरोबर शहरातील व्यवसायिक उलाढालीवर याचा विपरीत परिणाम होत आहे. औसा आगारात बसेस असून यामध्ये सर्वाधिक भंगार बसेस असून तालुक्यातच धावतात. या खिडक्या नसलेल्या, शीट तुटलेल्या, पतरे फाटलेल्या व प्रवाशांच्या प्रवासाचे तिकीट फाडलेल्या ठिकाणी गरंटीने पोहंचवू शकत नसलेल्या भंगार बसमधून प्रवास करावा लागतो. अशा औसा आगारातील बससेवेम ुळे प्रवाशांना गावाकडे पोहंचण्याची गरंटी चालक, वाहक देऊ शकत नाहीत. आणि कांही कामानिमित्त औसा शहरात येण्यासाठी वेळ काढून बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना औसा आगाराची बस वेळेत मिळत नाही, मिळाली तरी पुढील प्रवासासाठी पुन्हा नव्या बसस्थानकात ये जा करावे लागत आहे. यामुळे प्रवाशांना प्रवासासाठी दोन्ही बसस्थानक गैरसोयीची होत आहेत.

यामुळे औसा आगारातील भंगार बसची सेवा बंद करुन नवी बससेवा सुरु करावी. व या मार्गावरील सर्व बसेस जुन्या बसस्थानकापर्यंत पुर्वरत सुरु कराव्यात, अशी मागणी प्रवाशी करीत आहेत.

### जुन्या बसस्थानकातूनच बससेवा पुर्वरत करावी : एमआयएम

औसा आगारातील जुन्या बस बंद कराव्यात. या जुन्या बस प्रवासामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. तसेच औसा शहरातील नव्या वस्तीत २० टक्के लोकसंख्या असून जुन्या भागात ८० टक्के नागरिक राहतात. याचबरोबर याच भागात सर्व प्रकारचे मार्केट आसून शासकीय कार्यालय याच भागात आहेत. यामुळे शहरासह तालुक्यातील जनतेला याच भागातील जुन बसस्थानक सर्वांच्या सोयीचेअसून या जुन्या बसस्थानकातूनच बससेवा पुर्वरत करावी, अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामादार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय बालवीर दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ डिसेंबर -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय बालवीर दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे, प्रमुख मार्गदर्शक सचिन आगलावे व विभाग प्रमुख सुधाकर पोलावार होते. व्यासपीठावरील

मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सचिन आगलावे यांनी साहेबजादे जोरावर सिंह व फतेह सिंह यांच्याविषयी सोळाव्या शतकामध्ये झालेली सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी आलेल्या कोणत्याही संकटांना धैर्याने सामना दिला.

वयाच्या सहाव्या व नवव्या वर्षी या दोन्ही साहेब दादांनी हिंदू धर्माच्या रक्षणार्थ हुतात्म्य पत्करले तसेच, शीख धर्माचे दहावे गुरु,

गुरु गोविंदसिंह यांच्या कार्याविषयी माहीती सांगितली. धर्माबद्दल असणारी विशेष ओढ, प्रेम, आत्मीयता याप्रसंगी अनेक प्रसंगातून व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलनमंजुषा पेन्सलवारबाईंनी केले. कार्यक्रमाची सांगता तुकाराम पेद्दावाड यांनी शांती मंत्राने केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी मोलाचे सहकार्य केले.

## शिक्षकांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करावा : वंदना फुटाणे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ डिसेंबर -**

विकसित भारत निम ाण करण्यासाठी व मुलांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करावा, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फ ुटाणे यांनी केले.

ते एकुर्का रोड येथे आयोजित दोन दिवसीय ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था सचिव प्राचार्य प्रमोद चौधरी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी एस.के. शेख, शिक्षणविस्तार अधिकारी नितीन लोहकरे, शिवराज थोटे, राजेंद्र



मळभागे, केंद्रप्रमुख मधुकर म रलापले, अशोक खेळगे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना वंदना फुटाणे म्हणाल्या की, अशा विज्ञान प्रदर्शनातून आजचे हे बलवैज्ञानिक उद्याचे म ोठे शास्त्रज्ञ होऊ शकतात. यासाठी हे विज्ञान प्रदर्शन महत्त्वाचे आहे.

यावेळी नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पहिले तालुकास्तरीय उल्लास मेळावा आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत म तदान प्रक्रिया जनजागृती करण्यात आली. प्रास्ताविक विस्तार अधिकारी नितीन लोहकरे यांनी केले. सूत्रसंचालन रसूल पठाण यांनी केले. तर आभार केंद्रप्रमुख मधुकर मरलापले यांनी मानले. या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक व म ाध्यमिक एकूण ६९ तर शिक्षकांचे ७ प्रयोग दाखल झाले असून हे प्रयोग पाहण्यासाठी तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळा भेट देणार आहेत.

यासाठी पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, प्रा.एम.व्ही. स्वामी, व्यंकटेश पेद्दवाड, साबेर दायमी, डॉ. ज्ञानोबा मुंढे यांच्यासह गटसाधन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल दोन दिवशीय स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२७ डिसेंबर -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर येथील राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक येथे दि.९ व १० जानेवारी २०२५ रोजी खेल भरारी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**राजीव गांधी पालिटेक्निक महाविद्यालयाचा पुढाकार**

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी १४ ते १६ वयोगटातील म ाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यासाठी मोफत नोंदणी करावी. सर्व सामने बाद पद्धतीने खेळविले जाणार असून स्पर्धेतील विजेत्या संघास ११ हजार रूपये पारितोषिक तर द्वितीय पारितोषिक ७००० हजार रुपये देण्यात येणार आहे. आंतरशालेय कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा घेण्यात येत असून मुला-मुलींकरिता वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी ५ जानेवारी २०२५ पर्यंत एम.जी. सोनहिवरे ९१३०९१२६११ व डी.पी. पाटील ९७६६८१८४६३ यांच्याशी संपर्क साधावा.

या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे व प्राचार्य एस.पी. मेतगे यांनी केले आहे.

## तबबल २४ वर्षाने एकत्र जमले वर्गमित्र

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२७ डिसेंबर -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील व्यंकटेश विद्यालय वलांडी येथील माजी विद्यार्थांच्या स्नेह मेळावा व ऋणनिर्देश सोहळा पार पडला.




२००० च्या बॅचचे विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व ऋणनिर्देश बुधवार दि.२५ रोजी पार पडला. मित्रत्वाचे ऋणाणूबंध व गूरूजनांप्रति असलेली कृतज्ञता यात सामाजिक तेचे भान जपत दहावीतील वर्गमित्र तब्बल २४ वर्षाने एकत्र जमले. गप्पांची मैफील करीत जून्या आठवणींचा उजाळा दिला.व जमलेल्या सर्व मित्र मैत्रिणांचे स्वागत पूष्पहार देऊन करण्यात आले व सर्वांनी आपले मनोगत व्यक्त व केले व गूरूजनांप्रति आदर व्यक्त केला.

यावेळी मंचावर अध्यक्ष म्हणून व्यंकटरावजी पाटील, प्रा. राठोड, बिरगे, कूलकर्णी, लांडगे, कोमल, महानंदा, भोसले, श्रीसागर, पाटील आदी उपस्थित होते.

शिक्षक व शिक्षिकांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. व सोबत गूरूदक्षणा म्हणून सर्व गुरूजणांना विठ्ठल रूक्मिणींची प्रतिमा भेट देण्यात आली.

करिअरच्या मागे धावत असताना मित्रांना भेटने तर दूरच पण बोलने ही नव्हते.पण वाटसप आणि फेसबूकने आमच्या मैत्रिचा पुनर्जन्म झाला व आज तब्बल २४ वर्षाने एकत्र जमलो, असे विचार अमिर मोमिन यांनी व्यासपिठावर मांडले.

कार्यक्रमाची प्रस्तावना मूजीब पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन सूधीर टवाणी, गजानन चन्नेवार यांनी मांडले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनिषा पाटील, दिगंबर जाणवे, संतोष महाजन, बाळु टिपराळे, गोविद कार्ले, सिध्देश्वर बनाळे आदीने परिश्रम घेतले.

## शिवाजी महाविद्यालयात फिट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत फिटनेस अवेरनेस कॅम्प संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ डिसेंबर -**

येथील शिवाजी म हाविद्यालयात फिट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत फिटनेस कॅम्प यशस्वीरित्या संपन्न झाला.

व्यक्ती समाज आणि राष्ट्र समृद्ध ठेवण्यात व्यायाम महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो.जर देशाचे नागरिक निरोगी असतील तर तो देश जीवनाच्या प्रत्येक पैलूत नक्कीच उंची गाठेल.

नियमित व्यायामाने अनेक रोग टाळता येतात आणि शरीर व्यायामाने निरोगी ठेवण्यास म दत होते.व्यायाम ही एक निरोगी जीवनशैली आहे.जे लोक नियमित व्यायाम करतात त्याचा मृत्यूचा धोका कमी होतो. हाच उद्देश समोर ठेवून या कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

शिवाजी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने विविध शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य जागरूकता शिबिराचे आयोजन दि. २० ते २४ डिसेंबर रोजी केले होते. त्यात विविध शाळेच्या पाचवी ते आठवी वर्गाच्या २५० ते ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले.

डॉ. अनंत टेकाळे, लाडके आर.एम., नगरे, देविदास उदगिरे यावेळी उपस्थित होते.

# गाळपास आलेल्या उसाला मांजरा, रेणा विलास युनिट १ या कारखान्याकडून प्रती टन किमान ३ हजार रुपये दर देणार

### मांजरा साखर परिवाराचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांची माहिती... २,२२,२२२ उत्पादित साखर पोत्याचे पूजन...



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२७ डिसेंबर -**

मांजरा परिवारातील साखर कारखान्यांनी सातत्याने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले असुन साखर उद्योगात सक्षम व यशस्वी साखर कारखाने म्हणून मांजरा परिवारातील साखर कारखान्यांची देशभरात ओळख आहे. चालु २०२४-२५ मध्ये गाळप झालेल्या ऊसाला विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखाना, विलास साखर कारखाना युनिट १ या तीन साखर कारखान्याकडून किमान दर प्रति टन ३,००० (तीन हजार रुपये) देणार असल्याची माहिती मांजरा परिवाराचे मार्गदर्शक राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी मांजरा कारखाना येथे साखर पोते पूजन प्रसंगी मंगळवारी येथे बोलताना दिली आहे त्यामुळें लातूर, रेणापूर तालुक्यांतील उस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव मिळणार आहे

मांजरा साखर कारखान्यातील साखर कारखान्यांनी चालू गळीत हंगाम ात २०२४-२५ साठी गाळप झालेल्या ऊसाला पहिली उचल २,७०० (दोन हजार सातशे रु.) दिलेले आहे. चालू वर्षी उत्तम पाऊस असल्याने साखर उतारा चांगला प्राप्त होत आहे. त्यामुळे निश्चितच ऊसदर हा किमान ३००० रुपये असणार असुन हंगाम समाप्ती नंतर जर ३००० पेक्षा अधिक दर निघत असेल तर तो देखील दिला जाईल असे दिलीपराव देशमुख यांनी सांगीतले.

यावेळी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील उत्पादित २,२२,२२२ व्या (५० कि.) साखर पोत्याचे पुजन कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमास म ाजी आमदार अँड. त्र्यंबक भिसे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव म ोरे, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, माजी जि.प. सदस्य धनंजय देशमुख, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास कारखान्याचे उपाध्यक्ष रविंद्र काळे, रेणाचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, मांजरा साखर कारखान्याचे श्रीशैल उटगे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड. प्रमोद जाधव, रेणाचे संचालक प्रविण पाटील, जिल्हा काँग्रेस सम न्वयक सचिन दाताळ, जिल्हा बँकेचे माजी संचालक संभाजी सुळ, प्रा. शशीकांत देशमुख, तालुका काँग्रेस उपाध्यक्ष दयानंद बिडवे बाळासाहेब जाधव, विकास देशमुख, कारखान्याचे संचालक सूर्यकांत पाटील, सचिन शिंदे, निळकंठ बचाटे (पवार), तात्यासाहेब देशमुख, धनराज दाताळ, ज्ञानेश्वर पवार, अशोक काळे, कैलास पाटील, वसंत उफाडे, नवनाथ काळे, बंकट कदम, शेरखां पठाण, सदाशिव कदम, अनिल दरकसे, विशाल पाटील, शंकरराव बोळंगे, बाबुराव जाधव, ज्ञानेश्वर भिसे, महेंद्रनाथ भादेकर, विलास चामले, श्रीनिवास देशमुख, कार्यकारी संचालक पंडित देसाई, सर्व खाते प्रमुख अधिकारी आदींची उपस्थिती होती.

### मांजरा कारखान्याचे गळीत हंगामात उत्तमरीत्या गाळप...

राज्यातील साखर उद्योगात भरारी घेतलेल्या मांजरा साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात २९ दिवसात दि.२४ डिसेंबर २०२४ अखेर १,४८,५५० मेट्रीक टनाचे गाळप केले असून १,२०,९०० क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. तसेच कारखान्याने ६२,२३,००० के डब्ल्यू एच.विज निर्मीती केली आहे तर १८,१०,०३१ लीटर अल्कोहोल व १६,०८,०४३ लिटर इथेनॉल उत्पादीत केले आहे. या सोबतच ५६,२२६ के डब्ल्यू एच. सोलार पावर निर्माण केली आहे.

### मांजराच्या उस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीचा भाव...

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखर व उपपदार्थ निर्मीती मधुन अधिकचा भाव कसा देता येईल. यासाठी नेहमीच सकारात्मक पाऊल उचलून एफआरपी पेक्षा जास्तीचा दर दिला आहे. त्यामुळे शेतकरी व कारखाना यांच्यात एक विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. ते नाते कायम ठेवत दिलीपराव देशमुख माजी मंत्री आमदार अमित देशमुख, मा.आ. धिरज देशमुख व संचालक मंडळ कार्यरत आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# वाचन संकल्प उपक्रमात ६६८ ग्रंथालयांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापिठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ ते १५ जानेवारी दरम्यान राबविला जाणार आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील ६६८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयेही सहभागी होणार आहे.

या उपक्रमात सर्व ग्रंथसंपदेचे एकत्रित वाचन केले जाणार असून यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. त्या- त्या गावातील जेष्ठ नागरीक, महिला यांचाही सहभाग असणार आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व लातूर जिल्ह्यातील ६६८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये दररोज वाचन विषयक कार्यक्रम होणार आहेत. वाचन संकल्प महाराष्ट्राचा निमित्त १ ते १५ जानेवारी दरम्यान सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथा-कथन स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजनही केले जाणार आहे. तरी या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर यांनी केले आहे. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ ते १५ जानेवारी दरम्यान राबविला जाणार आहे. लातूर येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व अवंती नगर येथील साने गुरुजी शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान राबविण्यात येणार आहे. वाचन पंधरवाड्यानिमित्त सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले जाणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ९ जानेवारी, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. असे प्रशासनाने कळविले आहे.

### राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व हरपले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** आपल्या दूरगामी व अभ्यासपूर्ण निर्णयांतून भारताला जागतिक पटलावर मानाचे स्थान प्राप्त करून दिलेले माजी पंतप्रधान, जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने भारताचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे अशा शब्दात माजी आमदार धिरज देशमुख यांनी डॉ. सिंग यांना शब्दांजली अर्पण केली.
राजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपल्यातून हरपले आहे. देश आर्थिकदृष्ट्या अडचणीत असताना आर्थिक सुधारणा घडवून आणत देशाला नव्या उंचीवर घेवून जाण्यात डॉ. मनमोहन सिंग यांचा मोलाचा वाटा राहिला आहे असे यावेळी म्हणाले.

### साक्षरतेबरोबर कम्युनिकेशन स्किल महत्त्वाचे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** कार्यालयीन कामकाजासाठी डिजिटल साक्षरतेबरोबर कम्युनिकेशन स्किल खूप महत्त्वाचे असते,असे प्रतिपादन संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांनी केले. येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी डिजिटल साक्षरता विकसित करणे या विषयावर पाच दिवसीय संगणक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.
या कार्यशाळेच्या समारोप व प्रमाणपत्र वितरणप्रसंगी त्या बोलत होत्या.याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू ,कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा.अरुणा चौधरी, नवनाथ भालेराव आणि बन्सी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.
महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यशाळा समारोप प्रसंगी शिक्षकेत्तर कर्मचारी बालाजी चित्ते,क्षिरसागर,सुदर्शन सर्जे,दिलीप राठोड ,बाजपेयी यांनी कार्यशाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

### अज्ञाताने कचरा पेटवला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** शुक्रवारी महानगरपालिका हद्दीतील बाभळगाव चौकाजवळ अज्ञात व्यक्तीने रस्त्यावर साठलेला कचरा पेटवून दिला. यामुळे काही



काळापर्यंत या ठिकाणी दुर्गंधी पसरली होती सर्वत्र धुराचे लोट दिसून येत होते.

महानगरपालिकेची कचरा वेळच्यावेळी उचलण्याची यंत्रणा सक्षम नसल्यामुळे ठीकठिकाणी या पद्धतीने कचरा पेटवून कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. या जाळलेल्या कचऱ्यामध्ये भंगार साहित्य, कापडी वस्तू, प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिकच्या वस्तू, चामडी वस्तू पॅकिंगचे साहित्य, थर्माकोल यांचा समावेश होता.
या पद्धतीने कचरा जाळल्यामुळे वातावरणामध्ये प्रदूषण निर्माण होतो विषारी वायू तयार होतो आणि नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, तसेच ऍलर्जी, दमा, कॅन्सरसाठी विकार उत्पन्न होतात. यामुळे महानगरपालिका प्रशासनाने कचरा पेटवण्याचा प्रकार थांबवुन प्रदूषण निर्मिती होईल असे कृत्य करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

# बदलत्या वातावरणाने रब्बी पिके कोमात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** जिल्ह्यात पडणारी थंडी ही रबी हंगामातील हरभरा, ज्वारीसाठी पोषक मानली जाते. पेरणी होताच थंडीत वाढ झाली तर रोगराईचा प्रादुर्भाव तर होत नाहीच पण पिकांची वाढही जोमात होते. पेरणीनंतर तशीच काहीशी स्थिती होती. मात्र, गेल्या चार दिवसांपासून वातावरणातील बदलाचा परिणाम पिकांवर जाणवू लागला आहे. विशेषतः हरभऱ्यावर पाने खाणाऱ्या अळीचा आणि ज्वारीवर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढत आहे.

रबी हंगामातील पिकांची उगवण होताच वाढलेला गारठा आणि पोषक वातावरण यामुळे कमी कालावधीत पिकांची जोमात वाढ झाली आहे. त्यामुळे कधी नव्हे ते रबी हंगामातही शिवार हिरवागार झाला आहे. सर्वकाही अलबेल असतानाच शेतकऱ्यांना ज्याची भीती होती तीच गोष्ट गेल्या चार दिवसांपासून होत आहे. थंडी गायब झाली असून दिवस



उजाडल्यापासून ढगाळ वातावरण होत आहे. एवढेच नाहीतर पुढील दोन दिवस मराठवाड्यासह इतर विभागात अवकाळी पाऊस आणि गारपीठीचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली असून जी अवस्था खरीप हंगामातील पिकांची झाली तीच आता रब्बीतील होणाक की काय अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. रबीमध्ये हरभरा हे मुख्य पीक असून जिल्ह्यात जवळपास ३ लाख हेक्टरवर हरभऱ्याचा पेरा झाला आहे.

पीक सध्या जोमात आहे पण ढगाळ वातावरणामुळे पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढत आहे. दुसरीकडे ज्वारीवर देखील अमेरीकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येऊ लागला आहे. किडीचा प्रादुर्भाव वाढत असल्याने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट बांधावर जात शेतकऱ्यांशी संवाद साधला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी याबाबतचे मार्गदर्शन केले जात आहे. विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शिवाय काय उपाययोजना राबवायची याबाबत तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे झाले आहे.

दरम्यान, जिल्ह्यात दररोज होत असलेल्या वातावरण बदलामुळे शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

# डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत ३८ विद्यार्थ्यांचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** येथील नेटीझन्स फाउंडेशन स्कूलच्या ३८ विद्यार्थ्यांनी बृहन्मुंबई विज्ञान शिक्षक संघाद्वारे घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.



इयत्ता ६ वी मधून १६ व इयत्ता ९ वी मधून २२ अशा एकूण ३८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हे विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेच्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. ही परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढविणे, तर्कशक्ती, सखोल अध्ययन, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मिती व आकलन क्षमता विकसित करण्यासाठी घेतली जाते. इयत्ता ६ वी वर्गातून सोहम विलास शिंदे आणि ९ वी वर्गातून श्लोक संदीप शास्त्री हे विद्यार्थी गुणानुक्रमे पहिले आले आहेत.

शाळेतील शिक्षिका प्रियंका काकनाटे, वैष्णवी तेलंगे, मोहिनी बेडगे, उग्रसेन चटप, हेमंत श्रीवास्तव, पठाण, रणजीत सोमवंशी, सूरज मस्के, धनाजी शिंदे, मुडबे, संतोषी कहाळेकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य एस. जे. तोडकर, संस्थेच्या अध्यक्षा चंद्रकला तोडकर, सचिव मीनाक्षी तोडकर, कोषाध्यक्ष महेश तोडकर, उपप्राचार्य एम. ए. पठाण, समन्वयक बी. एम. मुंडे, सहायक संचालक नितीन सदाफुले, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

# सोयीची बढती मिळल्याने ६५ कर्मचारी आनंदी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** जिल्हा परिषदेच्या पाच विभागांतील वर्ग तीन व वर्ग चार संवर्गातल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली आदेश देण्याची प्रक्रिया स्थायी समिती सभागृहात पार पाडली. ६५ कर्मचाऱ्यांना नव वर्षाच्या तोंडावर बढतीची जिल्हा परिषदेने भेट दिली.

जिल्हा परिषदेने स्थायी समिती सभागृहात पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांच्या समक्ष समुपदेशन घेण्यात आले. त्याच ठिकाणी जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली संबंधितांना पदस्थापनेचे आदेशही देण्यात आले.

जि. प. सहा विभागांतील १२ संवर्गाच्या एकूण १२६ कर्मचाऱ्यांना समुपदेशन प्रक्रियेदरम्यान, संबंधित कर्मचाऱ्यांना जिल्ह्यात रिक्त असलेली पदे सभागृहात प्रत्यक्ष दाखविण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या सोयीनुसार पदस्थापना देण्यात आली. ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली. तसेच कर्मचाऱ्यांना आदेशही तेथेच देण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, कार्यकारी अभियंता व्ही. जी. चिटगोपकर आदी उपस्थित होते.

# लातूर शहरातील अडीच हजार पथदिवे बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** शहरातील पथदिव्यांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम गुत्तेदाराने सोडल्यामुळे दीड वर्षात एकही नवीन पथदिवा बसविता आला नाही. २२ हजार ४०० पैकी तब्बल अडीच हजार पथदिवे बंद आहेत. पाच वर्षांपूर्वी पथदिवे बसविले असल्याने त्यांची गॅरंटी संपली आहे. एकेक करून सर्वच पथदिवे कायमचे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. नवीन पथदिवे खरेदीसाठी शासनाने परवानगी देण्याची मागणी माजीमंत्री अमित देशमुख यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात केली. त्यावर राज्य सरकार सकारात्मक कधी निर्णय



घेते, याची प्रतीक्षा महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागली आहे. तोपर्यंत पालिकेच्यावतीने बंद पडलेल्या पथदिव्यांचा शोध घेऊन त्यांच्या वायर बदलणे, कार्बन काढून ते सुरू होतात का, याचा शोध सुरू आहे.

लातूर शहरातील २२ हजार ४०० पथदिव्यांपैकी आजघडीला अडीच हजार पथदिवे बंद पडले आहेत. पाच वर्षांपूर्वी सर्व पथदिवे बसविण्यात आल्याने त्यातील बहुतेक पथदिवे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. काही दिवसांत यावर निर्णय झाला नाही तर लातूर अंधाराच्या खाईत लोटले जाण्याची शक्यता आहे. वर्तमान पत्रात आलेल्या वृत्ताची दखल घेऊन माजीमंत्री आमदार अमित देशमुख यांनी लातूरमध्ये पथदिवे खरेदीसाठी महापालिकेला परवानगी देण्याची मागणी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात केली होती.

त्यांच्या मागणीवर अद्याप निर्णय झालेला नाही. सरकार कधी निर्णय घेऊन पालिकेला पथदिवे खरेदी करण्याची परवानगी देते, याकडे लातूरवासियांचे लक्ष लागले आहे.

सध्या बंद पडलेल्या सुमारे अडीचहजार पथदिव्यांचा शोध घेऊन त्यांच्या वायर बदलणे, कार्बन काढून ते सुरू होतात का, याचा शोध घेण्याचे काम महापालिकेच्या विद्युत विभागाच्यावतीने करण्यात येत आहे. यासाठी महापालिकेने खाजगी कामगारांना कामावर घेतले आहे. ते बंद पथदिवे शोधून सुरू करण्याचा प्रयत्न करीत असले तरी यातील बहुतेक पथदिव्यांचे बल्ब गेल्याने ते सुरू होत नाहीत. यामुळे नवीन पथदिवे खरेदी करण्याची सरकारनेच परवानगी देण्याची गरज आहे. अन्यथा लातूर लवकरच अंधाराच्या खाईत लोटले जाण्याची शक्यता आहे. याकडे पालिका प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी शहरातून होत आहे.

# तुळजाभवानीच्या विद्यार्थ्यांचे यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** येथील नेटीझन्स फाउंडेशन स्कूलच्या ३८ विद्यार्थ्यांनी बृहन्मुंबई विज्ञान शिक्षक संघाद्वारे घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.

इयत्ता ६ वी मधून १६ व इयत्ता ९ वी मधून २२ अशा एकूण ३८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हे विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेच्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. ही परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढविणे, तर्कशक्ती, सखोल अध्ययन, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मिती व आकलन क्षमता विकसित करण्यासाठी घेतली जाते. इयत्ता ६ वी वर्गातून सोहम विलास शिंदे आणि ९ वी वर्गातून श्लोक संदीप शास्त्री हे विद्यार्थी गुणानुक्रमे पहिले आले आहेत.

शाळेतील शिक्षिका प्रियंका काकनाटे, वैष्णवी तेलंगे, मोहिनी बेडगे, उग्रसेन चटप, हेमंत श्रीवास्तव, पठाण, रणजीत सोमवंशी, सूरज मस्के, धनाजी शिंदे, मुडबे, संतोषी कहाळेकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य एस. जे. तोडकर, संस्थेच्या अध्यक्षा चंद्रकला तोडकर, सचिव मीनाक्षी तोडकर, कोषाध्यक्ष महेश तोडकर, उपप्राचार्य एम. ए. पठाण, समन्वयक बी. एम. मुंडे, सहायक संचालक नितीन सदाफुले, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

# डॉ. घुगेला ३० पर्यंत पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** येथील बाळू डोंगरे हत्येप्रकरणी डॉ. प्रमोद घुगे याला ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीची सुनावणी होती. या घटनेतील दुसरा आरोपी अनिकेत मुंडे हा पोलीस ठाण्यात हजर झाला होता. गुरुवारी दुपारी अनिकेत यास कोर्टात हजर केले असता डॉ. घुगे त्यालाही ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर यामध्ये आणखी एकाचा समावेश असून त्या आरोपीचाही पोलिसांकडून शोध सुरु आहे.

शहरातील आयकॉन हॉस्पिटलच्या सहाव्या मजल्यावर बाळू डोंगरे या तरुणाची हत्या झाली होती. हत्येनंतर तो अपघात असल्याचा बनाव केला असल्याचे फिर्यादिमध्ये म्हटले गेले होते. घटना होताच आयकॉनचे सर्वेसर्वा

**अनिकेत मुंडेला पण अटक : तिसऱ्या आरोपीच्या शोधात पोलीस**

डॉ. प्रमोद घुगे व त्याचा भाच्चा अनिकेत मुंडे हे फरार झाले होते. हरिद्वार येथून डॉ. घुगे यास ताब्यात घेण्यात आले असून बुधवारी कोर्टात हजर केले असता ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर बुधवारी रात्री अनिकेत मुंडे पोलीस ठाण्यात हजर झाला होता.

गुरुवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्यास कोर्टात हजर केले असता दोन्ही वकिलांचा युक्तिवाद झाल्यानंतर त्यास ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अनिकेतचे शिक्षण हे बी.एससी झाले असून गेल्या काही दिवसांपासून तो हॉस्पिटलमध्येच काम करीत होता.

पोलीस तिसऱ्या आरोपीच्या मागावरबाळू डोंगरे हत्येप्रकरणात वेगवेगळ्या घटना आता समोर येऊ लागल्या आहेत. या दोघांशिवाय अन्य एकजण या घटनेत सहभागी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याचाही शोध सुरु असल्याचे तपास पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलतांना सांगीतले.

# माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त शहरातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, संस्था, शाळा-महाविद्यालयांमध्ये वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे यांनी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे, प्रा. कुलकर्णी, डॉ.कोमल गोमारे, सतीश तांदळे, सुदाम सातपुते, कांबळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय**

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जयंती महोत्सव समिती आणि भाषा संकुल (कनिष्ठ महाविद्यालय) यांच्या संयुक्त विद्यमाने अटल बिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. के. आर. बिरादार, प्रा. एम. ए. वैरागकर, बालाजी डावकरे, सुभाष गलगले आदी उपस्थित होते. प्रारंभी प्राचार्य डॉ. गवई यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**मुक्तांगण इंग्लिश स्कूल**

येथील विशालनगर भागातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये अटल बिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त चिमुकल्यांनी अभिवादन केले.

यावेळी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षिका मयुरी देशमुख यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका प्रणिता कांबळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

# देशाने थोर अर्थतज्ज्ञ गमावला:आ.देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** भारताचे माजी पंतप्रधान, काँग्रेस पक्षाचे नेते डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आहे. त्यांच्या अकस्मित जाण्याने आपल्या देशाने थोर अर्थतज्ज्ञ, आणि महान नेता गमावला आहे, अशी माझी भावना असल्याचे आ.अमित देशमुख यांनी म्हटले आहे. माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून आमदार देशमुख यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

या संदर्भाने आपला भावना व्यक्त करताना आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, भारताला जागतिक महासत्ता बनवण्याच्या प्रक्रियेची सुरुवात करणारे म्हणून ज्यांची जागतिकस्तरावर ओळख होती ते थोर अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचा पंतप्रधान पदाचा कार्यकाळ अत्यंत यशस्वी राहिला आहे. कामाप्रती असलेली त्यांची निष्ठा पाहुण ते जनसामान्यात लोक प्रिय होते.

# जागृती साखर कारखान्याकडून ऊसतोड मजुरांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ डिसेंबर-** देवणी तालुक्यातील तळेगाव (भो) येथील जागृती शुगर ॲण्ड इंडस्ट्रीज लि. व आरोग्य विभागाच्यावतीने गुरुवारी ऊसतोड मजुरांची आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. नागराळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबीर घेण्यात आले.

ऊसतोड मजुरांना वेळीच आपली आरोग्य तपासणी करणे शक्य होत नाही. या मजुरांचे आरोग्य निरोगी रहावे तसेच त्यांना कोणता आजार आहे का? हे तपासण्यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये लसीकरण आणि सर्वरोग निदानही करण्यात आले. आरोग्य शिबीरास मजुरांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुजीत पांचाळ, डॉ. प्रमोदनी गुंडरे, डॉ. अन्सारी अक्सा, कारखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शाम हिबाने व सर्व कर्मचारी उपस्थित होते. कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले, शेतकरी अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, रसायण तज्ञ ज्ञानेश्वर जाधव, विलास पाटील, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार, रामदास सोळुंके, राजकुमार कांबळे, महेश भंडे यांच्यासह मजूर, मुकादम, वाहन चालक व कारखान्याचे कृषी अधिकारी उपस्थित होते.